कथाकार माधव सरकुंडे यांच्या कथेत कृषीजीवनाचे सुध्दा प्रभावी पणे चित्रण केलेले दिसून येते. सदरील कथासंग्रहामध्ये कृषीजीवनाचे संदर्भ खालीलप्रमाणे येतात. 'ताडमं' या कथासंग्रहातील 'जागल' ही कथा आदिवासी कृषी जीवनावर आधारित आहे. जेबल्या भुईमुंग काढायचा म्हणून शेतावर जातो. उशिरा उठल्यामुळे त्याला न्याहारी भेटत नाही. गुरेढोरे घेऊन, तो शेतावर जातो, तिथे भुईमुंग उपटुन हुरडा भाजतो. तेव्हा त्याचे मित्र तेथे येतात. व जेबल्याला म्हणतात, "काय बे जेबल्या बही येकटाच हुळा खातू का बे ?".

तेव्हा जेबल्या त्यांना म्हणतो, "बही मसने हो ! लागलाच का बे तुम्हाला वास ?" जेबल्या मित्रांना भुईमुंग उपटण्यास सांगतो. व त्यानंतर तिघेजण हुळा भाजुन खात बसतात. शेतात दिवसभर बाया भुईमुंग काढतात. व रात्री जेबल्यांचा बापू जागल रात्र पहारा करण्यासाठी शेतावर थांबतो. तेव्हा बापुसाठी जेबल्या भाकरी आणताना तळ्यावर जाऊन खेकडे, मासोळ्या, पकडुन आणतो. जेबल्या सोबत त्याचे मित्र पण असतात. खेकड्यानं तट गुंडी भरल्यावर जेबल्या आपल्या मित्रांना म्हणतो, "आता आपण निघु गड्या". तळ्यावरून ते झपझप रस्ता तुडवत निघतात. अर्ध्या घंट्यातच जागलीवर येऊन पोहचतात.

जेबल्याच्या बापाने अंग टाकलेले असते. व त्याचा डोळा सुध्दा लागलेला असतो. तेव्हा जेबल्या बापूला म्हणतो, "बापू, बापू झोपला का?". जेबल्याचा आवाज ऐकून बापु उठतो. व म्हणतो,"काय रे, हे काय येयाची येळ व्हय का?".

तेव्हा जरासा उशीर झाला अशी कबुली जेबल्याचे मित्र देतात. तेव्हा तळ्यावर काही सापडलं की नाही याबाबत बापू विचारतो, तेव्हा रातभर खात बसलो तरी आपल्याला सरनार नाहीत. इतक्या मासोळ्या व खेकडे पकडून आणलेत हे जेबल्या व जेबल्याचे मित्र बापुला सांगतात. नंतर बापु त्यांना म्हणतो, "बरं मंग, चला बर चुल करा. जाळ पेटवा". जेबल्या व त्याचे मित्र पोर तीन गोटे मांडून चुल करून जाळ पेटवतात. व चुलीवर चटणी मिठाची कोड्यास व चटणी करून खेकडे, मासोळ्या खातात. नंतर जागली वर गाढ झोपी जातात. बापु सकाळ होताच पोरायला उठवतो. जेबल्याचे मित्र घरी जातात. अशाच प्रकारे दोन - चार दिवस जागल ठेवली जाते. दोन दिवसांत भुईमुंग काढला जातो. "मानसाळलीलं खळं उजुन रानटी झालं".

अशाप्रकारे कथेचा शेवट कथाकार माधव सरकुंडे करतात. एकुणच आदिवासी कृषीजीवनाचे दर्शन व बोली भाषेचा गोडवा 'जागल' या कथेतुन अनुभवास येतो. 'जागल' या कथेची प्रभावीपणे मांडणी आपल्या खास शैलीत कथाकार माधव सरकुंडे करताना दिसतात.

(६). समारोप :-

वाडी, वस्ती, पाडयावरील माणस, ग्रामीण आदिवासी जीवन, समाज, संस्कृती, शेती, आणि निसर्ग यांच्या अनुषंगाने घडणाऱ्या घटना, प्रसंग, त्यातुन आकाराला येणारे लोकमानस या साऱ्यांतुन ग्रामीण आदिवासी जीवनानुभवाचे स्वरूप सिध्द होते. अशा प्रकारे 'सर्वा' व 'ताडमं' या कथासंग्रहामध्ये ग्रामीण आदिवासी कृषीजीवनाचे चित्रण कथाकार माधव सरकुंडे यांनी केले आहे.

शेतीमध्ये होणारे बदल, भटकंती जीवन, ग्रामीण आदिवासी जीवनातील दळणवळणामुळे होणारे परिवर्तन अशा विविध ग्रामीण आदिवासी कृषीजीवनाचे उत्तर कथाकार माधव सरकुंडे यांनी आपल्या कथात्म साहित्यातून नेमके चित्रण केले आहे.

एकुणच माधव सरकुंडे यांच्या 'सर्वा' व 'ताडमं' या कथासंग्रहातील प्रसंग हा वाचकाला ग्रामीण आदिवासी समाजातील प्रासंगिकतेची जाणीव करून देणारा आहे. व ग्रामीण आदिवासी कृषीजीवनानुभव समृध्द करणारा आहे.

(७). संदर्भग्रंथ :-

(१). माधव सरकुंडे, सर्वा, देवयानी प्रकाशन, यवतमाळ, १४ एप्रिल २०००.
(२). माधव सरकुंडे, ताडमं, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २००१.
(३). डॉ. मनोहर सुरवाडे, आदिवासी साहित्य प्रवाह, सुगम प्रकाशन, अमरावती, २०१२.
(४). प्रा.आर.कुमार, आधुनिक मराठी वाङ्मयातील प्रवाह दलित व आदिवासी साहित्य, इंदू प्रकाशन, औरंगाबाद, २०१४.
(५). डॉ.सुभाष पुलावळे, मराठी कथा परंपरा आणि स्वरूपविशेष, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, २०१०.
(६). डॉ. शोभा नाफडे, स्वातंत्र्योतर वऱ्हाडी साहित्य, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, २००६.

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2Issue-13May-Jun2022

भात लागवडीच्या सुधारित पद्धतीचा भौगोलिक अभ्यास

सहा .प्रा.नंदकिशोर आत्माराम पाटील[1] डॉ. भाऊसाहेब सोनाजी देवकर[2]

[1]भूगोल विभाग प्रमुख, दोशी वकील आर्ट्स कॉलेज आणिजी.सी.यू.बी.सायन्स आणि कॉमर्स कॉलेज, गोरेगाव ता. माणगाव जि. रायगड,

[2]संत रामदास आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स कॉलेज, घनसांगवी जिल्हा. जालना.

Email – nandkishorpatil1974@gmail.com

Email – bhausdevkar@Gmail.com

सारांश :

रायगड जिल्हा हा एकेकाळी भाताचे कोठार म्हणून ओळखला जात होता. रायगड जिल्ह्याची ही ओळख आता पुसली गेली आहे. वाढते औद्योगिकरण, वाढती लोकसंख्या निवासगृह, महामार्ग, नैसर्गिक आपत्ती यामुळे हळूहळू जिल्ह्यातील शेती क्षेत्र नष्ट होत चालले आहे. त्याचबरोबर वाढलेले खर्च, मजुरी यामुळेही शेतकरी शेती करण्यास पुढाकार घेत नाहीत. तसेच पावसाने पाठ फिरवली किंवा मोठे वादळ आले तर शेतीचे आणि पर्यायाने शेतकऱ्यांचे प्रचंड मोठे आर्थिक नुकसान होते. मात्र असे असले तरी आजही अनेक शेतकरी शेतात विविध प्रयोग करून पीक घेऊन पारंपरिक शेती व्यवसाय टिकून ठेवत आहेत. भात उत्पादकता कमी असण्याचे प्रमुख कारण म्हणजे सुधारित लागवडीचा अभाव हे आहे.

रायगड जिल्ह्यातील हेक्टरी उत्पादकता वाढवण्यासाठी साहाय्यक ठरणाऱ्या विशेषत: सुधारित भात जातींच्या लागवडीखालील क्षेत्रात वाढ, शिफारशीनुसार सेंद्रिय व रासायनिक खतांचा संतुलित वापर, मशागतीचे व लावणीचे योग्य तंत्रज्ञान, पीक संरक्षण उपायांचा अवलंब इत्यादी बाबींवर विशेष भर द्यावा लागणार आहे. तसेच संकरीत भात निर्मितीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करणे आवश्यक आहे.

बीजसंज्ञा : भात लागवड, चारसूत्री लागवड भात शेती तंत्रज्ञान, श्री पद्धत

प्रस्तावना :

भात ही संज्ञा शिजवलेल्या तांदळासाठी व टरफलासहित तांदळाला आणि त्याची निर्मिती करणाऱ्या वनस्पतीलाही वापरली जाते. भात हे पीक पूर्वापार खाद्यान्नापैकी एक पीक ते निम्म्याहून अधिक लोकांचे प्रमुख अन्न आहे. भात पीक हे महाराष्ट्र राज्यातील अन्नधान्यांपैकी एक महत्त्वाचे पीक आहे. मानवी शरीरास पोषक अशा बऱ्याच अन्नघटकांचा पुरवठा हा भातातून होत असतो. तसेच इतर पिकांच्या तुलनेत पशु-पक्ष्यांचे खाद्य व औद्योगिकदृष्ट्या देखील भाताचे अनेक उपयोग होतात. त्यामुळे भात हे बहुगुणी तृणधान्य पीक म्हणून ओळखले जाते. याशिवाय हलक्या, भारी, पाणथळ, खारवट अशा विविध प्रकारच्या जमिनीत यशस्वीपणे वाढणारे व उत्पन्न देणारे भात हे प्रमुख तृणधान्य पीक आहे. महाराष्ट्र राज्यातील लागवड करण्यात येणाऱ्या अन्नधान्य पिकांचा विचार करता ज्वारी-बाजरी नंतर भात पिकाचा क्रमांक लागतो. भात हे रायगड जिल्ह्याचे मुख्य पीक असून लागवडीखाली असलेल्या क्षेत्रापैकी जवळजवळ 70% क्षेत्रात हे पीक घेतले जाते. भात पीक उत्पादनात संपूर्ण महाराष्ट्रात रायगड जिल्ह्याचा दुसरा क्रमांक लागतो. माणगाव, अलिबाग, पेण, पनवेल या तालुक्यांत भाताचे पीक मोठ्या प्रमाणात घेतले जाते.

जमिनीची प्रत, भाताचा प्रकार, हंगाम, वार्षिक पर्जन्यमान व त्याची विभागणी, पाणी देण्याची सोय वगैरे गोष्टींवर भाताच्या लागवडीची पद्धत आधारलेली असते. भारतात परिस्थितीप्रमाणे निरनिराळ्या लागवडीच्या पद्धती प्रचलित आहेत. त्यांची दोन प्रमुख गटात विभागणी करण्यात येते. 1) पेरणी पद्धत 2) लावणी पद्धत किंवा स्थलांतर पद्धत. या दोन्हीही पद्धतीत स्थानिक परिस्थितीप्रमाणे फेरफार केलेल्या लागवडीच्या पद्धती ही भारतात निरनिराळ्या भागात प्रचलित आहेत. लावणी पद्धतीचा वापर कोकणात मोठ्या प्रमाणात केला जातो.

अभ्यासक्षेत्र :-

महाराष्ट्र राज्य एक महत्त्वाचे राज्य असून महाराष्ट्राच्या पश्चिमेला कोकण किनारपट्टीत अरबी समुद्रालगत असणारा आजचा रायगड जिल्हा म्हणजेच पूर्वीचा कुलाबा जिल्हा होय. रायगड जिल्ह्याला लाभलेले भौगोलिक स्थान हे अतिशय महत्त्वाचे असून रायगड हा पूर्वेस सह्याद्री पर्वत रांगा व पश्चिमेस अरबी समुद्राच्या दरम्यान वसलेला आहे. रायगड जिल्ह्याच्या पूर्वेला पुणे व सातारा जिल्हा, दक्षिणेस रत्नागिरी जिल्हा, उत्तरेस मुंबई व ठाणे जिल्हा, अशा प्रकारचे सापेक्ष स्थान लाभले असून निरपेक्ष स्थानाचा विचार करता रायगड जिल्ह्याचा अक्षवृत्तीय विस्तार 17^0 15' ते 19^0 8' उत्तर अक्षवृत्त तर रेखावृत्तीय विस्तार 72^0 51' ते 19^0 8' उत्तर तर रेखावृत्तीय विस्तार 72^0 51' पूर्व ते 73^0 40' पूर्व रेखावृत्त असा आहे. रायगड जिल्ह्याचे क्षेत्रफळ 7148 चौरस किलोमीटर असून रायगड जिल्ह्यास 240 कि.मी. लांबीची किनारपट्टी लाभलेली आहे. तसेच किनारपट्टीवर उरणची खाडी, धरमतरची खाडी, रेवदंडयाची खाडी, बाणकोट खाडी, राजपुरीची खाडी अशा विविध खाड्या आढळून येतात. रायगड जिल्ह्याचे प्राकृतिक दृष्ट्या खालाटी व वलाटी असे दोन विभाग पडतात. यापैकी खालाटी विभागाची उंची कमी असून तो समुद्रालगत सपाट मैदानाच्या स्वरूपात आहे, तर वलाटी विभाग सह्याद्री पर्वत रांगेला अनुसरून विस्तारलेला असून तो अधिक उंचीचा आहे व अनियमित भूपृष्ठरचनेचा हा भाग आढळतो. रायगड जिल्हास लाभलेल्या हवामानाचा विचार करता उष्ण दमट व सम हवामानाचा हा विभाग असून ऋतूपरत्वे या हवामानात थोडासा बदल होतो. येथील दैनिक व वार्षिक तापमान कक्षेत जास्त फरक आढळत नाही. रायगड जिल्ह्यातील वार्षिक पर्जन्यची सरासरी ही 300 सें.मी. आढळते.

रायगड जिल्ह्याची सन 2011 च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ही 26,34,200 इतकी असून लोकसंख्येची घनता ही सरासरी 368 इतकी आढळते.

माहिती संकलन :

प्रस्तुत शोधनिबंधात प्राथमिक व दुय्यम स्वरूपाच्या आकडेवारीचा आधार घेतला जाणार आहे. दुय्यम स्वरुपाची माहिती व आकडेवारी जिल्हा परिषदेचा वार्षिक अहवाल, विविध वर्षाचे सामाजिक व आर्थिक समालोचन, जनगणना पुस्तिका, जिल्हा गॅझेटिअर, भूगोलाचे विविध संदर्भ ग्रंथ,

आर्थिक व सामाजिक समालोचन ही पुस्तिका महत्त्वाचे स्तोत्र आहे. रायगड जिल्हा परिषद, जिल्हाधिकारी कार्यालय, मृदा संवर्धन विभाग, जलसिंचन विभाग, रायगड जिल्हा कृषी विभाग, इंटरनेटवरील विविध संकेतस्थळांवरील माहितीचा आधार घेतला आहे.

संशोधन अभ्यास पद्धती :

प्रस्तुत शोधनिबंधात मिळवण्यात येणारी प्राथमिक व द्वितीयक माहितीचे विश्लेषण विविध टप्पे व आलेखाच्या साहाय्याने केले आहे. हे विश्लेषण करण्यासाठी वेगवेगळ्या पद्धतीचा वापर केला आहे.

विषय विवेचन आणि विश्लेषण

भात लागवडीच्या सुधारित पद्धती : भात हे उष्ण कटिबंधातील पीक असून त्यास उष्ण व दमट हवामानाची गरज असते. पीकवाढीच्या कालावधीतील सरासरी तापमान 24 ते 32 अंश से.ग्रे. पोषक असते. चांगले उत्पादन येण्यास हवेतील सरासरी आद्रता 65 टक्के लागते. या पिकास सरासरी 1000 मि.मी. पेक्षा जास्त पावसाची आवश्यकता असते. भाताचे पीक निरनिराळ्या प्रकारच्या जमिनीत येते. मात्र जमिनीच्या प्रकाराप्रमाणे भाताचे प्रकार लावण्यात येतात. जमिनीचा सामू (पी. एच.) 5 ते 8 या दरम्यान असल्यास पिकापासून अधिक उत्पादन मिळते.

1) चारसूत्री लागवड भात शेती तंत्रज्ञान

चारसूत्री लावणी भात शेती तंत्रज्ञान सोपे, शास्त्रीयदृष्ट्या कार्यक्षम, एकूण लागवडीचा खर्च कमी करणारे, वातावरणाचे प्रदूषण टाळणारे व भातशेती निश्चितपणे फायदेशीर करणारे आहे.

सूत्र 1 भात पिकाच्या अवशेषांतील (तूसाचा व पेंढ्याचा) सिलिकॉन व पालाश या अन्नद्रव्यांचा फेरवापर अ) भाताच्या तुसाची काळी राख रोपवाटिकेत बी पेरण्यापूर्वी मिसळणे. गादीवाफ्यात भाताचे बी पेरण्यापूर्वी प्रति चौरस मीटर 1 कि.ग्रॅ. या प्रमाणात 4 ते 7 सें. मी. खोलीपर्यंत मातीत मिसळावी व नंतर प्रक्रिया केलेले भाताचे बी त्याच ओळीत पेरावे.ब) भाताचा पेंढा लावणी पूर्वी शेतात गाळणे. भाताचा पेंढा पहिल्या नांगरणीच्या वेळी हेक्टरी अंदाजे 2 टन या प्रमाणात शेतात गाडून घ्यावा.

फायदे:

1. भात पिकाला सिलिकॉन व पालाश यांचा पुरवठा होतो सेंद्रिय पदार्थात वाढ होते .
2. रोपे निरोगी व कणखर होतात .
3. रोपांच्या अंगी खोडकिडा यांना प्रतिकार करण्याची क्षमता वाढते रासायनिक औषधे न वापरल्यामुळे वातावरणाचे प्रदूषण टळफायदे
4. भाताचे उत्पादन वाढण्यास मदत होते.

सूत्र 2 वनशेती तंत्रज्ञानाचा उपयोग करून गिरीपुष्प (ग्लिरिसिडीया) हिरवळीच्या खताचा वापर- गिरीपुष्प हिरवळीचे खत (2 ते 4 गिरिपुष्पाच्या झाडाची हिरवी पाने किंवा अंदाजे 30 कि.ग्रॅ. प्रति गुंठा) चिखलणीपूर्वी 7 ते 8 दिवस अगोदर पसरावीत व नंतर चिखलणी करून रोपाची लावणी करावी

हिरवळीचे खत वापरण्याची सोपी पद्धत: गिरिपुष्पाच्या फांद्या जमिनीपासून 30 ते 40 सें.मी. उंचीवर तोडाव्यात. त्याच झाडाच्या तुटलेल्या फांद्या चिखलीपूर्वी 6 ते 8 दिवस अगोदर खाचरात पसराव्यात. आठवड्यात खांद्यावरील पाने गळून पडतात. उरलेल्या फांद्या गोळा करून जळणासाठी इंधन म्हणून वापराव्यात. चिखलणी करून गळून पडलेली पाने चिखलात व्यवस्थित मिसळावीत नंतर लावणी करावी.

फायदे-

1. भात रोपांना सेंद्रिय-नत्र वेळेवर मिळाल्यामुळे भाताचे उत्पादन वाढण्यास मदत होते.
2. खाचरात सेंद्रीय पदार्थ मिसळल्यामुळे जमिनीची जडणघडण सुधारुन उत्पादनक्षमता वाढण्यास मदत होते.
3. सेंद्रिय पदार्थ मर्यादित प्रमाणात गाडल्यामुळे भात खाचरांतून निर्माण होणाऱ्या मिथेन वायूचे प्रमाण कमी होते.
4. गिरिपुष्पाच्या झाडापासून उंदीर लांब पळतहोते
5. गिरिपुष्पाच्या सुक्या फांद्यांचा स्वयंपाकासाठी इंधन म्हणून उपयोग होतो.

सूत्र 3 -सुधारित किंवा संकरित जातीच्या भाताची रोपे (25 चुड / चौ.मी.) वापरून चुडाची नियंत्रित लावणी.

1) भाताच्या तुसाची काळी राख रोपवाटिकेमध्ये वापरून तयार केलेली रोपे लावणीसाठी वापरावीत.

2) लावणी करताना प्रत्येक चुडात 2 ते 3 रोपे लावावीत. हायब्रीड भातासाठी एका ठिकाणी एक रोप लावावे.

3) रोपे सरळ व उथळ लावावीत.

4) नियंत्रित लावणी करावयाच्या सुधारित दोरीवर 25 सें.मी.व 15 सें.मी. आलटून पालटून अंतरावर खुणा कराव्यात शेताच्या बांधावर जवळून लावणी सुरुवात करावी सुधारित लावणी दोरीवर 15 सें.मी. अंतरावर असलेल्या (प्रत्येक 2 ते 3 रोपे) प्रथम एक व नंतर दुसरा लावावा. त्यानंतर अंदाजे 15 सें.मी. पुढे आणखी तिसरा व चौथा चुड लावावा. अशाप्रकारे एकावेळी जोड-ओळ पद्धत वापरून त्याच दोरीत लावणीचे काम पूर्ण करावे. त्यानंतर मार्गदर्शक वापरून 40 सें.मी. दोरी मागे सरकवावी. पुन्हा जोड-ओळ पद्धत वापरून खाचरातील नियंत्रित लावणी पूर्ण करावी. खाचरात अनेक 15 x 15 से.मी. चुडाचे चौकोन व 25 से.मी. चालण्याचे रस्ते तयार होतात.

फायदे:

1. प्रचलित पद्धतीपेक्षा (25 से.मी. x 15 से.मी. अंतर वापरून किंवा 33 चूड/ चौ.मी.) फक्त 25 चूड / चौ.मी. म्हणजे कमी चूड लावल्यामुळे बियाणांची 30 टक्के बचत होते व त्याच प्रमाणात रोपे तयार करण्याचे श्रम व पैसा वाचतो.
2. त्याच प्रमाणात लावणी व कापणी करावी. कापणीवरील मजुरीचा खर्चही कमी होतो. त्यामुळे उत्पादन फायदेशीर होण्यास मदत होते.
3. शेतकऱ्यांना ब्रिकेट्सचा (खताच्या गोळ्यांचा) कार्यक्षम वापर करणे शक्य होते.

सूत्र 4 - नियंत्रित लावणीनंतर त्याच दिवशी प्रत्येक चार चुडांच्या चौकोनात मधोमध सरासरी 2.7 ग्रॅम वजनाची (युरिया-डीएपी) 1 ब्रिकेट (खताची गोळी) हाताने 7 ते 10 सें.मी. खोल खोचणे.

1) युरिया-डीएपी खत (40:60 मिश्रण) वापरून ब्रिकेट्स (27 ग्रॅम 10 ब्रिकेट्स) उशीच्या आकारात तयार करता येतात. 2) या रासायनिक मिश्र खतात नत्र व स्फुरद ही अन्नद्रव्ये 4:2 या प्रमाणात असतात. 3) प्रति गुंठ्यास 625 ब्रिकेट्स 1.75 कि.ग्रॅ. पुरतात. 4) खताची मात्रा (प्रति हेक्टरी) : 57 कि.ग्रॅ. नत्र +29 कि.ग्रॅ. स्पुरद वापरावे.

नियंत्रित लावणीनंतर त्याच दिवशी ब्रिकेट (युरिया-डीएपी) हाताने 7 ते 10 सें.मी. खोल रोवण्याचे फायदे-

1. लावणी भातासाठी नत्र व स्फुरद वापरण्याची ही कार्यक्षम पद्धती आहे.
2. पाण्याबरोबर नत्र व स्फुरदयुक्त खते वापरू वाहून जात नाही. खतामुळे होणारे प्रदूषण टळते. दिलेल्या खतापैकी 80 टक्के पर्यंत नत्र भातपिकास उपयोगी पडते.
3. खतात 40 टक्के पर्यंत बचत होते व त्या प्रमाणात खताचा खर्च कमी होऊन नफ्यात वाढ होते.
4. ब्रिकेट्स खोल खोचल्यामुळे अन्नद्रव्य तणाला मिळत नाहीत. तर तणाचा त्रास कमी होतो. तणनाशक न वापरल्यामुळे प्रदूषण टळते.
5. भाताचे उत्पादन निश्चित वाटते. भात शेती फायद्याची होते.

2) 'श्री' पद्धत : भात लागवडीची सुधारित पद्धत म्हणून 'श्री' या पद्धतीचा समावेश होतो. 'श्री' म्हणजे (SRI - System of Rice Intensification) या पद्धतीने भात लागवड करण्याची सुरुवात सन 1980 या दशकात मादागास्कर या देशात झाली सुमारे सन 1997 पर्यंत ही पद्धत बाहेरच्या देशातील लोकांना माहीतही नव्हती. 'श्री' पद्धतीवर हेन्री डे लॉनेन यांनी मादागास्कर मध्येच संशोधन केले व सन 1999 मध्ये ही पद्धत नानजिंग विद्यापीठ चीन येथे पहिल्यांदा घेण्यात आली. सन 2000 पासून ही पद्धत भारतासह एकूण 15 भात उत्पादक देशांमध्ये वापरण्यात येते.

रोपवाटिका व्यवस्थापन : खरीप हंगामासाठी भाताची पेरणी 15 मे ते 25 जून पर्यंत गादीवाफ्यावर करावी पद्धत एक : रोपवाटिकेसाठी चार फूट रुंदीचा गादीवाफा तयार करावा. गादी वाफ्याची लांबी मात्र शेत व खाचराच्या उपलब्ध क्षेत्रानुसार असावी. सर्वसाधारणपणे 2 किलो बियाणे प्रति एकर या प्रमाणात लागते पुनर्लागवडीसाठी 8 ते 12 दिवसांची रोपे वापरत असल्यामुळे गादी वाफ्याची उंची 5 ते 6 इंच असावी.

गादीवाफा तयार करताना :

1 ला थर : एक इंच जाडीचा शेणखताचा थर

2 रा थर : 1 1/2 इंच माती

3 रा थर : 1 इंच जाडीचा शेणखताचा थर

4 था थर : 2 1/2 इंच माती

हे चारही थर चांगल्या प्रकारे एकत्र करून गादीवाफा तयार करावा व यावर बियाणे ओळीत पेरावे.

पद्धत दोन : रोपवाटिकेसाठी चार फूट रुंदीचा गादीवाफा तयार करावा. या गादी वाफ्यावर 50 मायक्रॉन जाडीचा प्लॅस्टिक कागद अंथरावा. या कागदाला ठिकठिकाणी छिद्रे पाडावीत. म्हणजे पाणी कागदावर थांबणार नाही. नंतर 25 मि.मी. रुंदी असलेल्या लोखंडी पट्टीची साधारणपणे 1 मी X 1 मी चौकट तयार करून या कागदावर ठेवावी. यात 1:1:1 या प्रमाणात चांगले चाळुन घेतलेले शेणखत, माती व वाळू यांचे मिश्रण भरावे. ते एक सारखे करावे. यावर प्रक्रिया केलेले आणि मोड आलेले बियाणे पेरावे. यावर झारीने पाणी शिंपडावे नंतर पेंढ्याच्या सहाय्याने झाकून घ्यावे. रोपवाटिकेतील रोपांना दररोज आवश्यकतेनुसार पाणी द्यावे.

निष्कर्ष व शिफारशी:

रायगड जिल्ह्यातील लोकांचे भात हे प्रमुख अन्नधान्य पीक आहे. दररोजच्या आहारात भाताचा समावेश असतो. जिल्ह्यात खरीप हंगामात भात पिकाची लागवड केली जाते. लावणी पद्धतीचा वापर जिल्ह्यात विस्तृत प्रमाणात केला जातो. वेळेवर व पुरेशा प्रमाणात शेतमजुरांच्या उपलब्धतेतील अडचणींमुळे रोप लावणी करताना अधिक कालावधी लागतो. सेंद्रिय व रासायनिक खतांचा शिफारशीपेक्षा कमी आणि असंतुलित वापर करतात. यामुळे भात उत्पादकता ही सरासरीपेक्षा कमी असून, उत्पादकता वाढीसाठी सुधारित भात लागवड पद्धतीचा अवलंब करण्याची आवश्यकता आहे.

संदर्भ ग्रंथ सूची :

1. महाराष्ट्रातील शेती आणि शेतकरी – शांताराम बोकील, अभिनंदन प्रकाशन : कोल्हापूर पहिली आवृत्ती 2007.
2. कृषी आणि ग्रामीण अर्थशास्त्र - विजय कविमंडन, मंगेश प्रकाशन : नागपूर, सहावी आवृत्ती 2012
3. भारताचा कृषी भूगोल – प्रा. के. ए. खतीब, मेहता पब्लिशिंग हाऊस : पुणे, द्वितीय आवृत्ती 1991.
4. भारताचा भूगोल - जयकुमार मगर, विद्या प्रकाशन: नागपूर, 2001, पृष्ठ क्र. 45.
5. कृषी भूगोल - माजिद हुसेन, रावत पब्लिकेशन्स : जयपुर 2014
6. सुरेश एकनाथ जगताप, (संपादक) शेतकरी : जून 2021 पृष्ठ क्र.9.
7. http://www.krishi.maharashtra.gov.in/Site/Upload/Pdf/kolha_Rice.pdf
8. https://mr.vikaspedia.in/agriculture/crop-production/cereal/92d93e924-93293e917935921940-93593f93792f940-92e93e93993f924940
9. https://krushi.world/plantation/rice-cultivation-method-01538/
10. https://www.agrovan.com.
11. https://www.google.com/url?sa=t&source=web&rct=j&url=https://vishwakosh.marathi.gov.in/30041/&ved=2ahUKEwi2o6qj1YT3AhXKxYsBHXOEC24QFnoECAsQAQ&usg=AOvVaw3SlN75xNSfZ5oT7Fu6LVWa

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2Issue-13May-Jun2022

बोळेगाव या गावातील कुटूंबनियोजनाचा भौगोलिक अभ्यास

प्रा.बिचकुंदे शशिकांत संग्राम
एम.ए.एम.फील.सेट.कै.ब.पा.ए.महाविद्यालय,उदगीर.ता.उदगीर जि.लातूर

प्रस्तावना:

भारतास कुटुंबनियोजनाची विशेष गरज आहे. सध्या भारताची लोकसंख्या प्रतिवर्षी २.५% इतक्या झपाट्याने वाढत आहे. जगाच्या एकूण क्षेत्रफळाच्या २.४% क्षेत्रफळ असलेल्या भारतास आज एकूण जागतिक लोकसंख्येच्या १६.८% लोकांस पोसावे लागत आहे.

राष्ट्राचा आर्थिक विकास झपाट्याने व्हावा, या उद्देशाने कुटुंबातील संततीच्या संख्येवर जाणूनबुजून घालण्यात येणारी मर्यादा. लोकसंख्यावाढीमुळे उद्‌भवणाऱ्या आर्थिक अडचणी टाळता याव्यात, म्हणून अशी मर्यादा घालण्याची आवश्यकता भासते. लोकसंख्येची वाढ पर्याप्त मर्यादेपलीकडे म्हणजेच अनियंत्रितपणे होत गेल्यास, ती राष्ट्राच्या आर्थिक विकासाच्या मार्गात अनेक अडथळे आणते आणि त्यामुळे जीवनमान सुधारणे कठीण होते; राष्ट्रीय उत्पन्नाची दरडोई वाढ फारच मंदगतीने होते;

अन्नधान्याचा पुरवठा अपुरा पडून त्याची मोठ्या प्रमाणावर आयात करावी लागते; लोकसंख्येतील अनुत्पादक वयोगटातील व्यक्तींचे व बेकारीचे प्रमाण वाढत जाते व बचतीमध्ये वाढ करून आर्थिक विकासास आवश्यक तेवढी भांडवल-संचिती करणेही जड जाते. म्हणूनच राष्ट्राचा आर्थिक विकास त्वरित होऊन सरासरी कौटुंबिक जीवनमान सुधारावे, ह्यासाठी लोकसंख्यावाढीवर कुटुंबनियोजनाद्वारे नियंत्रण घालण्याची गरज भासते. कुटुंबातील संततीची संख्या नियंत्रित करण्याबरोबरच दोन मुलांमध्ये योग्य अंतर ठेवणे, हेही कुटुंबनियोजनाचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

संततिनियमनास प्रथमतः बऱ्याच राष्ट्रांमध्ये शासकीय विरोध होता व त्याचा प्रचार करण्याविरुद्ध कायदेही संमत करण्यात आले होते. हळूहळू हा शासकीय विरोध कमी होत गेला. प्रचारासाठी शासनांची संमती मिळत गेली व नंतर प्रचारामध्ये शासन स्वतः सहभागी होत गेले. स्वीडनच्या शासनानेच संततिनियमनाच्या प्रसारास प्रथम हातभार लावला व नगरपालिकांच्या संततिनियमन केंद्रांना आर्थिक मदत देऊ केली. इतर राष्ट्रांतील शासनांनीही संततिनियमनाच्या खाजगी संस्थांनी केलेल्या प्रयत्नास सहकार्य दिले. १९५० पासून भारतातही संततिनियमनाच्या प्रयत्नांना सरकारने मदत केली. १९४८ पासून जपानमध्ये गर्भपात कायदेशीर मानला जाऊ लागला व हळूहळू गर्भपाताचे प्रमाण कमी होत जाऊन अन्य मार्गां चा वापर अधिक प्रमाणावर होऊ लागला.

संततिनियमनाच्या विविध साधनांचा वापर फार प्राचीन काळापासून होत आला आहे. ख्रिस्तपूर्व १८५० ते १५५० या काळातील काही ईजिप्शियन लेखांतून व प्राचीन हिब्रू वाङ्मयातून गर्भधारणा टाळण्याच्या अनेक उपायांचा उल्लेख आढळतो. ख्रिस्तपूर्व चौथ्या शतकात ॲरिस्टॉटल याने गर्भावरोधाच्या उपायांचे वर्णन केलेले आहे. त्याचप्रमाणे इ. स. दुसऱ्या शतकात सोरेनस या प्रसूतिशास्त्रवेत्त्याने संततिनियमनाच्या पद्धतीचे सविस्तर विवेचन करून गर्भपाताऐवजी गर्भधारणा टाळणे हा अधिक श्रेयस्कर मार्ग होय, यावर भर दिला. ग्रीक व रोमन काळांत स्त्रियांचे आरोग्य सुरक्षित राखण्याच्या दृष्टीने गर्भावरोधास विशेष महत्त्व दिले जाई; परंतु गर्भसंभव टाळण्याच्या पद्धतींचा अवलंब फारच थोड्या नागरिकांना करता येत असे. गर्भावरोधाच्या तंत्राचा सार्वजनिक प्रसार मात्र एकोणिसाव्या शतकापर्यंत झाला नव्हता.

कुटूंब नियोजन कार्यक्रम:

भारतात १९५२ साली म्हणजेच पहिल्या पंच'वार्षिक योजनेत कुटूंब नियोजन कार्यक्रमाची सुरवात झाली .तत्कालीन मुबई प्रातांत सण १९५७ पासून या कार्यक्रमाची सुरवात झाली .सण १९७१ पासून आजपर्यंत या कार्यक्रमात अनेक घटकाची भर पडली .सण १९७८ साली कुटूंब नियोजन कार्क्रमाचे नाव "कुटूब कल्याण कार्यक्रम " असे करण्यात आले .तर सण १९९७ सालापासून हा कार्यक्रम "'प्रजनन आणि बालसंगोपन " या नावाने ओळखला जाऊ लागला. "हम दो, हमारे दो " हे या कार्यक्रमाचे हिंदी भाषेतील घोषवाक्य आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये:

१) लोकसंख्या विषयक धोरणाचा नेसर्गिक घटकावरील होणाऱ्या परिणामाचा अभ्यास करणे.
२) अभ्यास क्षेत्रातील कुटूंब नियोजन नियोजनाचा अभ्यास करणे.
३) कुटूंब नियोजनाचा लातूर जिल्ह्यातील सामाजिक व आर्थिक विकासावरील परिणामाचा अभ्यास करणे.

माहिती स्तोत:

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी माहिती मिळवण्यासाठी प्राथमिक व दुय्यम स्वरूपातील माहीति स्त्रोताच्या उपयोग केला जाणार आहे .प्राथमिक माहिती मिळविण्यासाठी सर्वेक्षण मुलाखत व प्राश्नावली. चा उपयोग करण्यात आला आहे .लातूर जिल्ह्यातील मुख्य चिकित्सा अधिकारी,उप मुख्य चिकित्सा अधिकारी ,मेडिकल ऑफिसर अशा कुटूंब नियोजन संदर्भातील अधिकारी याच्या मुलाखती घेऊन प्राथमिक स्वरूपाची माहिती घेण्यात आली.

कुटूंब नियोजन संरचना:

कुटूंब नियोजन कार्यक्रमाची यशस्वी अमलबजावणी करण्यासाठी भारतात प्रत्येक राज्यात, "कुटूंब. नियोजन ब्युरो " ची स्थापना करण्यात आली आहे. तसेच शहरी भागात "स्वस्थ नियोजन केंद्र "ची स्थापना केली. तर ग्रामीण भागात "प्राथमिक आरोग्य केंद्राची " स्थापना केली. वरील प्रमाणे जिल्ह्यात कुटूंब नियोजन कार्यक्रम संरचना प्रमाणे कुटूंब नियोजन कार्यक्रमाची उद्दिष्टे, ध्येय, उपलब्धी यशस्वी पणे राबविण्याचा प्रयत्न केला जातो.

विषय विवेचन:

प्रस्तुत विषय विवेचनात कुटूंब नियोजनाचा अभ्यास करण्यात आला आहे. त्यामध्ये लातूर जिल्ह्यातील कुटूंब नियोजनाचे सर्वेक्षण करताना धानोरा या गावातील कुटूंबाचे सर्वेक्षण करण्यात आले.त्यानुसार माहितीचे विश्लेषण.

- **बोळेगाव(Bolegaon)**

प्राकृतिक स्वरूप:

लातूर जिल्ह्यातील देवणी तालुक्यातील बोळेगाव हे गाव ५०० ते ६०० मी.उंचीच्या दरम्यान आहे. बोळेगाव या गावाची स्थान १८.१९'६८.६" उत्तर अक्षांश ते ७७.००'७१.७" पूर्व रेखांश आहे. या गावाचे क्षेत्र ५८४.३१ चौ.हेक्टर. असून घराची संख्या २२३ इतकी आहे. या गावाची कृषी प्रधान अर्थ व्यवस्था आहे. या गावात धनेगाव सिंचन प्रकल्पामुळे संपूर्ण जमीन ही ओलिताखाली आली आहे. येथील जमीन ही सुपीक व काळी कसदार आहे तर डोगर माथ्यावरील लाल मृदा आहे. मान्सून पासून पाऊस मिळतो खरीप व रब्बी पिकाची येथे पेरणी करून उत्पन्न मिळवले जाते. या गावात बागायती शेती केली जाते. हवामान ऋतूनुसार शुष्क व कोरडे असते.

सांस्कृतिक स्वरूप:

२०११ च्या जनगणनेनुसार येथील लोकसंख्या ९१० (२०१८-१९ मध्ये लोकसंख्या १०३२ असून यात पुरुष ५४२ तर स्त्रियांची संख्या ४९० इतकी आहे.) (Censas MIDDS Code.no. :- 560932). या मध्ये ७६ टक्के लोक हे हिंदू धर्माचे आहेत तर २४ टक्के लोक हे इतर धर्माचे आहेत. आज म्हणजे २०१८-१९ सर्वेक्षणानुसार इतर धर्माची लोकसंख्या ही जवळपास ३२ टक्के पर्यंत झाली आहे. या गावाची साक्षरता सरासरी ८० टक्के दिसून येते. यात पुरुषाची साक्षरता जवळपास ९० टक्के इतकी आहे. स्त्रियांची साक्षरता प्रमाण कमी दिसून येते.

येथील प्राथमिक आरोग्य केंद्र वलांडी असून या गावात महीन्याच्या दुसऱ्या गुरुवारी लसीकरण घेतले जाते. आरोग्याच्या व इतर कुटुंब नियोजनाच्या माहीती मोहीम ही डोर टू डोर या माध्यमातून आशा कार्यकर्ता सतत करत असतात. काही अडचण निर्माण झाल्यास ते महाराष्ट्र आरोग्य विभागाचा संपर्क क्रमांक १०४ या वर संपर्क करतात.

(बोळेगाव या गावाचा गुगल मॅप)




(माहीती स्तोत्र :- गुगल मॅप)

बोळेगाव या गावाची सर्वेक्षणातून जी परिस्थिती समोर आली त्या नुसार गावातील ७० कुटूंबाचे प्रश्नावलीच्या माध्यमातून सर्वेक्षण केले त्या मध्ये ४० कुटुंब हिंदू धर्माचे, ०५ कुटुंब मुस्लीम धर्माचे (या गावात एकूण कुटुंब संख्येच्या फक्त ०८ कुटुंब हे मुस्लीम धर्माचे आहेत या पैकी आपण ०५ कुटूंबाचे सर्वेक्षण घेत आहोत.) २५ कुटुंब नवं बौध्द व बौध्द धर्माचे आचरण करणारे आहेत. एकूण कुटुंब संख्येच्या जवळपास ३३ टक्के कुटूंबाचे या दरम्यान सर्वेक्षण घेण्यात आले आहे.

कुटूंबाचे प्रश्नावली च्या माध्यमातून सर्वेक्षण (टक्केवारी)

अ.क्र.	कुटूंबाचा धर्म	कुटूंबाची संख्या	कुटुंब नियोजनाचा वापर करणारे कुटुंब		गर्भ निरोधकांचा वापर करणारे कुटुंब		नसबंदी केलेले कुटुंब		नसबंदी करण्याचा विचार करणारे कुटुंब	
			संख्या	टक्के	संख्या	टक्के	संख्या	टक्के	संख्या	टक्के
१	हिंदू	४०	३०	७५	२२	५५	२०	५०	१८	४५
२	मुस्लीम	०५	०१	२०	०४	८०	०१	२०	००	००
३	बौध्द	२५	१०	४०	२०	८०	०५	२०	२०	८०

(माहीती स्तोत्र :- सर्वेक्षणाच्या माध्यमातून) **(सारणी क्र. :- १)**



(आलेख क्र. :- १)

लातूर जिल्ह्यातील बोळेगाव या गावाचे सर्वेक्षण केल्यावरून हिंदू धर्मातील ज्या ४० कुटूंबाचे सर्वेक्षण केले त्यामध्ये ३० कुटुंब हे कुटुंब नियोजनाचा वापर करणारे दिसून येतात तर २२ कुटुंब हे गर्भ निरोधकांचा यात (निरोध, गर्भ निरोध गोळ्या, तांबी, फेस येणाऱ्या गोळ्या, काही नैसर्गिक पद्धत, काही आत्मसंयम.इत्यादी.) वापर करणारे दिसून आले. आणि २० कुटुंब हे नसबंदी केलेले व १८ कुटुंब हे नसबंदीचा विचार करणारे आहेत. तर मुस्लीम धर्माचे ०५ कुटूंबाचे सर्वेक्षण केले यात ०१ कुटुंब हे कुटुंब नियोजनाचा वापर करणारे दिसून येतात तर ०४ कुटुंब हे गर्भ निरोधकांचा यात (निरोध, गर्भ निरोध गोळ्या, तांबी, फेस येणाऱ्या गोळ्या, काही नैसर्गिक पद्धत, काही आत्मसंयम.इत्यादी.) वापर करणारे दिसून आले. आणि ०१ कुटुंब हे नसबंदी केलेले व एकही कुटुंब नसबंदीचा विचार करत नाहीत. आणि बौध्द धर्माचे २५ कुटूंबाचे सर्वेक्षण केले यात १० कुटुंब हे कुटुंब नियोजनाचा वापर करणारे दिसून येतात तर २० कुटुंब हे गर्भ निरोधकांचा यात (निरोध, गर्भ निरोध गोळ्या, तांबी, फेस येणाऱ्या गोळ्या, काही नैसर्गिक पद्धत, काही आत्मसंयम.इत्यादी.) वापर करणारे दिसून आले. आणि ०५ कुटुंब हे नसबंदी केलेले व २० कुटुंब हे नसबंदीचा विचार करणारे आहेत.


यावरूनच तीनही धर्माचा विचार व यावरून बोळेगाव गावाची लोकसंख्या विचारात घेतल्यास अलीकडील काळात हिंदू व बौध्द धर्माची आणि मुस्लीम धर्माची संख्या मध्यम गतीने वाढ झालेली दिसून येते.

कुटुंब नियोजनामुळे आर्थिक स्तर (टक्केवारी)

अ.क्र.	कुटूंबाचा धर्म	कुटूंबाची संख्या	कुटुंब नियोजनामुळे उच्च आर्थिक स्तर असणारे कुटुंब		कुटुंब नियोजनामुळे मध्यम आर्थिक स्तर असणारे कुटुंब		कुटुंब नियोजनामुळे सामान्य आर्थिक स्तर असणारे कुटुंब	
			संख्या	टक्के	संख्या	टक्के	संख्या	टक्के
१	हिंदू	४०	०५	१२.५	११	२७.५	२४	६०
२	मुस्लीम	०५	००	००	०१	२०	०४	८०
३	बौध्द	२५	०१	०४	०८	३२	१६	६४

(माहीती स्तोत्र :- सर्वेक्षणाच्या माध्यमातून) **(सारणी क्र. :- २)**

सर्वेक्षण केलेल्या कुटूंबाचे आर्थिक स्तर वरून विवेचन केल्यास हिंदू धर्माचा ४० कुटुंब पैकी ०५ कुटूंबाची आर्थिक स्तर उच्च दिसून येतो. ११ कुटूंबाचा आर्थिक स्तर मध्यम दिसून येतो. तर २४ कुटूंबाचा आर्थिक स्तर सामान्य दिसून येतो. तसेच मुस्लीम धर्माच्या आर्थिक स्तराचे विवेचन ०५ कुटुंब पैकी एकही कुटूंबाची आर्थिक स्तर उच्च दिसून येत नाही. ०१ कुटूंबाचा आर्थिक स्तर मध्यम दिसून येतो.




(आलेख क्र. :- २)

तर ०४ कुटूंबाचा आर्थिक स्तर सामान्य दिसून येतो. आणि बौध्द धर्माचे आर्थिक स्तराचे विवेचन २५ कुटुंब पैकी ०१ कुटूंबाची आर्थिक स्तर उच्च दिसून येतो. ०८ कुटूंबाचा आर्थिक स्तर मध्यम दिसून येतो. तर १६ कुटूंबाचा आर्थिक स्तर सामान्य दिसून येतो. यावरूनच असे दिसून येते कि ज्या धर्मात कुटुंब नियोजनांचे योग्य नियोजन करण्यात आले आहे. त्या कुटूंबाचे आर्थिक स्तर वाढलेला दिसून येतो.

कुटुंब नियोजनामुळे सामाजिक स्तर (टक्केवारी)

अ.क्र.	कुटूंबाचा धर्म	कुटूंबाची संख्या	कुटुंब नियोजनामुळे उच्च सामाजिक स्तर असणारे कुटुंब		कुटुंब नियोजनामुळे मध्यम सामाजिक स्तर असणारे कुटुंब		कुटुंब नियोजनामुळे सामान्य सामाजिक स्तर असणारे कुटुंब	
			संख्या	टक्के	संख्या	टक्के	संख्या	टक्के
१	हिंदू	४०	०९	२२.५	१४	३५	१७	४२.५
२	मुस्लीम	०५	०१	२०	०२	४०	०२	४०
३	बौध्द	२५	०२	०८	०५	२०	१८	७२

(माहीती स्तोत्र :- सर्वेक्षणाच्या माध्यमातून) (सारणी क्र. :- ३)



(आलेख क्र. :- ३)

सर्वेक्षण केलेल्या कुटूंबाचे सामाजिक स्तर वरून विवेचन केल्यास हिंदू धर्माचा ४० कुटुंब पैकी ०९ कुटूंबाची सामाजिक स्तर उच्च दिसून येतो. १४ कुटूंबाचा सामाजिक स्तर मध्यम दिसून येतो. तर १७ कुटूंबाचा सामाजिक स्तर सामान्य दिसून येतो. तसेच मुस्लीम धर्माच्या सामाजिक स्तराचे विवेचन ०५ कुटुंब पैकी ०१ कुटूंबाची सामाजिक स्तर उच्च दिसून येतो. ०२ कुटूंबाचा सामाजिक स्तर मध्यम दिसून येतो. तर ०२ कुटूंबाचा सामाजिक स्तर सामान्य दिसून येतो. आणि बौध्द धर्माचे सामाजिक स्तराचे विवेचन २५ कुटुंब पैकी ०२ कुटूंबाची सामाजिक स्तर उच्च दिसून येतो. ०५ कुटूंबाचा सामाजिक स्तर मध्यम दिसून येतो. तर १८ कुटूंबाचा सामाजिक स्तर सामान्य दिसून येतो. यावरूनच असे दिसून येते कि ज्या धर्मात कुटुंब नियोजनांचे योग्य नियोजन करण्यात आले आहे. त्या कुटूंबाचे सामाजिक स्तर वाढलेला दिसून येतो.

बोळेगाव या गावाची सर्वेक्षण अंतर्गत असे दिसून आले की ज्या कुटूंबाची संख्या कमी अशा कुटूंबाची आर्थिक व सामाजिक सधनता दिसून येते. या गावात मुस्लीम धर्मीय संख्या नाही. पण काही हिंदू व बौध्द धर्मीय लोक ज्याची कुटुंब सदस्य संख्या जास्त म्हणजेच कुटुंब नियोजनाचा वापर कमी किंवा करण्यास वेळ घेतल्या मुळे सदस्य संख्या जास्त आणि कुटूंबाचे आर्थिक नियोजन कोलमोडले यातूनच सामाजिक नियोजन सुद्धा कमी झाले. याचाच परिणाम म्हणजे लोकसंख्या वाढ परिणामी भौगोलिक परिस्थितीवर विपरीत परिणाम झालेला दिसून येतो.

निष्कर्ष :

१) लातूर जिल्ह्यातील बोळेगाव या गावाची सर्वेक्षित कुटूंबाचे आकलन केल्यास ज्या कुटूंबाने कुटूंब नियोजन केले आहे त्याचे आर्थिक व सामाजिक स्तर सुधारलेला दिसून येतो.

२) " कुटूंब लहान सुख महान " या म्हणी नुसार कुटूंबाची संख्या हि त्याच्या प्रत्येक घटकावर परिणाम करते.

३) सर्वेक्षित कुटूंबाचे आकलन केल्यास गावातील लोकसंख्या वाढीचे आकलन होते.

४) लातूर जिल्ह्यातील बोळेगाव या गावाची सर्वेक्षित कुटूंबाचे आकलन केल्यास कोणत्या घटकावर अधिक भर देण्याची गरज आहे याचे आकलन होते.

५) यावरून वाढत्या लोकसंख्येचा प्राकृतिक घटकावरील परिणाम लक्षात येतो.

संदर्भ सूची :

१) लोकसंख्या भूगोल (डॉ.शेटे ,डॉ.शहापूरकर ,डॉ .सुरेश फुले)

२) लोकसंख्या भूगोल (डॉ.घारपुरे विठ्ठल)

३) population Geography (ए.बी.सवंदी)

४) जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन (२०११ ते २०१८).

५) परिवारनियोजन भूगोल (डॉ.दिनेश मोहन).

६) www.google.com.

७) www.larujilhgov.com.

८) www.environmental.science.com.

९) लातुर जिल्हा आरोग्य पत्रिका (२०११ ते २०१९).

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2Issue-13May-Jun2022

पर्यावरण जागरूकता में जल संरक्षण और प्रदूषण पर वैदिक चिंतन

सुदीप्त कुमार करण
स्टेट ऐडेड कलेज टिचार बाजकुल मिलनी महाविद्यालय

साहित्य समाज जीवन का दर्पण है। साहित्य का समाज से और पर्यावरण का साहित्य से गहरा संबंध है।

सुदूर अतीत में, आदिम लोगों की जीवन शैली प्रकृति के साथ बहुत घनिष्ठ और आध्यात्मिक संबंध थी । बाद के काल में समाज और संस्कृति के विकास और प्रगति के परिणाम स्वरूप उभरे सामाजिक और सांस्कृतिक वातावरण का मानव जीवन और जीवित दुनिया पर गहरा प्रभाव पड़ा । यद्यपि पर्यावरण की सोच बहुत प्राचीन है, पर्यावरण जागरूकता एक आधुनिक मुद्दा है, जिसके बीज हम अपने प्राचीन वैदिक साहित्य, उपनिषद, रामायण महाभारत में और बाद के लोककथाओं में कवियों की साहित्यिक कृतियों में उभरते हुए देखते हैं।

प्राचीन काल में पर्यावरण मानव जीवन में शामिल था। पर्यावरण के तत्वों को मानव दैनिक गतिविधियों, अनुष्ठानों, उपवास और अनुष्ठानों में शामिल किया गया था।

यद्यपि वैदिक युग के ऋषि कवि भूमि के महान सुखों में व्यस्त थे, वे दुनिया और उनके श्रेष्ठ विचारों से चकित थे । प्रकृति की विभिन्न शक्तियों पर चेतन प्राणियों को थोपकर उन्हें क्रांतिदर्शी ऋषियों ने देवत्व के स्तर तक पहुँचाया है ।

'पर्यावरण' शब्द की व्युत्पत्ति परि-आ-वृ - उपसर्ग के साथ वृ धातु के ल्युट् प्रत्यय से हुई है । 'परितः आवरणम्' का अर्थ है कि हमारे आस-पास जो कुछ भी मौजूद है वह पर्यावरण या परिवेश या 'Ecology' से संबंधित है । हम प्रकृति के सिद्धांतों से घिरे हुए हैं । इसलिए प्रकृति के सभी सिद्धांत पर्यावरण के रूप में माने जाते हैं । मनुष्य और प्रकृति एक दूसरे के पूरक हैं । यद्यपि वैदिक काल में कोई पर्यावरणीय समस्या नहीं थी , लेकिन क्रांतिदर्शी वैदिक ऋषियों ने एक ऐसी योजना का संकेत दिया जिसका भविष्य में पर्यावरण पर दूरगामी प्रभाव पड़ेगा ।

पर्यावरण जागरूकता के उस रूप में जल संरक्षण और प्रदूषण पर वैदिक विचारों की चर्चा निम्न प्रकार से की जाती है।

जल का दूसरा नाम जीवन है। प्रत्येक जीवित वस्तु को जीवन निर्वाह के लिए जल की आवश्यकता होती है। घर से लेकर कृषि, औद्योगिक उत्पादन, यात्रा आदि हर चीज के लिए पानी की जरूरत होती है। लेकिन मानव की अदूरदर्शी गतिविधियों के कारण जल प्रदूषण का स्तर दिन-ब-दिन बढ़ता ही जा रहा है। तो दुनिया के अलग-अलग देश इस स्थिति से बाहर निकलने के लिए अलग-अलग कदम उठा रहे हैं। हालाँकि, मुझे लगता है कि हम प्राचीन साहित्य की समीक्षा करके पर्यावरण की रक्षा करने का प्रयास कर सकते हैं।

सभी दार्शनिकों का निर्णय पंचमहाभूत की रचना में जीवन की उत्पत्ति हे । क्षिति, आप, तेज, मरुत् , ब्योम् , - इन पांच महाभूतों में आप या जल विज्ञान को साक्षात् जीवन कहा जाता है । वैदिक ऋषियों ने महसूस किया है कि जल में अमृत और जड़ी बूटियों होती हैं । - 'अपस्वन्तरमृतमप्सु भेषजम् ' ।[1] शतपथ ब्राह्मण में जल को सीधे प्राण कहा जाता है । - 'आपो वै प्राणाः' ।[2] उसी प्रकार 'ऐतरेय ब्राह्मण' भी कहते हैं कि इस प्रकृति का सबसे मूल्यवान अमृत जल है । - ' अमृत वा एतस्मिन् लोके यदापः' ।[3] जल अमृत के समान जीवनदायिनी है । - 'ता जीवला जीवधन्याः प्रतिष्ठाः' ।[4] जल वह अमृत है जो हमें जीवित रखता है । जल शरीर के दोष को नष्ट करता है । - 'अरिप्रा आपो अपो रिप्रमस्मात् ' ।[5]

वास्तव में जल प्रकृति द्वारा प्रदत्त सबसे महत्वपूर्ण संसाधनों में से एक है । संसार की उत्पत्ति जल से है और संसार जल से ही मिटता है । जल के बिना जीवन संभव नहीं है । अथर्ववेदे के भूमि सूक्त में कहा गया है कि पृथ्वी की उत्पत्ति से पूर्व पृथ्वी जल के रूप में विद्यमान थी । - 'यार्णवेअधि सलिलमग्न आसीत् ' ।[6]

भूमिसूक्त के अगले मंत्र में वर्णित जल सर्वत्र विद्यमान है । इसके अलावा पृथ्वी के चारों ओर बहने वाला सार्वभौमिक पानी बिना किसी गलती के दिन-रात टपका रहा है । धेनूरुप वह विश्व हमारे लिए कोई तरह से दूध और ऊर्जा से हमारा अभिषेक करता है। -

"यस्यामापः परिचराः समानीरहोरात्रे अप्रमादंक्षरन्ति ।
सा नो भूमिर्भूरिधारा तयोः दुहामथो उक्षतु वर्चसा " ।।[7]

ऋग्वेदे में पर्जन्यदव के प्रयोजन के लिए तिन सूक्तों का उल्लेख किया गया है । जहां कहा जाता है कि पर्जन्य वर्षा से अन्न उत्पन्न करता है । - 'स नो यवसमिच्छतु' ।[8] वह जड़ी बूटियों और पानी उगाता है । - 'यो वर्धन ओषधीनां यो अपां यो विश्वस्य जगतो देवईशे' ।[9]

उसने बादलों को खोला और उन्हें फाड़ डाला । नतीजतन, मवेशियों को पोषण मिलता है , दवाएं उत्तेजित होती हैं । रोगिस्तान जलभराव और सुलभ हो जाता है ।

ऋग्वेद के एक सूक्त (5/84) में धरती माता की स्तुति की गई है। यह पृथ्वी सूर्य के तेज से गर्म होती है और पूरे विश्व को जीवन देने वाले भगवान पर्जन्य की वर्षा से सिंचित होती है। जल ही जीवन है इसलिए ऋग्वेद में जल को अमृत कहा गया है। पानी में जड़ी-बूटियाँ मौजूद हैं। -

' अप्स्वन्तरमृतप्सु भेषजमपामुत प्रशस्तये' ।[10]

पानी न सिर्फ प्यास बुझाता है, बल्कि औषधि का भी काम करता है। हो सकता है कि वैदिक ऋषियों ने सबसे पहले यह महसूस किया हो कि कुछ बीमारियों का इलाज पानी से किया जाता है। जल सब कुछ धो देता है और पाप भी दूर कर देता है। -

'इदमापः प्रवहत यत् किञ्च दुरितं मयि' ।[11]

कृष्ण-यजुर्वेद में यह भी कहा गया है कि जब पृथ्वी सूर्य की गर्मी से बहुत गर्म होती है, तो बादल बनते हैं और वह बादल बरसता है। -

'यदा खलु असावादित्यो न्यङ्ङ्श्मभिः पर्य्यावर्त्ततेथ अर्षति'।[12]

पार्थिव जल की कल्पना पशुओं की देवी के रूप में की गई है। हमें जल देवी के रूप में शुद्ध करें। - 'आपो अस्मान्मातरः शुद्धयन्तु'।[13]

यह जल रिसने वाला, स्फूर्तिदायक और अमृत समान है और मृत्यु से बचाता है। -

' मृत्योः पाह्योजोअसि, सहोअस्यमृतमसि '।[14]

यह जल रोगनाशक और स्वास्थ्यवर्धक है। -

' ता अस्मभ्यम् अयक्ष्मा अनमीवा '।[15].

यजुर्वेद में जल प्रदूषण पर प्रतिबंध लगा दिया गया है। - ' मा अपो मौषधीर्हिंसीः '।[16] जल संरक्षण के बारे में यह महत्वपूर्ण जानकारी है।

पानी वाष्पित हो जाता है और आकाश में बादल बन जाते हैं। उस बादल से वर्षा के रूप में हमें जो पानी मिलता है वह लगभग प्रदूषण मुक्त होता है। लेकिन जब वह जल वायुमण्डल में प्रवेश कर वर्षा के रूप में पृथ्वी पर आता है तो अनेक प्रकार की गैसें या धूल मिल जाती है और प्रदूषित हो जाती है। कठोपनिषद में यह भी कहा गया है कि दूर-दराज के ऊंचे इलाकों में गीला बारिश का पानी चट्टानी तराई में बह जाता है, यानी बिखरा हुआ और बर्बाद हो जाता है। पहाड़ की चोटियों पर पानी की एक बूंद भी जमा नहीं होती है। - ' यथोदकं दुर्गे वृष्टं पर्वतेषु विधावति '।[17]

साथ ही कहा गया है कि बारिश का पानी पूरी तरह से शुद्ध होता है। - यथोदकं शुद्धे शुद्धमासिक्तं तादृगेव भवति '।[18]

वैदिक साहित्य में हर जगह जल प्रदूषण या जल प्रदूषण के लक्षण देखे जाते हैं। ऋग्वेद के ऋषि की वाणी में प्रकट हुआ शुभ जल हमारी मनोवांछित प्राप्ति के लिए लाभकारी हो। यह जल हम पर सुख-समृद्धि की वर्षा करे। - 'शं नो देवीरभिष्टये आपो भवन्तु पीतये। शं योरभि स्रवन्तु नः'।[19]

पृथ्वी का लगभग एक तिहाई भाग जल है और एक भाग भूमि है। लेकिन वह पानी अधिक क्षारीय है जो जीवन के लिए उपयुक्त नहीं है। इसी तरह बारिश के पानी का सही उपयोग नहीं हो पा रहा है। हालांकि, ऐसा लगता है कि वर्तमान में 5-10 प्रतिशत वर्षा जल का उपयोग आजीविका के लिए किया जा रहा है। वैदिक ऋषि भी वर्षा जल को बहुत उपयोगी मानते हैं। इसलिए उन्होंने संरक्षण को भी महत्व दिया है। अथर्ववेद में एक मंत्र में वर्षा के विज्ञान का उल्लेख है। सूर्य के किरणों से वाष्पीभूत जल शुद्ध हो और पर्जन्य पिता वर्षा के रूप में हमारे अच्छे कर्मों को बढ़ाएं और यज्ञ को सफल बनाएं

' अमूर्या उप सूर्ये याभिर्वा सूर्यः सह। ता नो हिन्वन्त्वध्वरम् '।।[20]

गृह शांति और लंबी आयु की प्रार्थना करने वाले सेवकों को क्षय रोग कलशस्थ जल शाला में ले जाया जा रहा है।

" इमा आपः प्र भराम्ययक्ष्मा यक्ष्मनाशनीः।
गृहानुप प्र सीदाम्यमृतेन सहाग्निना।।" [21]

अथर्ववेद में एक 'आपोदेवता सूक्त' है। जहां जल से संबंधित नदियां, ऊपर, बारी, समुद्र, उदक् आदि पर्यायवाची हैं। इस सूक्त के एक मंत्र में कहा गया है - जल के उचित प्रयोग से मनुष्य की शक्ति, दृष्टि और श्रवण शक्ति में वृद्धि होती है। जल कल्याण के रूप में विद्यमान है। -

" आपो भद्रा घृतमिदाप आसन्नग्नीषोमौ विभ्रत्याप इत्ताः।
तीव्रो रसो मधुपृचामरं गम आ मा प्राणेन सह वर्चसा गमेत् " ।।[22]

हीरा जल पिने से अमृत रूप की तृप्ति होती है। -

" आदित् पश्याम्युत वा शृनोम्या मा घोषो गच्छति माङ् मासाम्।
मन्ये भेजानो अमृतस्य तर्हि हिरण्यवर्णा अतृपं यदा सः "।[23]

इस अथर्ववेद के एक मंत्र में जल स्रोतों के बारे में जागरूकता देखी गई है। मन्त्र में पांच प्रकार के स्रोत सुरक्षित हैं। -

शं न आपो धन्वन्याः शमु सन्त्वनूप्याः।
शं नः खनित्रिमा आपः शमु याः कुम्भ आभृताः शिवा नः सन्तु वार्षिकीः " ।।[24]

1। धन्वन्या (रेगिस्तान, कम वर्षा वाले प्रांतों से प्राप्त पानी)
2। अनूप्या (जलभराव वाले प्रांतों से प्राप्त पानी)
3। खनित्रिमा (उत्खनन, कुआं)
4। कुम्भ आभृता (कुम्भ राशि में एकत्रित जल)
5। वार्षिकी (वर्षा प्रेरित जल)

वर्षा जल को देवता के रूप में पूजा जाता है। इन पांच स्रोतों के अलावा अतिरिक्त सिंधु को वैदिक ऋषियों द्वारा इसका स्रोत माना जाता है।

ऋग्वेद में भी प्राकृतिक और कृत्रिम सिंचाई दोनों का उल्लेख है। -

"या आपो दिव्या उत वा स्रवन्ति खनित्रिमा उत वा याः स्वयंजाः।
समुद्रार्था याः शुचयः पावकास्ता आपो देवीरिह मामवन्तु।।" [25]

अथर्ववेद के प्रथम कान्ड के प्रथम अनुबाक के चौथे सूक्त से छठवें सूक्त तक 'अपां भेषज ' अर्थात जल उपचार सूक्त हैं। इन सभी सूक्तों के चारों मंत्र प्रदूषण मुक्त जल का संकेत देते हैं। ' जल-औषधि ' मंत्रों में सभी लोगों को शांति, राज्य लाभ, विजय-पराजय का अनुभव, धन-लाभ, विघ्न आदि को लाया जाता है। यह सूक्त रोगों को दूर करने और राष्ट्र के पोषण के लिए आवश्यक है। इसके अलावा, इनमें से कुछ मंत्र अत्यंत फलदायी माने जाते हैं। यदि आप 'अम्वयोयन्ति ' आदि मंत्रों का जाप करके या केवल जल में नमक मिलाकर पीने से राष्ट्र के सभी रोग नष्ट हो जाते हैं और पोषण की प्राप्ति होती है।

जल स्नेही है, इसलिए भगवत विभूति को देवी के रूप में नियोजित किया गया है। देवी-देवताओं के बीच स्नेह की प्रचुरता के लिए देवी को बहन, माता आदि के रूप में पूजा जाता है। इसलिए कहा गया है कि हे जल देवियां, ब्रह्मतत्त्व के रूप में परमात्मा को प्रदान करके हमें संतुष्ट करें। हमें वह अमृत प्रदान करें जिससे आपने क्षयकारी ब्रह्मांड को जीवंत किया है। -

' तस्मा अरं गमाम वो यस्य क्षयाय जिन्वथ। आपो जनयथा च नः '। [26]

पंचमसूक्त के पहले तीन मंत्रों का ब्राह्मणों द्वारा नियमित रूप से त्रिसंध्या पर प्रयोग किया जाता है।

' अमूर्या उप सूर्ये याभिर्वा सूर्यः सह ....'। इस मंत्र से परावर्तित सूर्य की किरणों में जल का प्रदूषण अत्यधिक नहीं हो सकता। एक अन्य मंत्र में ' कुम्भ आभृता ' - नामक चिन्ह कुम्भ में जल डालता है और जल का प्रदूषित भाग नीचे चला जाता है तथा जल अपेक्षाकृत प्रदूषण मुक्त हो जाता है। पानी हमारे लिए मां के समान है। -

' आपो अस्मान् मातरः सूदयन्तु '।[27]

तो ऋषि की आवाज गूंज उठी - है जल देवियां, हमें उसी तरह पोषण दें जैसे एक मां अपने बच्चे को उस अनंत लाभकारी सार के रस से पोषित करती है जो आप में है। -

' यो वः शिवतमो रसस्तस्य भाजयतेह नः। उशतीरिव मातरः। '[28]

अथर्ववेद में शुद्ध जल के उपयोग का उल्लेख है। - ' शुद्धाः सतीस्ता उ शुम्भन्त एव '। और अशुद्ध पानी को फेंक दिया जाता है। -

' विभाज्य धीरीतरा जहीतात् '।[29]

अथर्ववेद की ' वृष्टि सूक्त ' पृथ्वी पर वर्षा की वैदिक भावना का प्रतिबिंब है। वास्तविक दुनिया में, तेज गति वाले बौनों की आक्रामकता से लकड़ी के हाथियों को उजागर किया जाता है। बारिश के आगमन के साथ, सभी को पुनर्जीवित करने की आशा बज गई है। - बारिश को जड़ी बूटियों को छिड़कने दो, प्रचुर मात्रा में बारिश भूमि को गौरवान्वित करे। सभी प्रकार की दवाओं का अलग अलग उत्पादन किया जाना चाहिए। -

' अपां रसा ओषधीभिः सचन्ताम्। वर्षस्य सर्गा महयन्तु भूमिं पृथग् जायन्तामोषधयो विश्वरूपाः '।।[30]

वर्षा की अमृत धारा में भोजन की प्रचुरता, औषधीय पौधों, जड़ी बूटियों आदि की वृद्धि, मानव और पशु जीवन का पक्का वादा - पर्यावरण की ये सभी घटनाएं ' वृष्टि सूक्त ' में परिलक्षित होता हैं।

अथर्ववेद के 'भूमि सूक्त' में मातृभूमि के लिए प्रार्थना करें। हम सभी के शरीर के लिए शुद्ध जल डालें। ओर हामारे शरीर से जो जल निकले वह कुकर्मी के पास जाए। मुझे पवित्र जल से पवित्र करो। -

' शुद्ध न आपस्तन्वे क्षरन्तु यो नः सेदुरप्रिये तं निः दध्नः। पवित्रेण पृथिवि मोत् पुनामि '।[31]

जिस प्रकार वेदों के विभिन्न सूक्तों के विभिन्न मंत्रों ने जल पर्यावरण की समस्या और जल प्रदूषण की संभावित समस्याओं पर प्रकाश डाला है , उसी प्रकार कुछ मामलों में इसे रोकने के तरीके का उल्लेख किया गया है।

अंत में, वैदिक युग के लोग हमेशा पृथ्वी के पर्यावरण के रहने के लिए अनुकूल होने की आवश्यकता के बारे में जागरूक थे। इसलिए उन्होंने हमारे लिए जड़ी-बूटी, धुलोक, जल, स्थान और शहद मिलाने की प्रार्थना की है। -

' मधुमती रोषधीर्द्यावं आपो मधुमन्नो भवन्त्वन्तरिक्षम् '।[32]

इन सभी देवताओं के स्तोत्रों से ज्ञान होता है कि प्राचीन भारतीय आर्यों में प्राकृतिक वातावरण का निरीक्षण करने की क्षमता थी और उन्होंने एक पार्थिव पदार्थ को अपने देवता के स्तर तक ऊंचा किया, जो मानव जीवन के लिए अत्यंत सहायक था। इस तरह उन्होंने प्राकृतिक पदार्थ को देवता के स्तर तक उठाकर अनजाने में ही पर्यावरण को गरिमा प्रदान की है। क्योंकि पानी, हवा, बारिश, सूरज सभी पर्यावरण में हैं - इन सभी का आधुनिक सम्भ्यता पर दूरगामी प्रभाव पड़ता है।

सन्दर्भ :

1. अथर्ववेद - 1/1/4/4
2. शतपथ ब्राह्मण - 3/8/2/4
3. ऐतरेय ब्राह्मण - 8/20
4. अथर्ववेद - 12/1/3/5
5. अथर्ववेद - 10/3/124
6. अथर्ववेद - 12/1/8
7. अथर्ववेद - 12/1/9
8. ऋग्वेद - 7/102/1
9. ऋग्वेद - 7/101/2
10. ऋग्वेद - 1/23/19
11. ऋग्वेद - 1/23/22
12. कृष्ण यजुर्वेद - 2/2/10
13. शुक्ल यजुर्वेद - 4/2
14. शुक्ल यजुर्वेद - 10/15
15. शुक्ल यजुर्वेद - 4/12
16. शुक्ल यजुर्वेद - 6/22

17. कठोपनिषद् - 2/1/14
18. कठोपनिषद् - 2/1/15
19. ऋग्वेद - 10/9/4
    अथर्ववेद- 1/6/1
20. अथर्ववेद - 1/1/4/2
21 अथर्ववेद - 3/3/2/9
22. अथर्ववेद - 3/3/3/5
23. अथर्ववेद - 3/3/3/6
24. अथर्ववेद - 1/1/6/4
25. अथर्ववेद - 1/1/5/3
26 अथर्ववेद - 6/5/5/5
27. ऋग्वेद - 7/49/2
28. अथर्ववेद - 1/1/5/2
29. अथर्ववेद - 12/3/1/26, 11/1/2/3
30. अथर्ववेद - 4/3/5/2
31. अथर्ववेद - 12/1/30
32. ऋग्वेद - 4/57/3

सहायक ग्रन्थ सूची : -

1. परिवेश ? - डः सन्तोष कुमार घोड़इ। दीप प्रकाशन, 209 ए , विधान सरणि , कोलकाता - 700006.
2. ऋग्वेद-यजुर्वेद-सामवेद-अथर्ववेद-संहिता - रमेश चंद्र दत्तेर भूमिका अवलम्वने , भूमिका: श्री हिरन्मय वन्द्योपाध्याय। हरफ प्रकाशनी , ए 126 , कलेज स्ट्रीट मार्केट , कोलकाता - 700007.
3. संस्कृत रचनाय प्रतिफलित परिवेश सचेतनता - विद्युतवरण घोष , संस्कृत पुस्तक भाण्डार, 38 विधान सरणि, कोलकाता - 700006.
4. कठोपनिषद् - ब्रह्मचारी मेधाचैतन्य, विवेकानन्द मठ , व्याराकपुर , उत्तरचव्वीशपरगणा।
5. ऋग्वेद संहिता - गोस्वामी सीतानाथ , कोलकाता , 1972
6. कठोपनिषद् - स्वामी गम्भीरानन्द , उद्वोधन कार्यालय, कोलकाता , 2008
7. वेदेर परिचय - डः योगीराज वसु, फार्मा के. एल. एम प्राइभेट लिमिटेड, कोलकाता , 1993
8. प्राचीन भारत समाज और साहित्य - सुकुमारी भट्टाचार्य, आनन्द पावलिशार्स लिमिटेड, कोलकाता - 1993
9. वैदिक संकलन - द्वितीय खण्ड, अध्यापक डः भवानी प्रसाद भट्टाचार्य ओ डः तारकनाथ अधिकारी, संस्कृत लुक डिपो, डिसेम्वेर, 2001

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2Issue-13May-Jun2022

मानार खोऱ्यातील ग्रामीण वसाहतीचे वितरण : एक भौगोलिक विश्लेषण

भवानकर गजानन गंगाधरराव[1], डॉ.भागवत नामदेवराव पस्तापूरे[2]
[1]संशोधक विद्यार्थी, महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर ता.उदगीर जि.लातूर
[2]सहयोगी प्राध्यापक, इंदिरा गांधी वरिष्ट महाविदयालय, सिडको, नांदेड (महाराष्ट्र)

प्रस्तावना:

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर १९६० च्या दशकात मराठवाडयामध्ये महत्वपूर्ण बदल झालेले दिसून येतात. त्याच बरोबर बीड जिल्हयामध्ये सुध्दा मोठया प्रमाणावर बदल झालेले दिसून येतात. वाहतूक दळणवळण, शिक्षण, आरोग्य केंद्र यांच्या वाढत्या सोईमुळे या प्रदेशातील ग्रामीण भागाच्या प्रगतीस चालना मिळाली आहे. तसेच वीज आणि आधुनिक शेतीची साधने ग्रामीण भागापर्यंत पोहचली आहेत. जलसिंचनाच्या प्रकल्पामुळे या भागातील शेती व्यवसायाचा विकास झाला आहे. त्यामुळे ग्रामीण भागाचा आर्थिक विकास घडून आला. शासनाने शेतीच्या विकासासाठी विहिरीची सोय उपलब्ध करुन दिली आहे. त्याच बरोबर बस, बँक, रस्ते, पोष्ट ऑफिस यासारख्या सुविधामुळे ग्रामीण वसाहतीच्या विकासाला हातभार लागला आहे.

मानार खोऱ्यातील ग्रामीण भागाचे निरीक्षण केल्यास असे दिसून येते की, पुरातन काळापासून या भागामध्ये नद्यांच्या काठी वसाहती निर्माण झाल्या आहेत. त्यापैकी काही वसाहतीना भौगोलिक महत्व लाभल्यामुळे त्यांची लक्षणीय प्रगती झाली आहे. मध्ययुगीन काळात वाहतूक मार्गावर काही वसाहती निर्माण झालेल्या आहेत. आधुनिक काळात मध्यम आणि लघु सिंचन प्रकल्प बांधण्यात आले आहेत. विविध ठिकाणी बंधारे, धरणे बांधली आहेत. आधुनिक काळात अशा वसाहतीमध्ये बाजारपेठा आणि ग्रामीण सेवा केंद्र निर्माण झाले आहेत. ज्या ग्रामीण वसाहतीना प्राकृतिक आणि सांस्कृतिक असे समिश्र स्थान लाभले आहे. अशा ग्रामीण वसाहतीचे नागरी केंद्रामध्ये परिवर्तन झाले आहे. मानार खोऱ्याचे बारा उपखोऱ्यात विभाजन केले आहे. उपखोरेनिहाय अभ्यास क्षेत्रात उपखोरे १ मध्ये २४, उपखोरे २ मध्ये ४१, उपखोरे ३ मध्ये २५, उपखोरे ४ मध्ये ४७, उपखोर ५ मध्ये २६, उपखोरे ६ मध्ये ६४, उपखोरे ७ मध्ये ४३, उपखोरे ८ मध्ये ३९, उपखोरे ९ मध्ये २२, उपखोरे १० मध्ये ३७, उपखोरे ११ मध्ये ५० आणि उपखोरे १२ मध्ये २८ एवढ्या ग्रामीण वसाहती आहेत.

बीज संज्ञा: ग्रामीण वसाहती, मानार खोरे, वितरण

अभ्यास क्षेत्र:

प्रस्तुत संशोधनासाठी मानार खोरे अभ्यास क्षेत्र म्हणून निवडले आहे. मानार नदी ही मांजरा नदीची उपनदी आहे. मानार नदी खोऱ्याचा विस्तार महाराष्ट्रातील बीड, लातूर व नांदेड जिल्ह्यात असून अंबाजोगाई, रेणापूर, परळी, उदगीर, चाकूर, अहमदपूर, लोहा, कंधार, मुखेड, नायगाव, बिलोली, देगलूर या तालुक्यात समाविष्ट आहे. या नदीचे उगमस्थान बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई तालुक्यातील बाभळगाव या गावाच्या दक्षिणेला रामवाडी येथे आहे. तीची वाहण्याची दिशा पश्चिमेकडून-पूर्वेकडे असून ती मांजरा नदीला नांदेड जिल्ह्याच्या देगलूर तालुक्यातील दौलतपूर जवळ महाराष्ट्र व तेलंगाना सीमेजवळ मिळते. अक्षवृत्तीय विस्तार १८°५१'०७" ते १८°९२'४२" उत्तर व रेखावृत्तीय विस्तार ७६°५६'३०" ते ७७°७२'४८" पूर्व या दरम्यान आहे. मानार खोरे भारतीय सर्वेक्षण विभागाच्या स्थलदर्शक नकाशा क्र. ५६ B/10, B/13, B/14, F/1, F/2, F/3, F/5, F/6, F/9, F/10 व F/14 यामध्ये समाविष्ट आहे. या नकाशाचे प्रमाण १:५०००० असून सामोच्च रेषांतर २० मीटर आहे.

मानार नदीच्या महालिंगी, पेठवडज, चांडाळी व वाळकी या उपनद्या आहेत. मानार खोऱ्याचे स्थान दख्खनच्या पठाराचा भाग असून तो बालाघाट डोंगर रांगाखाली येतो. मानार खोऱ्याचे एकूण क्षेत्रफळ २२१६.६२ चौ.कि.मी. एवढे आहे. तसेच पूर्व-पश्चिम लांबी १६२ कि.मी. आहे. तर समुद्रसपाटीपासूनची उंची ६८२ ते ३३४ मीटरच्या दरम्यान असून मुख्य नदीप्रवाहाची लांबी १६२ कि.मी. एवढी आहे.

मानार खोऱ्यामध्ये २०११ च्या जनगणनेनुसार एकूण ४४६ वसाहती आहेत. तर एकूण लोकसंख्या ७८३१०० इतकी असून त्यापैकी ३९९८६५ पुरुष तर ३८३२३५ स्त्रीया आहेत. तसेच ग्रामीण लोकसंख्येची घनता दर चौरस किलोमीटरला ३५३.२९ एवढी आहे. मानार खोऱ्याचे बारा उपखोऱ्यात विभाजन केले आहे. उपखोरेनिहाय अभ्यास क्षेत्रात उपखोरे १ मध्ये २४, उपखोरे २ मध्ये ४१, उपखोरे ३ मध्ये २५, उपखोरे ४ मध्ये ४७, उपखोर ५ मध्ये २६, उपखोरे ६ मध्ये ६४, उपखोरे ७ मध्ये ४३, उपखोरे ८ मध्ये ३९, उपखोरे ९ मध्ये २२, उपखोरे १० मध्ये ३७, उपखोरे ११ मध्ये ५० आणि उपखोरे १२ मध्ये २८ एवढ्या ग्रामीण वसाहती आहेत.

अभ्यासाचे उद्दिष्टे:

१. मानार खोऱ्यातील भौगोलिक घटकांचा अभ्यास करणे.
२. मानार खोऱ्यातील ग्रामीण वसाहतीचा अभ्यास करणे.
३. मानार खोऱ्यातील ग्रामीण वसाहतीचे वर्गीकरण करणे.

माहितीस्त्रोत व अभ्यास पद्धती:

प्रस्तुत संशोधनासाठी वापरण्यात आलेली आधार सामुग्री ही प्राथमिक व दुय्यम स्वरुपाची असून त्यामध्ये प्राथमिक माहिती संकलनासाठी ग्रामीण बसाहतीचा क्षेत्र अभ्यास केलेला आहे. तसेच प्रश्नावली व मुलाखत तंत्राचा उपयोग देखील केलेला आहे. तर वसाहतीच्या अंतर्गत रचनेचा अभ्यास निवडक गावांना भेटी देऊन करण्यात आलेला आहे. तर दुय्यम स्वरुपाची माहिती प्राप्त करण्यासाठी बीड, लातूर व नांदेड जिल्ह्याच्या जनगणना अहवाल (१९९१, २००१ आणि २०११), जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०११, बीड, लातूर व नांदेड जिल्हा गॅझेटिअर, भूजल

सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, कृषी अहवाल, संदर्भग्रंथ, संशोधन पत्रिका, भारतीय स्थलदर्शक नकाशे, मासिके, प्रकाशीत-अप्रकाशीत शोधप्रबंध, गुगलअर्थ सॉफ्टवेअर, संबंधित वेबसाईट इत्यादी माहिती स्रोतांचा वापर केलेला आहे.

ग्रामीण वसाहतीची स्थलानुरुप नावे :

ग्रामीण वसाहतीच्या नावाचे विश्लेषण हा विषय अतिशय महत्त्वपूर्ण असून वसाहतीच्या उत्क्रांतीचा त्याच्या ऐतिहासिक, पारिस्थितीक, जैविक दृष्टिकोनातून अभ्यास करताना याची मदत होते. स्थानिक दंतकथा, प्रादेशिक भाषा, इतिहास, पौराणिक कथा, पर्यावरण शास्त्र आणि महाकाव्यामध्ये वसाहतीच्या उत्क्रांती विषयी व नावाविषयी अनेक सूचना आणि उल्लेख करण्यात आले आहेत. ठिकाणाच्या नावाच्या अभ्यासाची चालू विश्लेषण करण्यासाठी ओळखण्यासाठी मदत होते. प्राकृतिक व सांस्कृतिक वैशिष्टयांचे त्या प्रदेशातील नावावरुन ओळख होते. सभोवतालची मुख्य माहिती शोधण्यासाठी सर्वेक्षण हे मुख्य मार्ग आहे. बुहेन्स (१९२०) विचाराने ठिकाणाची नाव हा मानवी भूगोलाचा आत्मा आहे. प्रादेशिक भाषेच्या ज्ञानाचा उपयोग ठिकाणाच्या नावाचे महत्व शोधण्यासाठी अतिशय महत्वाचे आहे.

वसाहतीच्या नावाच्या अगोदर उपसर्ग जोडणे किंवा नावाच्या नंतर प्रत्यय जोडणे हे अतिशय महत्वाचे असून त्याचे वसाहतीच्या प्राचीन आणि आजपर्यंतच्या प्रवासात नावाला असलेले महत्व, गरज यांचे परिक्षण करणे. सुरवातीच्या मानवाच्या गरजा हि त्या प्रदेशात खरोखर विश्लेषण एकत्र करण्यासाठी संबंधीत माहिती पुरविते. मानवाचे स्थलांतर, प्रदेशात वसाहतीची स्थापना करणे. याचा सुरवातीच्या स्थलांतरीत गटाशी असलेला संबंध हे आपणास ग्रामीण भाग पुरावा देत असते. आर्य कालखंडामध्ये ज्या वसाहतीची उत्क्रांती झाली अशा ग्रामीण वस्त्यांच्या नांवामध्ये पूर, वाडी, तांडा आणि री अशी उपपदे हिंदू राजवटीचा प्रभाव, राजकीय प्राबल्य आणि आधिवासी जमातीचा संबंध स्पष्ट करणारे उपपद आहेत. याची सुध्दा स्थापनेच्या कालावधीची ओळख दर्शविण्यासाठी मदत होते.

नावाच्या सुरुवातीला व शेवटी जोडलेल्या अक्षरावरुन पुढील उदाहरणे पाहता येतील यामध्ये नैसर्गिक व सांस्कृतिक घटकांशी संबंधीत अनेक ग्रामीण वस्त्यांच्या नावाचे पूर्वपद आणि उपपद आहेत. नैसर्गिक घटक यामध्ये वनस्पती, प्राणी, पाणी प्रवाह, भूरुपे तर सांस्कृतिक घटक जसे देव-देवता, जात, मानवांचे नाव आणि पद इत्यादीशी संबंधीत असलेली दिसून येतात. नगर (शहर) ग्राम (खेडे) पूर (वस्ती) इत्यादी. तसेच संस्कृत भाषेत आर्यन वस्तीच्या नावापुढे गंज (मार्केट ठिकाण) बाजार (दैनंदीन आठवडी बाजार आबाद (वस्ती) असा उल्लेख आढळतो शक्यतो मुस्लिम वस्ती मध्ये जमिनीची वैशिष्टये स्पष्ट करताना उपसर्ग व शेवटी जोडलेले अक्षर यावरुन पुढील उदाहरण त्यामध्ये दी, ली, अली, पाली, यासारखी उदाहरणे आढळतात. पाली या शब्दाचा अर्थ टेकडी किंवा पर्वतामध्ये असलेल्या वस्त्या असा करण्यात आला आहे.

ग्रामीण वसाहतीच्या नावाच्या उपपदाचे वितरण आणि विश्लेषण :

अभ्यास क्षेत्रातील एकूण ग्रामीण वसाहतीपैकी २०७ वसाहतीच्या नावाचे उपपद/अंत्यपद गाव, पूर, वाडी, तांडा, बुद्रुक व खूर्द असे आहेत. मानार खोऱ्यातील एकूण ग्रामीण वसाहतीपैकी ७० ग्रामीण वसाहतीच्या नावाचे उपपद 'वाडी' असून याचे प्रमाण १९.०७ टक्के एवढे आहे. वरील सर्व उपपद मिळून ५६.४० टक्के एवढे प्रमाण आहे. एकूण ४४६ ग्रामीण वसाहतीमध्ये ब, क, र, ज, ख, ट, न, द, त, थ, ड, ल/ळ, म व ग नावाची एकूण ७६ वसाहती आहेत. याचे प्रमाण १७.०४ टक्के आहे. तर बा, का,ना, गा, डा, जा, टा,ठा, घा, रा, ला/ळा, धा, दा, या, पा असे उपपद असलेली एकूण ८५ ग्रामीण वसाहती मानार खोऱ्यात आहेत. याचे शेकडा प्रमाण १९.०५ इतके आहे. दि, री, नी, थी, गी, वी, डी, टी/ती, ळी/ली, जी, की व सी अशी उपपद असलेली एकूण ८९ ग्रामीण वसाहती आहेत. याचे प्रमाण १९.९५ टक्के आहे.

उपखोरे १ व ८ मध्ये प्रत्येकी ०४ ग्रामीण वसाहतीच्या नावाचे उपपद 'गाव' आहे. त्यामध्ये गोलेगाव, खातेगाव, तुप्शेलगाव आणि निपानी सावरगाव हे उपखोरे १ मधील गावे आहेत तर उपखोरे ८ मधील माकेगाव, सायगाव, दिवेगाव आणि टाकळगाव या ग्रामीण वसाहतीच्या नावाचे उपपद 'गाव' आहे. उपखोरे २ मध्ये ०७ ग्रामीण वसाहतीच्या नावाचे उपपद 'गाव' आहे. त्यामध्ये धामणगाव, कोलगाव, खातेगाव, बोरगाव, नांदगाव, सुगाव आणि अपसावरगाव या ग्रामीण वसाहतीचा समावेश होतो. उपखोरे ३ व उपखोरे ९ मधील प्रत्येकी ०६ ग्रामीण वसाहतीच्या नावाचे उपपद 'गाव' आहे. त्यामध्ये उपखोरे ३ मधील मुगाव, नांदगाव, बावलगाव, खराब खान्देगाव, डोंगरगाव व माहेगाव या वसाहती येतात तर उपखोरे ९ मधील बाभळगाव, किनगाव, लेंडेगाव, मावळगाव, मोहगाव व कोस्तगाव या ग्रामीण वसाहतीच्या नावाचे उपपद 'गाव' आहे. उपखोरे ६ व ७ मध्ये प्रत्येकी ०५ ग्रामीण वसाहतीच्या नावाचे उपपद 'गाव' आहे. यात उपखोरे ६ मधील नागलगाव, हिंपळगाव, आमेगाव, आंबेगाव व वडगाव तर उपखोरे ७ मधील विलेगाव, तेलगाव, काळेगाव, नायगाव व तेलगाव या ग्रामीण वसाहती येतात.

सारणी क्र. १.१: मानार खोरे : उपखोरेनिहाय वसाहतीच्या नावाच्या उपपदानुसार ग्रामीण वसाहतीचे वितरण

अ. क्र.	उपपद/ अंत्यपद	उपखोरे १	उपखोरे २	उपखोरे ३	उपखोरे ४	उपखोरे ५	उपखोरे ६	उपखोरे ७	उपखोरे ८	उपखोरे ९	उपखोरे १०	उपखोरे ११	उपखोरे १२	एकूण	टक्के
१	गाव	४	७	६	०	०	५	५	४	६	८	६	२	५३	१४.४४
२	वाडी	०	५	३	७	११	८	५	८	७	६	१०	०	७०	१९.०७
३	पूर	८	१	०	१	०	०	१	१	०	०	१	४	१७	४.३६
४	र	४	२	०	७	०	०	४	०	०	३	३	२	२५	६.८१
५	ज	०	१	१	१	०	१	०	०	०	१	०	०	५	१.३६
६	रा	०	१	२	१	०	४	२	१	१	०	६	१	१९	५.१८
७	का	०	०	०	२	०	२	१	०	०	०	०	०	५	१.३६
८	डा	०	०	०	०	०	१	१	०	०	०	१	०	३	०.८२
९	ना	०	०	२	१	२	१	१	१	१	२	०	०	११	३.
१०	गा	०	३	१	१	२	५	०	१	०	३	१	०	१७	४.६३
११	री	०	३	१	०	०	१	१	१	०	२	३	१	१३	३.५४
१२	ल/ळ	१	४	०	२	३	५	२	१	०	०	२	१	२१	५.७२
१३	ली/ळी	२	२	३	६	१	०	३	३	१	२	२	६	३१	८.४५

१४	तांडा	०	१	२	०	०	४	०	०	०	१	१	०	९	२.४५
१५	डी	०	१	०	१	०	०	०	१	०	२	१	०	६	१.६३
१६	बुद्रुक	१	२	१	३	३	१	१	३	०	०	०	२	१७	४.६३
१७	खुर्द	०	१	१	४	०	३	४	१	१	१	०	१	१७	४.६३
१८	नी	०	०	०	१	२	४	१	०	२	०	१	१	१२	३.२७
११	थाडी	२	०	०	०	०	०	०	०	०	०	०	२	४	१.०९
२०	खेड	०	१	०	१	०	०	०	१	०	०	०	०	३	०.८२
२१	टी/ती	०	१	०	१	०	२	०	२	१	१	१	०	९	२.४५
२२	दी	०	०	०	०	०	१	१	०	०	१	०	१	४	१.०९
२३	ट/त	०	१	०	१	०	१	१	०	०	०	१	०	५	१.३६
२४	गी	०	०	०	०	०	२	०	२	०	०	०	०	४	१.०९
२५	वी	०	०	०	०	०	२	१	०	०	१	०	०	४	१.०९
एकूण	२२	३७	२६	४१	२४	५३	३०	३१	१४	२६	४०	२४	३६८	100	

(स्रोत : संशोधकाने आधिकृत माहितीच्या आधारे संकलित केले आहे)

मानार खोऱ्यातील एकूण ग्रामीण वसाहतीपेकी ७० ग्रामीण वसाहतीच्या नावाचे उपपद 'वाडी' असून याचे प्रमाण १९.०७ टक्के एवढे आहे. उपखोरे ५ मध्ये सर्वात जास्त म्हणजेच ११ ग्रामीण वसाहतीचे उपपद वाडी असे आहे. त्यापाठोपाठ उपखोरे ११ मध्ये एकूण १० ग्रामीण वसाहतीचे उपपद वाडी आहे. या खालोखाल उपखोरे ६ आणि ८ मध्ये प्रत्येकी ०८ ग्रामीण वसाहतीचे नाव वाडी असे आहे. तर उपखोरे ४ आणि ९ मध्ये प्रत्येकी ०७ ग्रामीण वसाहती आढळतात. उपखोरे १० मध्ये ०६, उपखोरे २ आणि उपखोरे ७ मध्ये प्रत्येकी ५ ग्रामीण वसाहतीचे उपपद वाडी हे आहे. तर सर्वात कमी ०३ ग्रामीण वसाहतीचे उपपद वाडी आहे असी ग्रामीण वसाहत उपखोरे ३ मध्येच आहे.

मानार खोऱ्यातील एकूण ग्रामीण वसाहतीपैकी १७ ग्रामीण वसाहतीच्या नावाचे उपपद 'पूर' असून याचे प्रमाण ४.३६ टक्के एवढे आहे. 'पूर' हे उपपद असलेल्या ग्रामीण वसाहतीच्या नावांची संख्या उपखोरे १ मध्ये ०७, उपखोरे १२ मध्ये ०४, उपखोरे २, ४, ७, ८ आणि उपखोरे ११ मध्ये प्रत्येकी ०१ ग्रामीण वसाहतीच्या नावाचे उपपद 'पूर' आहे. या उपखोऱ्यातील मान्द्लापूर, जाकापूर, अहमदपूर, कादेपूर आणि शेकापूर या ग्रामीण वसाहतीच्या नावाचे उपपद 'पूर' आहे. उपखोरे १ मधील ०८ ग्रामीण वसाहतीच्या नावाचे उपपद 'पूर' आहे. या उपखोऱ्यातील इब्राहिमपूर, शहापूर, सुजयात्पुर, कारे मलकापूर, चैनपूर, अंतापूर, खानापूर व रामपूर पी शहापूर या ग्रामीण वसाहतीच्या नावाचे उपपद 'पूर' आहे. उपखोरे ४ आणि उपखोरे ७ मधील प्रत्येकी एका ग्रामीण वसाहतीच्या नावाचे उपपद 'पूर' असे आहे.

मानार खोऱ्यातील एकूण १७ ग्रामीण वसाहतीचे उपपद 'बुद्रुक' असून याचे प्रमाण ४.६३ टक्के एवढे आहे. 'बुद्रुक' हे उपपद असलेल्या वसाहतीच्या नावाची संख्या उपखोरे ४, उपखोरे ५ आणि उपखोरे ८ मध्ये प्रत्येकी ०३ एवढी असून, ती सर्वात जास्त आहे. त्यामध्ये बेरली बुद्रुक, दिग्रस बुद्रुक, शिरशी बुद्रुक, बोरी बुद्रुक, धानोरा बुद्रुक, सय्याद्पूर बुद्रुक, झारी बुद्रुक इत्यादी ग्रामीण वसाहतीच्या नावाचे उपपद 'बुद्रुक' असे आहे.

त्याखालोखाल उपखोरे २ आणि उपखोरे १२ मधील प्रत्येकी ०२ ग्रामीण वसाहतीच्या नावाचे उपपद 'बुद्रुक' आहे. त्यामध्ये उच्चा बुद्रुक, तुपदाल बुद्रुक, टाकळी बुद्रुक आणि बामणी बुद्रुक या ग्रामीण वसाहतीचा समावेश होता. अभ्यास क्षेत्रातील उपखोरे १, ३, ६ आणि उपखोरे ७ मधील प्रत्येकी ०१ ग्रामीण वसाहतीच्या नावाचे उपपद 'बुद्रुक' असे आहे. त्यामध्ये नारंगल बुद्रुक, सलगरा बुद्रुक, सिंदगी बुद्रुक आणि नांदुरा बुद्रुक या ग्रामीण वसाहतीचा समावेश होतो.

अभ्यास क्षेत्रातील एकूण ग्रामीण वसाहतीपैकी १७ ग्रामीण वसाहतीच्या नावाचे अंत्यपद खूर्द असून याचे प्रमाण ४.६३ टक्के एवढे आहे. उपखोरे ४ आणि उपखोरे ७ मध्ये एकूण ग्रामीण वसाहतीपैकी 'खूर्द' हे उपपद असलेल्या वसाहतीची संख्या प्रत्येकी ०४ एवढी सर्वात जास्त आहे. या उपखोऱ्यात जांब खूर्द, दिग्रस खूर्द, बेरली खुर्द, शिरशी खूर्द, अजनी खूर्द, हाळी खुर्द, नांदुरा खुर्द आणि हाळी खूर्द या ग्रामीण वसाहतीच्या नावाचे उपपद 'खूर्द' आहे. तर उपखोरे ६ मध्ये ०३ ग्रामीण वसाहतीच्या नावाचे उपपद 'खूर्द' असे आहे. या उपखोऱ्यातील सिंदगी खूर्द, धानोरा खूर्द आणि मालेगाव खूर्द या ग्रामीण वसाहतीच्या नावाचे उपपद 'खूर्द' आहे. तर उपखोरे २, ३, ८, ९, १० व १२ मध्ये प्रत्येकी ०१ या ग्रामीण वसाहतीच्या नावाचे उपपद खूर्द असे आहे. अभ्यास क्षेत्रातील एकूण ग्रामीण वसाहतीपेकी २५ ग्रामीण वसाहतीच्या नावाचे अंत्यपद 'र' असून याचे प्रमाण ६.८१ टक्के एवढे आहे. 'र' हे अंत्यपद असलेल्या ग्रामीण वसाहतीची सर्वाधिक संख्या उपखोरे ४ मध्ये ०७ आहे. या खालोखाल उपखोरे १ व ७ मध्ये प्रत्येकी ०४, तसेच उपखोरे १० व ११ मध्ये प्रत्येकी ०३ ग्रामीण वसाहतीच्या नावाचे अंत्यपद 'र' आहे. तर उपखोरे २ आणि उपखोरे १२ मध्ये प्रत्येकी ०२ ग्रामीण वसाहती येतात.

मानार खोऱ्यातील एकूण ३१ ग्रामीण वसाहतीच्या नावाचे अंत्यपद 'ली/ळी' असून याचे प्रमाण ८.४५ टक्के एवढे आहे. ' ली/ळी' हे अंत्यपद असलेल्या वसाहतीच्या नावाची संख्या उपखोरे ४ व १२ मध्ये प्रत्येकी ०६ एवढी सर्वाधिक आहे. तसेच उपखोरे ३, ७ व ८ या उपखोऱ्यात प्रत्येकी ०३ ग्रामीण वसाहतीच्या नावाचे अंत्यपद ' ली/ळी' आहे. अभ्यास क्षेत्रातील एकूण ग्रामीण वसाहतीपैकी १९ ग्रामीण वसाहतीच्या नावाचे अंत्यपद 'रा' असून याचे प्रमाण ५.१८ टक्के एवढे आहे. 'रा' हे अंत्यपद असलेल्या ग्रामीण वसाहतीची सर्वाधिक संख्या उपखोरे ११ मध्ये ०६ एवढी आहे. उपखोरे ६ मध्ये ०४, उपखोरे ३ आणि उपखोरे ७ या उपखोऱ्यात 'रा' हे अंत्यपद असलेल्या ग्रामीण वसाहतीची संख्या प्रत्येकी ०२ एवढी आहे. तर उपखोरे २, ४, ८, ९ व १२ यामध्ये प्रत्येकी ०१ ग्रामीण वसाहतीच्या नावाचे अंत्यपद 'रा' आहे.

मानार खोऱ्यातील एकूण ग्रामीण वसाहतीपेकी २१ ग्रामीण वसाहतीच्या नावाचे उपपद 'ल/ळ' असून याचे प्रमाण ५.७२ टक्के एवढे आहे. ' ल/ळ' हे उपपद असलेल्या वसाहतीच्या नावाची संख्या उपखोरे ६ मध्ये ०५ इतके सर्वात जास्त आहे. उपखोरे २ मध्ये ०४ ग्रामीण वसाहतीच्या नावाचे उपपद 'ल/ळ' आहे. तर उपखोरे ५ मध्ये ०३, उपखोरे ४, ७ व ११ मध्ये प्रत्येकी ०२ ग्रामीण वसाहतीच्या नावाचे उपपद ' ल/ळ' आहे. 'गा' हे अंत्यपद असलेल्या ग्रामीण वसाहतीची संख्या मानार खोऱ्यात १७ एवढी असून याचे प्रमाण ४.६३ टक्के एवढे आहे. 'गा' हे अंत्यपद असलेल्या वसाहतीच्या नावाची संख्या उपखोरे ६ मध्ये ०५ एवढी सर्वात जास्त आहे. उपखोरे २ आणि उपखोरे १० मधील प्रत्येकी ०२ ग्रामीण वसाहतीच्या नावाचे अंत्यपद

'गा' आहे. अभ्यास क्षेत्रातील १२ ग्रामीण वसाहतीच्या नावाचे अंत्यपद 'नी' आहे. उपखोरे ६ मध्ये ०४ ग्रामीण वसाहतीच्या नावाचे अंत्यपद 'नी' आहे. अभ्यास क्षेत्रातील एकूण ग्रामीण वसाहतीपैकी ११ ग्रामीण वसाहतीच्या नावाचे उपपद 'ना' असून याचे प्रमाण ३.०० टक्के एवढे आहे.

वरील अंत्यपदाशिवाय अभ्यास क्षेत्रात 'ज' हे उपपद असलेल्या एकूण ०५ वसाहती, 'का' हे उपपद असलेल्या एकूण ०५ वसाहती, 'डा' हे उपपद असलेल्या एकूण ०३ वसाहती, 'तांडा' हे उपपद असलेल्या एकूण ०९ वसाहती, 'डी' हे उपपद असलेल्या एकूण ०६ वसाहती, 'थाडी' हे उपपद असलेल्या एकूण ०४ वसाहती, 'खेड' हे उपपद असलेल्या एकूण ०३ वसाहती, 'ती/टी' हे उपपद असलेल्या एकूण ०९ वसाहती, 'की' हे उपपद असलेल्या एकूण ०४ वसाहती, 'वाडा' हे उपपद असलेल्या एकूण ०५ वसाहती, 'गी' हे उपपद असलेल्या एकूण ०४ वसाहती आणि 'वी' हे उपपद असलेल्या एकूण ०४ अशा वसाहतीचा समावेश होतो.

अशा प्रकारे ग्रामीण वसाहतीच्या नावाच्या विश्लेषणावरून वसाहतीच्या उत्क्रांतीच्या कालखंडाची आणि ऐतिहासिक, सामाजिक व सांस्कृतिक परिस्थितीची माहिती समजण्यास मदत होते.

निष्कर्ष:

वसाहतीच्या नावाचे उपपद ज्याप्रमाणे शहर, नगर, ग्राम, खेडे, पूर, वसाहत इत्यादी पद संस्कृत भाषेमधून परावर्तीत झाले आहेत. हे पद आर्य वस्तीचे प्रतिक आहेत. तसेच गंज (बाजार ठिकाण), बाजार (दररोज किंवा आठवडी बाजार), आबादी (वसाहत) इत्यादी मुस्लीम राजवटीतील वसाहतीच्या नावाचे वैशिष्ट्यपूर्ण उपपद आहेत. वसाहतीच्या नावातील पूर्वपद आणि उपपद यातून प्रदेशाची वैशिष्ट्ये आणि महत्व प्रकट होताना दिसून येते. जसे डी, ली, अली इत्यादी शब्द पाली या नावापासून परावर्तीत झाली आहेत. अली या शब्दाचा अर्थ टेकडी अथवा पर्वतामध्ये असलेली वसाहत असा होतो.

मानार खोऱ्यातील ग्रामीण वसाहतीच्या नावावर भूप्रदेशातील नैसर्गिक घटक, सांस्कृतिक घटक आणि वेगवेगळ्या काळातील राजकीय प्रभावांचा परिणाम दिसून येतो. जसे आर्य कालखंडामध्ये ज्या वसाहतीची उत्क्रांती झाली अशा ग्रामीण वसाहतीच्या नावांमध्ये पूर, वाडी, तांडा व री अशी उपपदे हिंदू राजवटीचा प्रभाव, राजकीय प्राबल्य आणि आदिवासी जमातीचा संबंध स्पष्ट करणारे उपपद आहेत. नैसर्गिक आणि सांस्कृतिक घटकांशी संबंधित अनेक ग्रामीण वसाहतीच्या नावाचे पूर्वपद आणि उपपद आहेत. नैसर्गिक घटकामध्ये वनस्पती, प्राणी, जलप्रवाह, भूरुपे तर सांस्कृतिक घटकामध्ये देव-देवता, जात, मानवांचे नाव व पद इत्यादीशी संबंधित असलेली दिसून येतात.

संदर्भ:

१. Brunhes, J. (1920): Human Geography London, PP. 243- 579.

२. Kankure, K.B. (1988): "Marathwada: A Study in settlement Geography", unpublished Ph. D. Thesis, University of Poona. Pune.

३. Kumbhar A.P. (1988): "A Study of Rural Habitat in Nira alley", Ph. D. Thesis, Shivaji University, Kolhalpur, PP. 127-134.

४. अहीरराव, वा. र. (१९९७): अधिवास भूविज्ञान, निराली प्रकाशन पुणे.

५. नांदेड, बीड, लातूर डिस्ट्रीक्ट गॅझेटिअर (महाराष्ट्र शासन मुंबई, १९६७).

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2 Issue-5 Mar-Apr 2022

गंगाखेड तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांच्या अंतराचा भौगोलिक अभ्यास

प्रा. डॉ. भगवान प्रभाकरराव शेंडगे
भूगोल विभाग, बी रघुनाथ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, परभणी

सारांश:

गंगाखेड तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांचा अभ्यास केल्यास असे लक्षात येते की, अभ्यास क्षेत्रातील वस्त्यांमध्ये काही ठिकाणी केंद्रीकरण जास्त झालेली दिसून येते. तर काही ठिकाणी केंद्रितता कमी आढळते. सामान्यता या क्षेत्रातील ग्रामीण वस्त्यांची निर्मिती वाहतूक मार्गाची सुगमता असलेल्या क्षेत्रांमध्ये दिसून येते. शेती क्षेत्राचा आकार, मृदा प्रकार, धार्मिक स्थळे, वाहतूक व संदेशवहनाच्या सुविधा या घटकांचा प्रभाव वस्त्यांच्या विकासावर होत असतो. वेगवेगळ्या सर्कल निहाय वस्त्यांचे सरासरी क्षेत्र व ग्रामीण वस्त्यांची घनता दर १०० चौरस किलोमीटरला किती आहे याचा सर्वप्रथम अभ्यास केलेला आहे. अभ्यास क्षेत्रातील ग्रामीण वस्तीचे क्षेत्र व घनता यांचा अभ्यास केला असता, वस्त्यांचे सर्वात जास्त क्षेत्र राणीसावरगाव मंडळात २०१.०६ चौरस किलोमीटर आहे. तर सर्वात कमी वस्त्यांचे क्षेत्र गंगाखेड मंडळात १४०.१३ चौरस किलोमीटर आहे. याशिवाय माखणी मंडळात १६३.१३ व महातपुरी मंडळात १५७.४७ चौरस किलोमीटर एवढे आहे.

बीजसंज्ञा: वस्त्यांमधील अंतर, वस्त्यांची घनता, सरासरी लोकसंख्या

प्रस्तावना:

वस्ती भूगोल ही मानवी भूगोलाची महत्वपूर्ण शाखा आहे. वस्ती भूगोलात मानवी वस्ती यांचा अभ्यास केला जातो. अनादिकाळापासून मानवाची समूहाने राहण्याची प्रवृत्ती आहे. या समूह भावनेतून वस्त्यांचा उगम झाला आहे. मानव आणि शेती व्यवसायास प्रारंभ केल्यानंतर मानवी जीवनात स्थिरता प्राप्त झाली आहे. सर्वप्रथम सुपीक जमीन व मुबलक पाणीपुरवठा असलेल्या नद्यांच्या किनारी प्रदेशात वस्त्यांचा उगम झाला.सुरुवातीच्या काळात ग्रामीण वस्त्यांमध्ये शेती, मासेमारी, वन संकलन, खाणकाम यासारखे प्राथमिक स्वरूपाचे व्यवसाय केले जात असत. परंतु काळाच्या ओघात मानवाचा विकास झाला. यामुळे ग्रामीण वस्तीतील कार्यात बदल होत गेला. सर्वच वस्त्यांतील कार्यात सारख्या प्रमाणात बदल झाला नाही. त्यामुळे सर्वच वस्त्यांचा आकार सारखा दिसून येत नाही. वस्त्यांचा आकार हा क्षेत्र व वस्त्यांची लोकसंख्या यावरून ठरत असतो. वस्ती मधील अंतर वाढले तर वस्त्यांची घनता कमी होते व वस्तीचा आकार वाढतो. किंग (१९७८) यांच्यामते, "ग्रामीण वस्त्यांचे अंतर म्हणजे दूर (लांब) या संज्ञाचे परीवर्तीत रूप आहे. अंतर हे अभीक्षेत्रीय परिमाण असल्यामुळे यांचा भोगोलिक संबंध अधिक आहे. त्याचप्रमाणे अंतर प्रादेशिक, सामाजिक व आर्थिक वैशिष्ट्यंशी संबंधित आहे." ग्रामीण वस्त्यांचे अंतरसंबंधीच्या विचारधारांचे रूपांतरण मुख्यता रेषीय विशेष स्पष्ट करणारे आहे. "ग्रामीण वस्त्यांच्या वितरणाचे विश्लेषण अंतराच्या साह्याने करण्याच्या सैद्धांतिक पद्धतीला अंतरण (Spacing) असे म्हणतात. प्रस्तुत शोधनिबंधात गंगाखेड तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांचा सरासरी अंतर याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

उद्दिष्टे:

प्रस्तुत शोधनिबंधात गंगाखेड तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांचा आकार व अंतराचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

१. गंगाखेड तालुक्यातील लोकसंख्या वर आधारित वस्त्यांच्या आकाराचा अभ्यास करणे.
२. गंगाखेड तालुक्यातील वस्त्यांची सरासरी लोकसंख्या व वस्त्यांच्या घनतेच्या वितरणाचा अभ्यास करणे.
३. वस्त्या वस्त्यांमधील अंतरानुसार वस्त्यांची घनता तपासणे.

हे प्रमुख उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून हा शोधनिबंध तयार केलेला आहे.

अभ्यासक्षेत्र:

प्रस्तुत शोधनिबंधासाठी परभणी जिल्ह्यातील गंगाखेड तालुका निवडलेला आहे. गंगाखेड तालुक्याचा अक्षवृत्तीय विस्तार १८^{0} ९६$^{'}$ उत्तर अक्षवृत्त आणि रेखावृत्तीय विस्तार ७६$^{°}$७५$^{'}$ पूर्व रेखावृत्त आहे. २०११ च्या जनगणनेनुसार गंगाखेड तालुक्याचे एकूण क्षेत्रफळ ६६१७८.४६ चौरस किलोमीटर आहे. तालुक्याची एकूण लोकसंख्या १५२९७८ इतकी आहे. गंगाखेड तालुक्यात एकूण ४ सर्कल (मंडळ) आणि १०५ गावे आहेत.

माहिती संकलन व अभ्यास पद्धती:

प्रस्तुत शोध निबंध साठी दुय्यम स्वरूपाची आकडेवारी वापरली आहे. ती परभणी जिल्ह्यातील सामाजिक व आर्थिक समालोचन आणि जनगणना पुस्तकेतून (२०११) घेतली आहे. वस्त्यांची सरासरी क्षेत्र व घनता विचारात घेऊन त्यांच्या परस्पर संबंधाचा अभ्यास केलेला आहे. त्याचबरोबर व त्याची सरासरी लोकसंख्या व वस्त्यांतील सरासरी अंतर विचारात घेऊन त्यांचे विश्लेषण केलेले आहे. अभ्यासक्षेत्रातील ग्रामीण वस्त्यांमधील अंतराचे विश्लेषण करण्यासाठी वेलेंटी विनीडयांच्या सूत्राचा उपयोग केला आहे. भूगोलतज्ञ विनीड यांनी ग्रामीण वस्त्यांमधील अंतर काढण्यासाठी खालील सूत्राचा वापर केलेला आहे.

$$D = \sqrt{A/N}$$

खुलासा:

D= ग्रामीण वस्त्यांमधील सरासरी अंतर
A= अभ्यासक्षेत्राचे क्षेत्रफळ चौरस किलोमीटर
N= अभ्यासक्षेत्रातील ग्रामीण वस्त्यांची संख्या

ग्रामीण वस्तीचे क्षेत्र व घनता:

गंगाखेड तालुक्यातील वेगवेगळ्या सर्कल नुसार वस्त्यांचे सरासरी क्षेत्र व ग्रामीण वस्त्यांची घनता दर १०० चौरस किलोमीटरला किती आहे, याचा सर्वप्रथम अभ्यास केलेला आहे. अभ्यास क्षेत्रातील ग्रामीण वस्तीचे क्षेत्र व घनता यांचा अभ्यास केला असता, वस्त्यांचे सर्वात जास्त क्षेत्र राणीसावरगाव मंडळात २०१.०६ चौरस किलोमीटर आहे. तर सर्वात कमी वस्त्यांचे क्षेत्र गंगाखेड मंडळात १४०.१३ चौरस किलोमीटर आहे. याशिवाय माखणी मंडळात १६३.१३ व महातपुरी मंडळात १५७.४७ चौरस किलोमीटर एवढे आहे.

ग्रामीण वस्त्यांची घनता राणीसावरगाव मंडळात सर्वात जास्त १७.१६ दर चौरस किलोमीटरला आहे. तर सर्वात कमी ग्रामीण वस्त्याची घनता गंगाखेड मंडळात १२.८५ दर चौरस किलोमीटरला आहे. याशिवाय माखणी मंडळात १७.४० व महातपुरी मंडळात १५.२४ दर चौरस किलोमीटरला आहे.

मंडळनिहाय ग्रामीण वस्तीचे क्षेत्र आणि ग्रामीण वस्तीची घनता यांचा परस्पर संबंध असल्याचे विश्लेषणावरून स्पष्ट करता येते, ज्या मंडळांमध्ये ग्रामीण वस्त्यांचे क्षेत्र जास्त आहे त्या मंडळांमध्ये ग्रामीण वस्त्यांची घनता जास्त आहे. तर ज्या मंडळांमध्ये ग्रामीण वस्त्यांचे क्षेत्र कमी आहे त्या मंडळांमध्ये ग्रामीण वस्त्यांची घनता कमी आहे.

सारणी क्रमांक १

गंगाखेड तालुक्यातील वस्त्यांची संख्या, वस्त्यांचे क्षेत्र व वस्त्यांची घनता दर चौ. कि.मी. (२०११)

अ.क्र.	मंडळ	वस्त्यांची एकूण संख्या	वस्त्यांचे क्षेत्र चौरस किलोमीटर मध्ये	वस्त्यांची घनता दर चौरस किलोमीटर मध्ये
१	गंगाखेड	१८	१४०.१३	१२.८५
२	माखणी	२८	१६३.१३	१७.१६
३	राणीसावरगाव	३५	२०१.०६	१७.४०
४	महातपुरी	२४	१५७.४७	१५.२४
एकूण तालुका		१०५	६६१.७८	१५.८७

स्त्रोत: आर्थिक व सामाजिक समालोचन व जनगणना अहवाल 2011

ग्रामीण वस्ती मधील अंतर:

ग्रामीण वस्त्यांमधील सरासरी अंतर अभ्यासले असता गंगाखेड तालुक्यातील राणीसावरगाव मंडळामध्ये दोन वस्त्यांतील सरासरी अंतर २.३९ कि.मी. एवढे असून ते सर्वात कमी आहे. गंगाखेड मंडळामध्ये दोन वस्त्यांमधील सरासरी अंतर २.७९ कि.मी. एवढे असून ते सर्वात जास्त आहे. त्याखालोखाल महातपुरी व माखणी मंडळामध्ये दोन वस्त्यांमधील सरासरी अंतर प्रत्येकी २.५६ आणि २.४१ किलोमीटर एवढे आहे.

वरील मंडळांमधील सरासरी अंतराचे निरीक्षण केल्यास असे दिसून येते की, ज्या मंडळांमध्ये शेतीयोग्य जमीन अधिक आहे त्याच मंडळामध्ये वस्त्यांचे केंद्रीकरण व घनता अधिक झालेली आहे. शेतीयोग्य जमिनीचे क्षेत्र जसजसे कमी होत गेले आहे. तसतसे केंद्रीकरण व घनता ही कमी होत गेली आहे. तसेच वस्त्यांचे केंद्रीकरण वाढत गेले की, वस्त्यांची सरासरी लोकसंख्या ही कमी होत जाते. वस्त्यांचे केंद्रीकरण कमी होत गेले की, वस्तीची सरासरी लोकसंख्या वाढत जाते. गंगाखेड मंडळामध्ये वस्तीची सरासरी लोकसंख्या ही सर्वाधिक १६६२ एवढी आहे. त्याखालोखाल महातपुरी १५५०, राणीसावरगाव १३६७ व माखणी १३५५ वस्तीची सरासरी लोकसंख्या एवढी आढळून येते.

सारणी क्रमांक २

गंगाखेड तालुक्यातील सरासरी अंतर व वस्त्यांची सरासरी लोकसंख्या (२०११)

अ.क्र.	मंडळ	वस्तीतील सरासरी अंतर (किलोमीटर मध्ये)	प्रत्येक वस्तीची सरासरी लोकसंख्या
१	गंगाखेड	२.७९	१६६२
२	माखणी	२.४१	१३५५
३	राणीसावरगाव	२.३९	१३६७
४	महातपुरी	२.५६	१५५०
एकूण तालुका		२.५१	१४५७

स्त्रोत: संशोधकाने अधिकृत माहितीच्या आधारे संकलित केली आहे.

निष्कर्ष:

ग्रामीण वस्त्यांची घनता व वस्त्यांचे सरासरी क्षेत्र यांचा अंतराशी व सरासरी लोकसंख्येशी परस्परसंबंध आहे. गंगाखेड तालुक्यात ज्या ठिकाणी अनुकूल भौगोलिक घटकांची उपलब्धता अधिक आहे. त्या ठिकाणी लोकांची वास्तव्याची भावना निर्माण होऊन तेथील वस्त्यांची लोकसंख्या वाढत गेलेली आहे. त्यामुळे वस्त्यांचा आकारही वाढत गेलेला दिसून येतो. तर वस्त्यांची घनता कमी होत आहे हे स्पष्ट होते. वस्त्यांची दर १०० चौरस किलोमीटर ला असलेली घनता वाढत गेल्यास वस्त्यांचे सरासरी क्षेत्रही कमी होते. या भागात शेतीसारख्या स्थिर व्यवसायाचा प्रभाव असल्याचे दिसून येते. गंगाखेड तालुक्यातील काही भागात वस्त्यांचा आकार मोठा असून तेथे औद्योगीकरणाला सुरुवात झालेली दिसून येते. त्यामुळे तेथे वस्त्यांची संख्या कमी होते तर व वस्त्यांचे सरासरी क्षेत्र वाढत जात आहे हे स्पष्ट होते.

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2Issue-13May-Jun2022

भारतीय अर्थव्यवस्था आणि सेवा क्षेत्राचा सहभाग

डॉ. रहाणे शोभा तुकाराम
अर्थशास्त्र विभाग,सहकार महर्षी भाऊसाहेब संतूजी थोरात महाविद्यालय, संगमनेर. जि.अहमदनगर
Email:shobharahane81@gmail.com

गोषवारा :

अर्थव्यवस्थेच्या क्षेत्रीय रचनेतील तिसरे क्षेत्र म्हणजे सेवा क्षेत्र होय. आर्थिक सेवा म्हणजे एक व्यक्ती किंवा संस्थेने दुसऱ्या व्यक्ती किंवा संस्थेला दिलेली सेवा याचा मोबदला दिला किंवा घेतला जातो. सेवा क्षेत्रामध्ये अशा आर्थिक कृतींचा समावेश असतो ज्या वस्तूंचे उत्पादन करत नाहीत मात्र उत्पादनासाठी व वस्तूंच्या वितरणासाठी मदत करीत असतात. उदा. वाहतूक, व्यापार, दळणवळण, बँकिंग, पोस्ट इत्यादी. सेवा क्षेत्रांमध्ये वस्तूंच्या उत्पादनात मदत सेवाक्षेत्र करीत असले तरी इतर व्यवसायिक, प्रशासकीय, वैयक्तिक सेवा यांचा समावेश सुद्धा सेवा क्षेत्रात होतो. शिक्षक, वकील, डॉक्टर, धोबी, हॉटेल, इंटरनेट कॅफे, कॉल सेंटर, एटीएम अशा प्रकारच्या इतर सेवा आहेत. सेवा क्षेत्र हे व्यापक क्षेत्र असून यामध्ये आधुनिक व प्रगत सेवांचा सुद्धा समावेश होतो. कोणत्याही देशाच्या पायाभूत सुविधा या मूलभूत सेवा आहेत असं म्हणता येईल. विकसनशील राष्ट्रात अश्या मूलभूत सुविधा, सेवा पुरवण्याची जबाबदारी सरकारला पार पाडावी लागते. यामध्ये वाहतूक, प्रशासकीय कार्यालय, पोलिस स्टेशन्स, शैक्षणिक संस्था, हॉस्पिटल्स, विमा कंपन्या यांचा समावेश होतो. प्राथमिक, द्वितीयक म्हणजे उद्योग क्षेत्राचा जसजसा विकास होत जातो तसतसे सेवांचा विकास ही आवश्यक असतो. किंबहुना औद्योगिक विकासासाठी सेवा पूरक असतात. म्हणून औद्योगिक विकासाबरोबर सेवांचा विकासही आवश्यक असतो. 2020-21 मध्ये सेवा क्षेत्रासाठी सध्याच्या किमतींवर एकूण मूल्यवर्धित अंदाजे 96.54 लाख कोटी INR आहे. सेवा क्षेत्राचा भारताच्या एकूण 179.15 लाख कोटी भारतीय रुपयांच्या GVA पैकी 53.89% वाटा आहे. रु.च्या GVA सह. 46.44 लाख कोटी, उद्योग क्षेत्राचे योगदान 25.92% आहे. यावरून अर्थव्यवस्थेतील सेवाक्षेत्राचे महत्त्व झपाट्याने वाढत असल्याचे दिसून येते.

प्रमुख मुद्दे (मुख्य शब्द) :-

सेवा क्षेत्र अर्थ आणि संकल्पना, **सेवा आणि परकीय गुंतवणूक,** केंद्रीय सांख्यिकीय संघटनेचे वर्गीकरण, व्यापार सेवा, वाहतूक सेवा, व्यवसाय सेवा, सामुदायिक सेवा ,सेवांचे प्रकार, 2021-22 चा आर्थिक सर्वेक्षण अहवाल **आणि सेवा क्षेत्राचा सहभाग**, भारताच्या आधुनिक आर्थिक विकासात सेवा क्षेत्राची भूमिका, सेवा क्षेत्राचे फायदे, भारतीय अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्राचे योगदान इ.

प्रस्तावना :

माणसाच्या उत्क्रांतीतही तो सर्वप्रथम निसर्गावर अवलंबून होता. त्यामुळे त्यावेळची अर्थव्यवस्था शेती, पशुपालन, मासेमारी, खाणकाम अशा निसर्गाकडून उपलब्ध होणाऱ्या गोष्टींवर अवलंबून होती, म्हणून या क्षेत्राला प्राथमिक क्षेत्र असे म्हणतात. तदनंतर मनुष्यप्राण्याने निसर्गनिर्मित गोष्टींवर प्रक्रिया करून नवनव्या वस्तूंचे उत्पादन व निर्माण सुरू केले. सबब हे द्वितीयक क्षेत्र झाले. सेवांच्या पुरवठ्यावर अर्थव्यवहार हा माणसाच्या उत्क्रांतीतील त्यानंतरचा टप्पा झाला, म्हणून सेवाक्षेत्र हे त्यानंतरचे तृतीयक क्षेत्र अस्तित्वात आले. जागतिक पातळीवर समान धोरण असावे यासाठी जागतिक व्यापार संघटनेच्या (डब्ल्यूटीओ) व्यापारातील सेवासंबंधी सामान्य करार (गॅट) १९९१ नुसार सेवाक्षेत्राचे बारा विभागात वर्गीकरण करण्यात आलेले आहे, ते विभाग उदा., एम्.एस्.डब्ल्यू. (मास्टर ऑफ सोशल वर्क) या अभ्यासक्रमास जागतिक मान्यता असून हे प्रशिक्षित समाजसेवक, इस्पितळे, समुपदेशन केंद्रे, चिकित्सालये, विद्यालये व महाविद्यालये, औद्योगिक क्षेत्रातील तणावमुक्ती केंद्रे येथे महत्त्वाची भूमिका बजावताना दिसतात. गेल्या तीन-चार दशकात देशाच्या आर्थिक-सामाजिक विकासात सेवाक्षेत्र हे 'जीवन रेखा' ठरले असून त्यास अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालेले आहे. प्रत्येक देशाच्या अर्थव्यवस्थेत उत्पादन, उत्पन्न व रोजगार यांत सेवाक्षेत्राचे महत्त्व लक्षणीय आहे. जागतिकीकरण, खुली अर्थव्यवस्था व स्पर्धा यांमुळे सेवाक्षेत्राची झपाट्याने वाढ होत आहे. ज्ञानविज्ञान, परस्पर सुसंवाद, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि जटील प्रश्नांची उकल करण्याची क्षमता यांमुळे सेवाक्षेत्र हा अर्थव्यवस्थेचा अतिमहत्त्वाचा घटक होत आहे. या क्षेत्राच्या विकासासाठी शासकीय तसेच खाजगी संस्था व व्यक्तींच्या पातळीवर प्राधान्य देण्यात येत आहे.

सेवा क्षेत्र अर्थ आणि संकल्पना :

अर्थव्यवस्थेतील तीन भागांपैकी तिसरा भाग म्हणजे सेवाक्षेत्र. प्राथमिक क्षेत्र व द्वितीयक क्षेत्र ही पहिली दोन क्षेत्रे होत. प्राथमिक क्षेत्रात कृषी, पशुपालन, मासेमारी, इत्यादींचा; तर द्वितीयक क्षेत्रात उत्पादन, प्रक्रिया व बांधकाम यांचा समावेश असतो. तृतीयक क्षेत्रात अर्थव्यवस्थेतील सर्व प्रकारच्या अदृश्य स्वरूपातील सेवांचा समावेश होत असल्याने त्यास सेवाक्षेत्र असे संबोधले जाते.

सेवा या वस्तूसारख्या दृश्य नसतात. या अदृश्य स्वरूपातील सेवांमुळे प्राथमिक आणि द्वितीयक क्षेत्रे धारणीय व अधिक उपयुक्त स्थितीत येतात. सेवाक्षेत्रातील उद्योगांना 'ज्ञान अर्थव्यवस्थे' वर लक्ष केंद्रित करावे लागते. सेवांची निर्मिती व पुरवठा हे या क्षेत्राचे प्रमुख वैशिष्ट्य असून ग्राहकांना सामान्य दर्जाच्या सेवा उपलब्ध करून देण्याचा उद्देश असतो. सेवाक्षेत्रात प्रामुख्याने व्यापार, वाहतूक, दळणवळण, वित्तपुरवठा व व्यावसायिक स्वरूपाच्या अदृश्य सेवांचा समावेश होतो. ग्राहकांची गरज ओळखूनतिची जलद व कमीतकमी किंमतीला पूर्तता करणे हे सेवाक्षेत्राचेवैशिष्ट्य आहे. 'बँकिंग' या सेवाक्षेत्रातील महत्त्वाच्या घटकाकडे पाहिल्यास माहिती व संचार तंत्रज्ञानाचा वापर करून किमान मनुष्यबळाच्या साहाय्याने किमान खर्चात उत्तम व चोवीस तास उत्कृष्ट सेवा देण्यातझालेले बदल सहज समोर येतात.उत्पादकता, उपयुक्तता, क्षमता, टिकाऊपणा आणि संभाव्यता यांत सुधारणा करण्यासाठी माणसाने आपल्या ज्ञानाचा व वेळेचा उपयोग करून केलेल्या सर्व बाबी सेवाक्षेत्रात येतात. अशा अदृश्य सेवांत

वस्तूत सुधारणा करणे, सल्ला देणे, मदत, अनुभव, चर्चा, तज्ज्ञता यांचा समावेश होतो. सद्यस्थितीत सेवाक्षेत्राची व्याप्ती वाढत असून त्याची काही उदाहरणे पुढीलप्रमाणे : दूरसंचार, पर्यटन, वित्तपुरवठा, माध्यमे, आदरातिथ्य, कायदेविषयक सेवा, अन्नप्रक्रिया उद्योग, सल्ला सेवा, शिक्षण, गुंतवणूक, किरकोळ विक्री सुविधा इत्यादी.

2021-22 चा आर्थिक सर्वेक्षण अहवाल आणि सेवा क्षेत्राचा सहभाग :

केंद्रीय वित्त मंत्री निर्मला सीतारमण यांनी आज संसदेत 2021-22 चा आर्थिक सर्वेक्षण अहवाल सादर केला. येत्या वर्षात खाजगी क्षेत्रात गुंतवणुकीला वेग येईल कारण अर्थव्यवस्थेच्या पुनरुज्जीवनासाठी आधार देण्याकरिता वित्तीय व्यवस्था उत्तम स्थितीत असल्याचे या अहवालात म्हटले आहे. या अंदाजाची तुलना 2022-23 साठी वास्तव जीडीपी वृद्धी, 8.7 टक्के राहील या जागतिक बँकेच्या आणि 7.5 टक्के राहण्याच्या आशियाई विकास बँकेच्या नुकत्याच जारी केलेल्या अनुमानाशी याची तुलना करता येईल असेही अहवालात म्हटले आहे. आंतरराष्ट्रीय नाणे निधीच्या 25 जानेवारी 2022 ला नुकत्याच जारी केलेल्या जागतिक आर्थिक चित्रानुसार 2021-22 आणि 2022-23 साठी भारताचा जीडीपी 9 टक्के दराने तर 2023-24 मध्ये 7.1 टक्के दराने वाढेल असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. या तीन वर्षात भारत, जगातली सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था राहील असे सांगण्यात आले आहे. सर्वेक्षणानुसार, औद्योगिक क्षेत्राने 2020-21 मध्ये 7 टक्क्यांच्या घसरणीनंतर या आर्थिक वर्षात 11.8 टक्क्यांच्या वाढीपर्यंत झेप घेतली आहे. निर्मिती , बांधकाम आणि खाण उप-क्षेत्रांनी देखील अशीच वाढ नोंदवली असली तरी सेवा विभागावर फारसा परिणाम झाला नाही. कारण वीज आणि पाणीपुरवठा यासारख्या मूलभूत सेवा राष्ट्रीय टाळेबंदीच्या काळातही कायम होत्या. जीव्हीए मधील उद्योगाचा वाटा आता 28.2 टक्के राहील असा अंदाज आहे. सर्वेक्षणात असे म्हटले आहे की सेवा क्षेत्राला विशेषत: मानवी संपर्काचा समावेश असलेल्या विभागांना महामारीचा सर्वात जास्त फटका बसला आहे, गेल्या वर्षीच्या 8.4 टक्के घसरणीनंतर या आर्थिक वर्षात हे क्षेत्र 8.2 टक्क्यांनी वाढण्याचा अंदाज आहे. इथे हे लक्षात घेतले पाहिजे की विविध उप-क्षेत्रांद्वारे व्यापक कामगिरी नोंदविली आहे. वित्त/रिअल इस्टेट आणि सार्वजनिक प्रशासन विभाग आता कोविड-पूर्व पातळीपेक्षा वर आले आहेत. मात्र पर्यटन , व्यापार आणि हॉटेल्स सारखे विभाग अद्याप पूर्णपणे सावरलेले नाहीत. सॉफ्टवेअर आणि आयटी-सक्षम सेवांच्या निर्यातीत भरभराट झाली आहे तरीही पर्यटनातून मिळणाऱ्या कमाईत मोठी घट झाली आहे. 2021-22 मध्ये भारतीय अर्थव्यवस्था 9.2 टक्के दराने वृद्धिगत होण्याचा अंदाज आहे. 2020-21 मध्ये अर्थव्यवस्थेचा 7.3 टक्के इतका संकोच झाला होता. याचाच अर्थ सर्वसाधारण आर्थिक घडामोडीनी महामारीच्या पूर्वीच्या स्थितीला पार केले आहे. पहिल्या तिमाहीत दुसऱ्या लाटेचा आर्थिक प्रभाव हा 2020-21 मधल्या संपूर्ण लॉक डाऊनमध्ये अनुभवलेल्या स्थितीपेक्षा खूपच कमी राहिल्याचे जवळ जवळ सर्वच मापदंड दर्शवत आहेत. मात्र आरोग्या संदर्भातला याचा परिणाम तीव्र होता. 2022-23 मध्ये भारताचा विकास दर 8.0 ते 8.5 % राहण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. जागतिक बँक, आशियाई विकास बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणे निधीच्या अनुसार 2021-24 मध्ये भारताची अर्थव्यवस्था ही जगातली सर्वात वेगाने वृद्धींगत होणारी महत्वाची अर्थव्यवस्था म्हणून उदयास येईल.

केंद्रीय सांख्यिकीय संघटनेच्या वर्गीकरणानुसार सेवांचे चार गट पुढीलप्रमाणे:१) व्यापार सेवा २) वाहतूक सेवा ३) व्यवसाय सेवा ४) सामुदायिक सेवा

सेवांचे प्रकार :

१. वित्तीय पुरवठाबँका, सर्व वित्तीय संस्था, विमा कंपन्यांकडून होणारा अर्थपुरवठा, भांडवलबाजार व मध्यस्थांच्या सेवा

२. आरोग्य व सामाजिक सेवासर्व दवाखाने, इस्पितळे यांमधील सेवा, आरोग्यासंबंधी सेवा पुरविणाऱ्या संस्था, सामाजिक कार्याबाबतच्या सेवा व इतर सेवा.

३. पर्यटन व प्रवासविषयक सेवाहॉटेल्स व उपहारगृहे यांमधील सेवा (निवास व भोजन व्यवस्थेसह), पर्यटन संस्थांच्या सेवा, पर्यटन मार्गदर्शक सेवा.

४. मनोरंजन, सांस्कृतिक व खेळविषयक सेवामनोरंजन क्षेत्रातील सर्व सेवा,

५. वृत्तपत्र सेवा, ग्रंथालये, संग्रहालये, सार्वजनिक उद्याने, क्रिडांगणे यांबाबतीतील सेवा.

६. वाहतूकविषयक सेवाजहाज, समुद्रमार्गाने होणारी प्रवासी व मालवाहतूक सेवा, विमान व अंतरिक्ष सेवा, रस्ते, रेल्वे वाहतूक तसेच वाहतूक आनुषंगिक सर्व प्रकारच्या सेवा.

सेवा आणि परकीय गुंतवणूक:

भारतात आलेल्या परकीय प्रत्यक्ष गुंतवणुकीत सर्वाधिक हिस्सा असलेली पहिली पाच सेवाक्षेत्र पुढील प्रमाणे :-१) वित्तीय व गैरवित्तीय सेवा – 18% २) सॉफ्टवेअर सेवा – 8% ३) दूरसंचार सेवा – 8% ४) बांधकाम विकास – 7% ५) व्यापार – 5% सर्वाधिक गुंतवणूक मॉरिशस या देशाकडून झाली तर त्यासोबत सिंगापूर, युनायटेड किंगडम, यूएसए व जपान या देशांचा क्रमांक लागतो.सेवांची निर्यात भारतात मोठ्या प्रमाणात सेवांची निर्यात होत आहे. वस्तूंच्या निर्यातीपेक्षा सेवांच्या निर्यातीचा वृद्धीदर जास्त आहे. निर्यातीमध्ये सॉफ्टवेअर सेवांचा पहिला क्रमांक लागतो त्यासोबत व्यवसाय सेवा व वाहतूक सेवा यांचा क्रमांक लागतो.

भारताच्या आधुनिक आर्थिक विकासात सेवा क्षेत्राची भूमिका:

कोणत्याही देशाचा आर्थिक विकास हा थेट अर्थव्यवस्थेच्या तीन क्षेत्रांच्या प्रगती आणि प्रगतीवर अवलंबून असतो. प्राथमिक क्षेत्र, दुय्यम क्षेत्र आणि तृतीयक क्षेत्र. कृषी, मासेमारी, वनीकरण, खाणकाम, दुग्धव्यवसाय इत्यादींमधून कच्च्या मालाचे उत्पादन आणि काढण्यात गुंतलेल्या नैसर्गिक संसाधनांचा थेट वापर करणारे अर्थव्यवस्थेचे प्राथमिक क्षेत्र आणि औद्योगिक क्षेत्र म्हणून ओळखले जाणारे दुय्यम क्षेत्र या क्रियाकलापांशी संबंधित आहे. ज्यामध्ये कच्च्या मालाचे वापरण्यायोग्य उत्पादनांमध्ये रूपांतर होते. भारतातील बहुसंख्य लोकसंख्या प्राथमिक क्षेत्रात गुंतलेली आहे, ज्यामुळे देशातील बेरोजगारीचे मुख्य कारण आहे. गेल्या काही वर्षांत उत्पादनावर भर दिला जात असला तरी पायाभूत सुविधांच्या अभावामुळे दुय्यम क्षेत्रात (जड उत्पादन, प्रकाश उत्पादन, ऊर्जा-उत्पादन, अन्न प्रक्रिया इ.) मध्ये फारशी वाढ झालेली नाही. त्यामुळे या अल्परोजगार लोकसंख्येला त्वरीत आत्मसात करण्यासाठी, तृतीयक क्षेत्राकडे वळण्याची गरज आहे. सेवा क्षेत्र म्हणून ओळखले जाणारे तृतीयक क्षेत्र त्याच्या छत्रात विविध गोष्टींचा समावेश करते. त्यापैकी काही आरोग्य आणि कल्याण, पर्यटन, विरंगुळा आणि मनोरंजन क्रियाकलाप तसेच किरकोळ विक्री आणि लोकांना वस्तूंची

विक्री आहेत. गेल्या सहा वर्षांत, सेवा क्षेत्रामध्ये मोठी उत्क्रांती झाली आहे ज्यामुळे त्याला देशाच्या उत्पादक क्षेत्राचा स्वतंत्र दर्जा मिळाला आहे. शिवाय, या क्षेत्राचा परकीय चलनावरही मोठा प्रभाव पडतो आणि त्यामुळे देशाच्या आधुनिक आर्थिक विकासात मोठा हातभार लागतो.

सेवा क्षेत्राचे फायदे:-

१. इन्व्हेंटरी नाही: सेवा क्षेत्रात, वेअरहाऊसमध्ये संग्रहित करणे आवश्यक असलेल्या इन्व्हेंटरीचा राखीव तयार करण्याची आवश्यकता नाही. कारण तुम्ही जे उत्पादन विकत आहात ते तुमची कौशल्ये आहेत ज्यामध्ये तुमच्याकडे फक्त आवश्यक सेवा करण्यासाठी आवश्यक उपकरणे असणे आवश्यक आहे, इन्व्हेंटरीने भरलेल्या गोदामाची आवश्यकता नाही.

२. प्रारंभ करणे सोपे: इतर व्यवसाय उद्योगांच्या तुलनेत, सेवा क्षेत्रात व्यवसाय सुरू करणे तुलनेने सोपे आहे. कारण सेवा क्षेत्रातील व्यवसायासाठी परवाना, फोन आणि आवश्यक कौशल्ये आणि कौशल्य असलेल्या व्यक्तीपेक्षा अधिक काही आवश्यक आहे. हे केवळ अगदी सोपे करत नाही तर प्रारंभ करणे खूप परवडणारे देखील आहे.

३. लवचिक तास: सेवा क्षेत्रात काम केल्याने कामाच्या तासांमध्ये लवचिकता मिळते, ज्यामुळे तुम्हाला तुमचे कौशल्य आणि शिक्षण आणखी वाढवण्याची आणि इतर महत्त्वाची कामे पूर्ण करण्याची संधी मिळते जी तुम्हाला कदाचित शक्य होणार नाही.

४. बदलांसाठी अधिक अनुकूलता: सेवा क्षेत्रातील कंपन्या उत्पादन: आधारित कंपन्यांच्या तुलनेत ग्राहकांच्या गरजांमधील बदलांशी सहज आणि लवकर जुळवून घेण्यास सक्षम आहेत.

५. आर्थिक संकटाच्या काळातही नोकरी देते: आर्थिक मंदीच्या काळात, जेव्हा लोक त्यांच्या खर्चात कपात करत असतात आणि केवळ मूलभूत गरजांसाठी पैसे देत असतात, तेव्हा सेवा क्षेत्र नोकरी टिकवून ठेवण्यास आणि महसूल आणण्यास मदत करते कारण सेवा क्षेत्रातील तज्ञांना नेहमीच मागणी असते.

आर्थिक विकासात सेवा क्षेत्राची भूमिका:

१. औद्योगिकीकरणाला चालना:- सेवा क्षेत्र उत्पादित वस्तूंच्या वितरणाच्या समर्थनार्थ वाहतूक, बँकिंग, वीज, दुरुस्ती किंवा दळणवळण यासारख्या विविध सुविधा पुरवते ज्याचा थेट परिणाम देशातील उद्योगाच्या विकासावर होतो. उदाहरणार्थ- वाहतूक व्यवस्था मजूर, कच्चा माल आणि तयार माल त्यांच्या गंतव्यस्थानापर्यंत नेण्यास मदत करते, उत्पादनासाठी बाजारपेठ तयार करण्यासाठी आणि उद्योगांना समृद्ध करण्यासाठी दळणवळण नेटवर्क आवश्यक आहे, आम्हाला बँकिंग आणि वीज आवश्यक आहे. शिवाय, बाजारपेठेतील अभिप्राय, जलद वितरण तसेच उत्पादने सानुकूलित करण्याची क्षमता या सर्व सेवा उद्योगावर अवलंबून आहेत.

२. शेतीची वाढ:- नेटवर्क सुविधा पुरवून, सेवा क्षेत्रे कृषी उत्पादनांच्या विकासात मदत करतात जसे की कच्चा माल आणि तयार माल एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेण्यात मदत करतात.

३. वस्तूंच्या उत्पादकतेत वाढ:- सेवा क्षेत्र कामगारांना योग्य तांत्रिक ज्ञान/शिक्षण तसेच त्यांना योग्य वैद्यकीय सुविधा प्रदान करण्यात मदत करते. शिवाय, सेवा क्षेत्र संप्रेषण आणि वाहतूक व्यवस्थेचे एक संघटित नेटवर्क देखील सुलभ करते जे कामगारांमधील गतिशीलता आणि माहिती वाढविण्यात मदत करते. याचा परिणाम उत्पादकता वाढण्यात होतो

४. चांगल्या दर्जाचे जीवन प्रदान करते:- शिक्षण आणि आरोग्य, बँकिंग आणि विमा तसेच दळणवळण आणि वाहतूक क्षेत्रात उत्तम सेवा प्रदान करून, सेवा क्षेत्राने देशातील जीवनमान वाढविण्यात मदत केली आहे आणि अशा प्रकारे देशाच्या मानवी विकासास मदत केली आहे. निर्देशांक (HDI),

५. बाजारपेठेची वाढ: हे क्षेत्र प्राथमिक आणि दुय्यम दोन्ही क्षेत्रांच्या गरजा पूर्ण करणाऱ्या विविध सेवा प्रदान करते आणि अशा प्रकारे तयार वस्तू तसेच कच्चा माल किंवा अर्ध-तयार माल या दोन्हीसाठी म्हणजे कृषी आणि उद्योगांसाठी बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात मदत करते.

६. आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ:- भारताच्या सेवा व्यापारात लक्षणीय वाढ नोंदवली गेली कारण देश ICT सेवांमध्ये जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनला ज्यामुळे निर्यात अनेक पटींनी वाढली आणि भारताच्या व्यापार अधिशेषात वाढ झाली. सेवा निर्यातीने चांगल्या पगाराच्या नोकऱ्यांचे प्रमाण वाढवून आणि उच्च-उत्पादक क्षेत्रामध्ये कामगारांचे पुनर्वाटप करून सर्वसमावेशक आर्थिक प्रक्रियेत योगदान दिले आहे.

७. प्रादेशिक असमानता दूर करते:- सेवा क्षेत्राने दळणवळण आणि वाहतुकीच्या सुव्यवस्थित प्रणालीद्वारे प्रत्येक लहान शहर आणि गाव जोडणे शक्य केले आहे. शिवाय, देशाच्या विविध मागासलेल्या भागात शिक्षण, वैद्यकीय तसेच बँकिंग सेवांच्या विस्तारामुळे देशभरातील प्रादेशिक असमतोल आणि विषमता दूर होण्यास मदत झाली आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्राचे योगदान: एप्रिल 2000 ते जून 2020 दरम्यान 83.14 अब्ज USD च्या आवकसह सेवा क्षेत्र हे भारतातील सर्वात मोठे FDI प्राप्तकर्ता आहे. सेवा क्षेत्राच्या छत्रातील काही सेवा खाली सूचीबद्ध आहेत:

१. संशोधन आणि विकास सेवा: 2020 च्या ग्लोबल इनोव्हेशन इंडेक्समध्ये, भारत पहिल्या 50 देशांमध्ये 48 व्या क्रमांकावर आहे. स्पर्धात्मक खर्चात उपलब्ध असलेले उच्च प्रशिक्षित भारतीय मनुष्यबळ आणि भारतीय बाजारपेठेत उपलब्ध बौद्धिक भांडवल यामुळे हे क्षेत्र जगभरातील बहुराष्ट्रीय कंपन्यांसाठी महत्त्वपूर्ण संधी सादर करते. त्या कारणास्तव, अलिकडच्या वर्षांत, अनेक MNCs त्यांचे संशोधन आणि विकास भाग भारतात हलवत आहेत किंवा हलवत आहेत. हे त्या MNCs ला एकतर स्थानिक बाजारपेठेत सेवा देण्यासाठी नवीन नाविन्यपूर्ण उत्पादने विकसित करण्यात मदत करते किंवा मूळ कंपनीला जागतिक बाजारपेठेत जलद उत्पादने वितरीत करण्यात मदत करते. 2022 पर्यंत भारताचा R&D मधील खर्च देशाच्या एकूण GDP च्या सुमारे 2% करण्याचे लक्ष्य आहे.

२. दूरसंचार सेवा: TRAI च्या FY20 नुसार, भारतामध्ये प्रति ग्राहक प्रति महिना सुमारे 11 GB इतका सरासरी वायरलेस डेटा वापर आहे जो 2024 पर्यंत 18 GB पर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे. अशा प्रकारे, भारत जगभरात डेटाचा सर्वात मोठा ग्राहक बनला आहे.

३. IT सक्षम सेवा (ITES): भारतातील सामाजिक-आर्थिक परिस्थिती आणि झपाट्याने बदलत चाललेला व्यवसाय, तसेच इंटरनेटच्या प्रसारामुळे, भारतीय ITES उद्योग आता दिवसेंदिवस आपले क्षेत्र वाढवत आहे आणि एक कठीण प्रतिस्पर्धी बनला आहे. जागतिक बाजारपेठेसाठी. सॉफ्टवेअर

आणि IT-सक्षम सेवा निर्यातीत भारताच्या यशामुळे 1990 ते 2013 या कालावधीत जागतिक सेवा निर्यातीतील वाटा 0.6% वरून 3.3% पर्यंत वाढून सेवांचा प्रमुख निर्यातदार बनला आहे.

४. पर्यटन सेवा: ऐतिहासिक वारसा, पर्यावरणातील विविधता, भूप्रदेश, समृद्ध संस्कृती आणि देशभर पसरलेली नैसर्गिक सौंदर्याची ठिकाणे यामुळे भारतीय पर्यटन आणि आदरातिथ्य उद्योग भारतातील एक महत्त्वपूर्ण सेवा क्षेत्र म्हणून उदयास आला आहे. अशा प्रकारे, पर्यटन हा आपल्या देशासाठी परकीय चलनाचा महत्त्वपूर्ण स्रोत आहे. 2019 मध्ये, GDP मध्ये प्रवास आणि पर्यटनाचे एकूण योगदान एकूण अर्थव्यवस्थेच्या 6.8% होते आणि आर्थिक वर्ष 2020 मध्ये, भारतातील पर्यटन क्षेत्राचा वाटा देशातील एकूण रोजगारांपैकी 8 टक्के होता. 2029 पर्यंत भारतीय बाजारपेठेत सुमारे 53 दशलक्ष नोकऱ्या निर्माण होतील अशी अपेक्षा आहे.

सारांश :

भारतातील सेवा क्षेत्रामध्ये सर्व क्षेत्रांमध्ये सर्वाधिक रोजगार निर्मिती होते. त्यामुळे त्यात मोठ्या प्रमाणात वाढ होण्याची क्षमता आणि उच्च उत्पादक नोकऱ्या उपलब्ध करून देण्याची क्षमता आहे, ज्यामुळे महसूल निर्माण होतो. रोजगार निर्मितीच्या समस्येवर मात करण्यासाठी, स्किल इंडिया कार्यक्रमाचे उद्दिष्ट 2022 पर्यंत सुमारे 40 कोटी लोकांना बाजारपेठ-संबंधित कौशल्ये प्रदान करण्याचे उद्दिष्ट आहे. हे मुख्यत्वे कौशल्य विकास कार्यक्रमांमध्ये खाजगी क्षेत्रातील पुढाकारांचा अवलंब करून आणि त्यांना प्रदान करून हे करण्याचे उद्दिष्ट आहे. आवश्यक निधीसह. त्याचप्रमाणे, मेक इन इंडिया कार्यक्रमाचा उद्देश देशातील उत्पादन क्षेत्राला चालना देण्याचे आहे आणि त्यामुळे सेवा क्षेत्राच्या पोर्टफोलिओमध्ये एक गुणाकार परिणाम होईल. या परिस्थितीत, नाविन्यपूर्ण स्टार्टअप्सना समर्थन देण्याची ऑफर देऊन स्टार्टअप इंडिया उपक्रम भारतातील उत्पादन आणि सेवा उद्योग या दोघांसाठी एक प्रमुख सक्षमकर्ता आहे. अशा प्रकारे, आपण असे म्हणू शकतो की येत्या काही वर्षांत सेवा क्षेत्र देशाचे भविष्य घडवण्यात मोठी भूमिका बजावणार आहे.

संदर्भ सूची :-

1. राजेंद्र रसाळ - भारतीय अर्थव्यवस्था, सक्सेस प्रकाशन
2. रंजन कोळंबे – भारतीय अर्थव्यवस्था, भगीरथ प्रकाशन
3. आर्थिक सर्वेक्षण अहवाल २०२१-२०२२
4. *.Datt, Ruddar & Sundharam, K.P.M. Indian Economy*
5. .https://mr.vikaspedia.
6. https://www.nitinsir.in
7. https://pib.gov.in

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2Issue-13May-Jun2022

नैसर्गिक साधनसंपदेचे संवर्धन

बोईवारे ब्रम्हानंद माधवराव[1], प्रा. डॉ. एन.के. वाघमारे[2]

[1]संशोधक विद्यार्थी,इंदिरा गांधी महाविद्यालय,सिडको नविन नांदेड

[2]संशोधक मार्गदर्शक,भूगोल विभाग प्रमुख,इंदिरा गांधी हाविद्यालय, सिडको

सारांश:

मानवी जीवनाला व त्याच्या अस्तित्वाला उपयुक्त असणा·या वस्तुंना साधन संपदा म्हणतात. मानवाने आपले जीवनाचे संवर्धन करण्यासाठी विविध नैसर्गिक साधन संपदेचा उपयोग करून घेतला आहे. यामध्ये वनसंपदाचा वापर करून अन्नाची गरज भागवली. जलसंपदेचा वापर करून आपली पाण्याची गरज भागवली आहे. मानवाचे जीवन सुखकर करण्यासाठी विविध नैसर्गिक साधन संपदाचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष उपयोग होत असतो. नैसर्गिक साधन संपेदेचे संरक्षण करणे हे मानवाचे आद्य कर्तव्य आहे. निसर्गाचे संवर्धन झाले तरच मानवी संस्कृती जपणार आहे.

बिजसंज्ञा: जल संपदेचे संवर्धन

प्रस्तावना:

पृथ्वीतलावर मानव हा सर्वात बुध्दीमान प्राणी आहे. मानव आपल्या सभोवताली असणा·या अनेक घटकाचा आपले जीवन संवर्धनासाठी विविध घटकाचा उपयोग करून घेत असतो. निसर्गात उपलब्ध असणा-या विविध घटकाचा उपयोग करून मानव आपल्या गरजा पूर्ण करत असतो. अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत गरजा सुध्दा पूर्ण करत असतो. पर्यावरणात मानवाच्या सभोवताली असलेल्या सर्वच बाबीचा मानव उपयोग करून घेत असतो. त्यामध्ये उदा. जंगले, नद्या, जमीन, पर्वत, पठारे, प्राणी, समुद्र इमारती रस्ते, वस्त्या जंगलातील विविध संपतीचा मानव आपले जीवन फुलविण्यासाठी उपयोग करून घेत असतो.

निसर्गात मानवाच्या गरजा सर्वत्र सारख्या प्रमाणात पूर्ण होत नाहीत. आदिमानवापासून आजच्या मानवापर्यंत गरजा व मागण्या पुर्ततेसाठी मानवाला निसर्गावरच अवलंबून रहावे लागते. पर्यावरणातील ज्या पदार्थाचा अथवा वस्तुचा वापर मानवाद्वारे केला जातो त्यास साधन संपदा असे म्हणतात.

मानवाच्या कार्यक्षेत्राशी संबंधीत असणा·या सर्वच भौतीक व जौविक घटकांना साधन संपदा असे म्हणतात. मानवी जीवनाला व त्याच्या अस्तित्वाला उपयुक्त असणा·या वस्तुंना साधन संपदा म्हणतात.

माहिती संकलन व संशोधन पध्दती:

सदर संशोधन विषयासाठी माहिती ही द्वितीय माहिती स्त्रोतातून घेण्यात आलेली आहे. त्याच बरोबर ग्रंथालयातील विविध पुस्तके, शोध प्रबंध यांचा वापर करण्यात आलेला आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये:

1) नैसर्गिक साधन संपदाच्या प्रकाराचा अभ्यास करणे.
2) नैसर्गिक साधन संपदाच्या समस्याचा अभ्यास करणे.
3) नैसर्गिक साधन संपदा संवर्धनाचे उपाय सुचविणे.
4) जलसंपदाच्या प्रकाराचा अभ्यास करणे.

विषय विवेचन:

विविध नैसर्गिक साधन संपदाचा अभ्यास करत असताना वनसंपदाचा अभ्यास करावा लागतो. जलसंपदा खनिज संपदा, अन्न संपदा, ऊर्जा संपदा, भूसंपदा या सर्वांमध्ये महत्त्वाची नैसर्गिक संपदा म्हणून जलसंपदाचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो.

नैसर्गिक साधनसंपदेचे विविध प्रकार:

1) वनसंपदा
2) जलसंपदा
3) खनिज संपदा

जलसंपदा (Water Resources):

नैसर्गिक पर्यावरणाचा अभ्यास करत असताना जलसंपदा ही एक मानवाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच संपदा आहे. जलसंपदेचा मानव आपल्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी जलसंपदेचा वापर करत असतो. उदा. शेती उद्योगधंदे, जलविद्युत, जलवाहतूक,ख् करमणूक, सिंचन, पिण्यासाठी जलसंपदेचा उपयोग होतो.

पृथ्वीवरील एकूण पाण्याच्या साठ्याच्या विचार केल्यास 136 कोटी घन किलोमिटर आहे. त्यापौकी सुमारे 133 कोटी घन किलो मिटर पाणी समुद्र व सागरात सामावलेले आहे. बर्फाच्या स्वरूपात व इतर स्वरूपात (बाष्प, नद्या, नाले, तळी, सरोवरे, विहिरी) सुमारे 3 कोटी घन किलोमीटर पाणी आहे. या तीन कोटी घन किलोमीटर पाण्यापौकी सुमारे 1250 घन किलोमीटर पाणी नद्या, नाले, तळी व सरोवरे या स्थिर किंवा

वाहत्या स्वरूपात सापडतात. तर हवेमध्ये बाष्पाच्या रूपाने वावरणारे पाणी 1300 घन किलोमीटर आहे. जमिनीत मुरलेल्या पाण्याचे प्रमाण 40,000 घन किलोमिटर आहे. बर्फाच्या स्वरूपात सुमारे 257450 घन किलोमिटर पाणी आहे.

पृथ्वीतलावरील पाण्याचे वितरण

क्र.	वितरण	शेकडा प्रमाण
1	सागर व समुद्रातील पाणी	97.4
2	बर्फाच्छादीत	1.98
3	भूमिगत	0.6
4	नद्या, नाले	0.001
5	प्राणी, वातावरण, वनस्पती	0.007
6	मृदा आर्द्रता	0.005
7	तळी व सरोवरे	0.007
	एकूण	**100**

पृथ्वीवरील उपलब्ध पाण्यापौकी 97.4% पाणी खारे असून केवळ 2.6% पाणीच गोड पिण्यायोग्य आहे. या गोड्या पाण्यातील 1.98% पाणी बर्फाच्या रुपात आहे. म्हणजेच केवळ 0.62% पाणी सजीव सृष्टीला वेगवेगळ्या मार्गाने उपलब्ध होत असते.

जलसंपदेचे उपयोग:

1) पिण्यासाठी पाणी:

हे जीवन म्हटले जाते. पाणी हे मानव व सजीव पाण्यांची महत्त्वाची गरज आहे. मानवी शरीरात सुमारे 70% पाणी असते. तर जमिनीवरील वनस्पतीत 50 ते 75% , आणि पाण्यातील वनस्पतीत 95 ते 99% पाणी असते. म्हणजे वनस्पती व प्राणी यांच्या शरीरात पाण्याचे महत्त्व आहे.

2) शेतीसाठी पाणी:

शेतीसाठी सुध्दा पाण्याची नितांत गरज असते. जगामध्ये एकूण पाणी वापरापौकी सुमारे 70% पाणी शेतीसाठी वापरले जाते. विविध पिकांच्या वाढीसाठी पाण्याची गरज असते. पावसाद्वारे पिकाची पाण्याची गरज पूर्ण झाली नाहीतर सिंचनाद्वारे पूर्ण केली जाते.

3) उद्योगधंदे:

वेगवेगळाच उद्योगधंद्यामध्ये वेगवेगळ्या कामासाठी पाण्याचा उपयोग केला जातो. शीतकरण, विद्युतनिर्मिती, स्वच्छता, आगीपासून संरक्षण, वातानुकुलीकरण यंत्रणा यामध्ये पाण्याचा उपयोग होतो. एकूण पाण्याच्या साठ्यापैकी 23% पाणी उद्योगधंद्यामध्ये वापरले जाते.

4) विद्युत निर्मिती:

जलविद्युत निर्मितीसाठी पाण्याची गरज असते. तसेच औष्णीक विद्युत निमितीमध्ये सुध्दा पाण्याची गरज लागत असते.

5) जलवाहतुक:

वाहतुकीचे सर्वात स्वस्त साधन म्हणून जलवाहतुकीला पाहिले जाते. जगातील बहुतेक देशाचा वापर जलवाहतुकीद्वारे चालतो.

6) करमणुकीसाठी:

अलीकडच्या काळात कमरणुकीसाठी पाण्याचा वापर केला जातो. शहरामध्ये मोठ्या प्रमाणात कारंजे बसविले जातात. जलतरणिकाद्वारे पाण्याचा वापर केला जातो.

7) घरगुती वापर:

मानवाच्या सर्वच क्रिया पाण्यावर अवलंबुन आहेत. शारीरिक स्वच्छता, कपडे धुणे, भांडी धुणे, अन्नपदार्थ बनवणे, भाजीपाला धुणे, शिजवणे इत्यादी क्रियासाठी पाण्याचा उपयोग होतो. जगातील एकूण पाण्यापैकी 7% पाणी घरगुती वापरासाठी वापरले जाते.

जलसंवर्धनाचे उपाय:

1) भरपूर प्रमाणात पाणी उपलब्ध असले तरी त्यांचे वितरण सर्वत्र सारखे नाही.
2) जलसंवर्धनाची आवश्यकता विविध प्रसार माध्यमांतून जनजागृती करून त्यासाठी काय करावे याबद्दल मार्गदर्शक करणे आवश्यक आहे.
3) शेतक-यांना व जनतेला पाण्याचे महत्त्व पटवून सांगितले पाहिजे.
4) पाण्याचा वापर जपून करण्यासाठी जनजागृती करणे.
5) मोठमोठे धरणे बांधण्याऐवजी छोटी धरणे बांधुन जलसंवर्धन करणे गरजेचे आहे.
6) दरडोई पाण्याचा वापर जपून करणे गरजेचे आहे.
7) शेतीसाठी सिंचनाच्या अत्याधुनिक पध्दतीचा वापर करणे गरजेचे आहे.
8) पाण्याच्या प्रदुषणासाठी कडक कायदे करावे व संबंधीतास शिक्षा करावी.
9) जलसंवर्धनही सर्वच जगातील एक प्रमुख मागणी आहे आणि प्रत्येक नागरीकाने जलसंवर्धन करणे गरजेचे आहे.
10) अवर्षण, अतिवर्षण उपलब्ध साठे व जलनियोजन यासंबंधी अंदाज पत्रक काढून जनतेला पाण्याचे महत्त्व समजून सांगणे गरजेचे आहे.

संदर्भ ग्रंथ:

1) डॉ. वराट / प्रा. बोरूडे, पर्यावरण भूगोल, विद्या प्रकाशन, औरंगाबाद - 2012.
2) डॉ. सुभाष सारंग, पर्यावरण भूगोल, विद्या प्रकाशन, नागपूर, 2004.

3) डॉ. सुरेश फुले, पर्यावरण अभ्यास, विद्याभारती प्रकाशन, औरंगाबाद, 2004.
4) डॉ. प्रवीण सप्तर्षी, नौसर्गिक आपत्ती, डायमंड पब्लिकेशन, पुणे, 2009.
5) डॉ. सुरेश फुले, महाराष्ट्र भूगोल, विद्याभारती प्रकाशन, औरंगाबाद, 2004.

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2Issue-13May-Jun2022

कृषि अर्थव्यवस्था पर नहर के जल के प्रभाव का तुलनात्मक अध्ययन

आरसी प्रसाद झा

अनुसंधान सहयोगी, भारतीय मानवविज्ञान सर्वेक्षण, प्रताप नगर, उदयपुर-313001 (राज.)

E-mail : arsiprasadjha@yahoo.com

वर्तमान अध्ययन का उद्देश्य है कि कृषि अर्थव्यवस्था पर नहर के जल के प्रभाव का तुलनात्मक अध्ययन किया जाए। वर्तमान अध्ययन के लिए राजस्थान राज्य के जैसलमेर जिला के जैसलमेर प्रखंड में नहर एवं गैर-नहर प्रभावित ग्राम की कृषकों व इनके अर्थव्यवस्था का तुलनात्मक रूप से जानने का प्रयास किया गया है। वर्तमान अध्ययन के लिए गणणात्मक विधि के रूप में संख्यात्मक मान, प्रतिशत, माध्य मूल्य एवं काई वर्ग परीक्षण से प्राप्त संख्यात्मक आंकड़ों का संग्रहण किया गया है। अध्ययन के परिणाम इंगित करते हैं कि गैर-नहर उपलब्ध ग्राम की तुलना में नहर उपलब्ध ग्राम का कृषि अर्थव्यवस्था पर निर्भरता का माध्य मूल्य अधिक पाया गया। इस क्षेत्र में नहर के आने व इसके प्रभाव से स्थानीय ग्रामीण कृषि से अधिक जुड़े हैं। स्थानीय स्तर पर नहर की पानी की उपलब्धता होने से आधी से अधिक आबादी मुख्य व प्राथमिक व्यवसाय के रूप में कृषि को अपनाए हैं। काई वर्ग परीक्षण के परिणाम इंगित करते हैं कि कृषि अर्थव्यवस्था पर नहर के जल का सार्थक व सकारात्मक प्रभाव पड़ा है। नहर आने से स्थानीय ग्रामों में चना, जीरा, इसबगोल, सरसों, मूंग, ग्वार, मूठ (दाल), गेंहू, आदि की खेती की जा रही है व ये सभी फसल नकदी फसल की श्रेणी में आने के कारण स्थानीय कृषक आर्थिक प्रगति कर रहे हैं।

कुंजी शब्द: अर्थव्यवस्था, कृषि, ग्राम, जल, नहर

इंदिरा गाँधी नहर को 'राजस्थान नहर' के नाम से भी जाना जाता है। इस नहर का उद्घाटन 31 मार्च 1958 को हुआ था तथा 2 नवंबर 1984 को इसका नाम इंदिरा गांधी नहर परियोजना किया गया। इसे राजस्थान की मरूगंगा, मरूस्थल की जीवनरेखा व प्रदेश की जीवनरेखा भी कहा जाता है। इससे मरुभूमि में सिंचाई के साथ ही पेयजल और औद्योगिक कार्यों के लिए भी पानी मिलने लगा है। इसका उद्देश्य पश्चिमी राजस्थान में सिंचाई एवं पेयजल सुविधओं का विस्तार करना, मरूस्थलीकरण को रोकना, वृक्षारोपण तथा रोजगार के अवसरों में वृद्धि करना है। इंदिरा गाँधी नहर के निर्माण से पूर्व लोगों को कई मील दूर से पीने का पानी लाना पडता था लेकिन अब परियोजना के अंतर्गत 1200 क्यूसेक पानी पेयजल, उद्योग, सेना एवं ऊर्जा परियोजनाओं के लिए आरक्षित किया गया है। इस नहर के माध्यम से 17.41 करोड़ हेक्टेयर भूमि को सिंचित किया जाता है। इस नहर ने राजस्थान के मरु प्रदेश में जिस हरित क्रांति को जन्म दिया। इस क्षेत्र में सिंचाई की सुविधा से पारंपरिक फसलों- चना, बाजरा और ज्वार की जगह गेहूँ, कपास, मूँगफली और चावल ने ले ली है।

जागतिक तापमान वाढीबद्दल सगळ्यांनाच वरवर कल्पना आहे. मात्र आजच्या परिस्थितीचा विचार केला असता पृथ्वीवरील प्रत्येक सामान्य माणसाने या जागतिक तापमान वाढीबद्दल जागरूक असणे ही काळाची गरज झाली आहे. आपण रोजच वृत्तपत्रात जागतिक तापमान वाढ अर्थात 'ग्लोबल वॉर्मिंग' याविषयी काहीतरी वाचत असतो, मात्र हे सगळे वाचूनही या सगळ्या माहितीकडे तसेच बातम्यांकडे आपण दुर्लक्ष करतो. मात्र पृथ्वी दिवसेंदिवस जळत आहे आणि यामुळे मानवी जीवन एक दिवस पूर्णपणे नष्ट होणार आहे असा विचार केला तर या समस्येची जाणीव आपल्याला झाल्याशिवाय राहणार नाही. मानवाला प्रगतीच्या पायऱ्या चढवणारी वाढती औद्योगिक क्रांती एक दिवस मानव जातीलाच संपविणार आहे याची कल्पना आपल्याला यायला हवी.

काय आहे जागतिक तापमान वाढ?

पृथ्वीच्या भोवतालच्या वातावरणाचे तापमान वाढणे म्हणजे ढोबळ मनाने जागतिक तापमान वाढ असे म्हणता येईल. मात्र याला देखील बरेच कंगोरे आहेत. आजच्या हवामानाचा विचार करता पावसाळ्यात चटके लागणारे ऊन, भर उन्हाळ्यात पाऊस तर हिवाळ्यात देखील उन्हाळ्यासारखे ऊन यालाच जागतिक तापमान वाढ म्हणता येईल.

जागतिक तापमान वाढीची कारणे -

१. झाडांची संख्या कमी होणे.
२. दिवसेंदिवस सिमेंटच्या जंगलांमध्ये होणारी वाढ.
३. पृथ्वीच्या पोटातील पाण्याचा अमाप उपसा करणे.
४. कारखान्याचे विषारी वायू हवेत सोडणे.
५. दुचाकी आणि चारचाकीचा वाढता वापर.
६. हवामानात कार्बन, सल्फर आणि इतर विषारी वायूंचे प्रमाण वाढणे.
७. अल-निनो आणि ला-निनोचा वातावरणात वाढता प्रभाव.
८. जगाची वाढती लोकसंख्या - वाढत्या जगाच्या लोकसंख्येमुळे कार्बन-डाय-ऑक्साइडचे उत्सर्जनाचे प्रमाण वाढत आहे.
९. प्राण्यांची वाढती संख्या - कार्बन-डाय-ऑक्साइडचे प्रमाण वाढण्याकरिता आणखी एक कारण म्हणजे जगात वाढणारी प्राण्यांची प्रचंड संख्या. अमेरिकेतील कडक कायदे टाळण्याकरिता तिथले वराहपालक मेक्सिकोत वराहपालन केंद्रे काढतात. तिथे एकेका केंद्रावर काही लाख प्राणी असतात. अमेरिकेतील कॅलिफोर्निया या राज्यामध्ये दशलक्षावधी गाई आहेत. न्यूझीलंडमध्ये लोकसंख्येचा अनेकपट मेंढ्या आहेत. जगातील कोंबड्यांची तर गणतीच करता येणार नाही. हे सर्व प्राणी श्वासावाटे ऑक्सिजन घेतात आणि कार्बन-डाय-ऑक्साइड बाहेर टाकतात. शिवाय मलमार्गावाटे मिथेन हा घातक हरितगृह परिणाम घडवून आणणारा वायू बाहेर टाकतात. हा कार्बन-डाय-ऑक्साइडपेक्षा अनेक पट घातक हरितगृह परिणाम घडवून आणणारा वायू बाहेर टाकतात.
१०. सूर्याकिरणांची दाहकता- सूर्यकिरणांची दाहकता वाढल्यास जागतिक तापमान वाढ होण्याची शक्यता असते. परंतु सध्याच्या परिस्थितीत सूर्य किरणांचे उत्सर्जन हे नेहेमीप्रमाणे आहे. किरणांची दाहकता कमी जास्त झाल्यास जागतिक तापमान तात्कालिन कमी जास्त होते, दीर्घकालीन दाहकता कमी अथवा जास्त झालेली नाही.त्यामुळे सध्याच्या तापमान वाढीस हरितगृह परिणामच जवाबदार आहे.

हरितगृह परिणाम

हरितगृह हे खास प्रकारच्या वनस्पती वाढवण्यासाठी बनवलेले काचेचे घर असते. हे घर वनस्पतींना बाह्य हवामानाचा परिणाम होउ नये म्हणून सोडल्या जातात. परंतु अवरक्त लहरी वर नमूद केलेल्या वायूंमुळे पुन्हा पृथ्वीच्या वातावरणात परावर्तित होतात व रात्रकाळातही पृथ्वीला उर्जा मिळते. वातावरणात अडकलेल्या या अवरक्त लहरींच्या ऊर्जेमुळे पृथ्वीभोवतालचे वातावरण उबदार राहण्यास मदत होते. जर हे वायु वातावरणात नसते तर पृथ्वीचे तापमान रात्रीच्या वेळात भारतासारख्या उबदार देशातही -१८ अंश सेल्सियस इतके असते. जर भारतासारख्या ठिकाणी ही परिस्थिती तर रशिया कॅनडा इत्यादींबाबत अजून कमी तापमान असते. परंतु या वायूंमुळे रात्रीचे तापमान काही प्रमाणापेक्षा कमी होत नाही व पृथ्वीचे सरासरी तापमान -१८ पेक्षा ३३ ° जास्त म्हणजे १५° सेल्सियस इतके रहाते. या परिणामामुळे मुख्यत्वे पृथ्वीवरील जीवसृष्टी विकसित पावली. असते व उबदार असते.

हे घर काचेचे असून घरात ऊन येण्यास व्यवस्था असते परंतु घर बंदिस्त असल्याने उन्हाने तापल्यानंतर आतील तापमान कमी होण्यास मज्जाव असतो. आतील तापमान उबदार राहण्याच्या संकल्पनेमुळे ही संज्ञा जागतिक तापमान वाढीच्या संदर्भात वापरतात.

काही वायूंच्या रेणूंची रचना अश्या प्रकारची असते की ते उष्णतेच्या ऊर्जालहरी परावर्तित करू शकतात. कार्बन डायॉक्साईड, मिथेन, डायनायट्रोजन ऑक्साईड व पाण्याची वाफ हे प्रमुख वायु असे आहेत जे या उर्जालहरी परावर्तित करू शकतात.

सूर्यापासून पृथ्वीला मिळणाऱ्या ऊर्जेत अतिनील ते अवरक्त अशा ऊर्जालहरींचा समावेश असतो, त्यापैकी अवरक्त किंवा इन्फ्रारेड ऊर्जा लहरी म्हणजे उष्णतेच्या लहरी. पृथ्वीवर येणाऱ्या सूर्यप्रकाशातील सर्व ऊर्जा लहरी दिवसा भुपृष्ठावर शोषल्या जातात. त्यामुळे पृथ्वीवर दिवसा तापमान

वाढते. सूर्य मावळल्यावर ही शोषण प्रक्रिया थांबते व उत्सर्जन प्रक्रिया सुरु होते व शोषलेल्या लहरी अंतराळात पुन्हा सोडल्या जातात. परंतु अवरक्त लहरी वर नमूद केलेल्या वायूंमुळे पुन्हा पृथ्वीच्या वातावरणात परावर्तित होतात व रात्रकाळातही पृथ्वीला उर्जा मिळते. वातावरणात अडकलेल्या या अवरक्त लहरींच्या ऊर्जेमुळे पृथ्वीभोवतालचे वातावरण उबदार राहण्यास मदत होते.

जर हे वायु वातावरणात नसते तर पृथ्वीचे तापमान रात्रीच्या वेळात भारतासारख्या उबदार देशातही -१८ अंश सेल्सियस इतके असते. जर भारतासारख्या ठिकाणी ही परिस्थिती तर रशिया कॅनडा इत्यादींबाबत अजून कमी तापमान असते. परंतु या वायूंमुळे रात्रीचे तापमान काही प्रमाणापेक्षा कमी होत नाही व पृथ्वीचे सरासरी तापमान -१८ पेक्षा ३३° जास्त म्हणजे १५° सेल्सियस इतके रहाते. या परिणामामुळे मुख्यत्वे पृथ्वीवरील जीवसृष्टी विकसित पावली.

शास्त्रीय दृष्टिकोनातन उपाय

जागतिक तापमानवाढ रोखायची तर वातावरणातील कारबन डायऑक्साईड वायू कमी करण्यासाठी उपाय करावे लागतील. यातला एक उपाय म्हणजे झाडं वाढवणे. सध्याचे कार्बन डायऑक्साईडचे वातावरणातील प्रमाण थोपवायचे तर त्याची निर्मिती कमी करणे आवश्यक आहे. जंगलांखालची भमी सध्याच्या तीन ते पाच पट वाढवायला हवी. दुसरे म्हणजे कारबन डायऑक्साईड निर्माण होताच तो पकडून सागरात सोडायची सोय करायला हवी किंवा याचे दुसऱ्या एखाद्या अविघटनशील संयुगात रूपांतर करावे लागेल. सागरात मोठ्या प्रमाणावर लोहसंयुगे ओतली तर वानस प्लवकांची (प्लॅस्टॉन वनस्पती) वाढ होऊन त्यामुळे कार्बन डायऑक्साईडचे प्रमाण कमी व्हायला मदत होईल असं काही शास्त्रज्ञ म्हणतात.

सध्याच्या युगात कोणताही देश उर्जेचा वापर कमी करून आपली प्रगती खोळंबून घेणार नाही. अभ्यासातील पहाणीनुसार विकसित देशांचा उर्जेचा वापर हा विकसनशील देशांपेक्षा कितीतरी पटीने जास्त आहे. परंतु वापराचे प्रमाण स्थिरावले आहे. या देशांपुढील मोठा प्रश्न आहे तो म्हणजे उर्जेचा वापर कमी कसा करायचा जेणेकरुन हरितवायूंचे प्रमाण कमी होईल. भारत देशात दरडोई वापर कमी असला तरी वापराचे प्रमाण हे दरवर्षी लाक्षणीयरित्या वाढते आहे. वापर गुणिले लोकसंख्या यांचा विचार करता काही वर्षातच हे देश जगातील इतर देशांना हरितवायूंच्या उत्सर्जनात मागे टाकतील. जगातील इतर विकसनशील देशांच्या बाबतीत हेच लागू होते. म्हणून सध्या उर्जेचा वापर कमी करून व जागतिक तापमानवाढीवर मात करता येणे अवघड आहे. यावर मात करण्यासाठी तज्ञांचे असे मत आहे की आत्ता लगेच कार्बन डायॉक्साईड या मुख्य हरितवायूला वातावरणात सोडण्यापासून रोखणे.

त्यामुळे शास्त्रज्ञ ज्वलनाच्या अश्या प्रक्रिया शोधत आहेत ज्यामुळे वातावरणात कार्बन डायॉक्साईड सोडला जाणार नाही व उर्जेचे उत्पादन खोळंबणार नाही. मध्यम स्वरुपातील उपायांमध्ये वाहनांसाठी व वीजनिर्मिती प्रकल्पांसाठी नवीन प्रकरचे इंधन शोधून काढणे हे आहे. कायमस्वरुपी उपायांमध्ये तंत्रज्ञे विकसित करणे जेणेकरुन मानवाचे खनिज व निसर्गातील अमूल्य ठेव्यावर अवलंबून रहाणे कमी होईल असे उदेश्य आहे.

संदर्भ :

1) जागतिक तापमान वाढ : के.जी.बी. सरदेसाई, आवृत्ती - 2011, नचिकेत प्रकाशन, नागपूर.
2) Discovery of global warming, John Houghlon, Edition - 2004, Cambridge University Press, U.K.
3) www.globalwaringwikipedia.
4) वर्तमान पत्रातील लेख.

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2Issue-13May-Jun2022

शाश्वत विकासासाठी सौर ऊर्जेचा उपयोग

स.प्रा. मोरे तुकाराम सुर्यभानराव
मानसशास्त्र विभाग, कोहीनूर कॉलेज, खुलताबाद,
ई-मेल- morets111981@gmail.com

प्रस्तावना :

आज आपण प्रत्येक दिवशी पेपर किंवा बातम्यामध्ये वीजभार नियमन / लोडसेडींग ही नित्याचीच बाब झाली आहे. आता तर ग्रामीण भागाप्रमाणे शहरी भागामध्येसुद्धा लोडसेंडीगचा सामना प्रत्येक नागरीकाला करावा लागत आहे. ग्रामीण भागामध्ये बिजबिल वसुलीच्या नावाखाली शेतीसाठी होणारा विजपुरवठा फक्त 8 तास वीज देऊन 24 तासाची विजवसुली सरसगट केली जाते व रात्री-अपरात्री विजपुरवठा खंडित केला जातो. आज तर विहीर / बोअरवेलमध्ये पाणी असून विज वसुलीच्या नावाखाली 15-20 दिवस विजपुरवठा खंडित केला जातो. शहरी भागामध्ये वीजबिल वसुली असूनसुद्धा विजमागणी जास्त असल्याने विजपुरवठा कधीही वरिष्ठांच्या आदेशानुसार खंडित केला जातो. यामुळे शहरी भागातील जनताच परेशान नाही तर ग्रामीण भागातील जनता सुद्धा परेशान आहे. आज तर ऊर्जामंत्री कोळसा पुरवठ्याच्या आडून भारनियमन अटळ आहे हे कबुल करत आहेत. पण या गोष्टीवर कायमस्वरूपी काय उपाय करता येईल? म्हणजेच अणुऊर्जानिर्मिती, जलविद्युत ऊर्जा निर्मिती व कोळशापासून होणारी औष्णिक ऊर्जा निर्मितीला काही पर्याय उपलब्ध करून देता येईल का? यातूनच आपल्याला शाश्वत विकासासाठी सौरऊर्जाचा वापर करून घेऊन मानवी जीवन सुखी-समाधानी करता येते. त्याचबरोबर कोणतेही प्रदुषण होत नाही. सूर्य हा लाखो वर्षापासून ऊर्जाचा शाश्वत स्त्रोत आहे पण आपण 18 व्या शतकात औद्योगिकरण झाल्यामुळे भौतिक सुखाच्या मागे सर्व लोक लागल्यामुळे आपण फॅन, फ्रीज, ए.सी., चा वापरसुद्धा जास्त करत आहेत. पण यामुळे ऊर्जेची गरज वाढली आहे. ती निर्माण करण्यासाठी आपण पूर्वीच्याच पद्धती वापरत आहोत. पण याला काही पर्याय देता येईल का हे पाहणे महत्त्वाचे ठरते.

शाश्वत विकास म्हणजे काय? त्याची गरज का आहे? या प्रश्नाच्या उत्तरातून या गोष्टी जाणून घेऊयात. पृथ्वीवरच्या सध्याच्या तापमानाची दखल घेणे भाग आहे. आपण योग्य वेळीच पाऊल उचलले नाही तर फार उशीर होऊन विनाश अटळ आहे. येथे दोन प्रश्न महत्वाचे आहेत. (1) उपलब्ध नैसर्गिक स्त्रोताची होणारी हानी (2) ऊर्जेची वाढलेली आवश्यकता.

पृथ्वीवर बाहेरून फक्त सौरऊर्जा येते. बाकीच्या सगळ्या गोष्टी रिसायकल होत असतात. मानवाने या सर्व चक्रामध्ये ढवळाढवळ सुरू केली आहे. याचा परिणाम जैवविविधता नष्ट होणे, प्रदुषण हे आपल्याला दिसून येते. निसर्गाची झालेली झीज भरून काढण्याची एक क्षमता असते. ती भरून काढण्यासाठी काही काळ लागतो. निसर्गचक्र व्यवस्थित चालले पाहिजे. यामध्ये एका वर्षात मानवजातीने किती रिसोर्सस वापरले पाहिजेत. आपल्या पुढच्या पिढ्यासाठी असलेले नैसर्गिक स्त्रोत वापरून आपण मौजमजा करत आहोत.

निसर्गचक्राकडे पाहिले की सगळ्या गोष्टी चक्राकार पद्धतीने चालतात. म्हणजे पाण्याची वाफ होते. वाफेचे ढग होतात त्यातून पाऊस पडतो आणि पुन्हा पाणी जल स्वरूपातील येते हे जलचक्र झालं. तसच प्रत्येक नैसर्गिक गोष्टीच आहे. सूर्याची ऊर्जा वापरून झाडे कार्बनडायऑक्साईडचं रूपांतर साखरेत करतात. ही झाडे प्राणी खातात आणि ऊर्जा वापर करताना कर्ब वायु उत्सर्जित करतात. ही सोपी कार्बन सायकल झाली. पण जेवढी भूक तेवढेच खातात तर झाडे अनावश्यक साठवणूक देखील करत नाहीत. यामुळे निसर्गचक्र चालत राहते.

कार्बन फार महत्वाचा आहे. कारण पृथ्वीवरील जीवन हे कार्बनवर आधारीत आहे. म्हणजे आपले शरीर हे बहुतांश कार्बनने बनलेले आहे. कार्बनचक्र बिघडणे म्हणजे पृथ्वीवरील जीवसृष्टीला धोका निर्माण होतो. आता हा धोका का? निर्माण झाला जेव्हा आपण खनिज तेलाचा वापर करतो तेव्हा हा कार्बनडॉयऑक्साईड तयार होतो, पण हा वायु रिसायकल होऊ शकत नाही. पृथ्वीच्या क्षमतेपेक्षा वायु उत्सर्जन जास्त होते. लाखो वर्षापुर्वी जीवाश्म जमिनीत गाडून आज तो आपण कोळसा स्वरूपात वापरतो. पण आता मानवाने नैसर्गिक संसाधनाचा खूप जास्त वापर करून भौतिक सुखासाठी निसर्गावर काय परिणाम होईल हा विचार करने सोडले आहे. या नैसर्गिक चक्राच्या विरूद्ध आपली सर्व जीवनशैली आहे. आपण सतत अधिकचा विचार करतो. अधिक उत्पादन, अधिक नफा यातून नैसर्गिक स्त्रोताचा अमर्याद वापर वाढला आहे. पण या स्त्रोतांना मर्यादा आहेत आणि आता त्या उघड होऊ लागल्या आहेत.

या अमर्यादित वाढीचे अजून एक कारण असे की आपल्याला या गोष्टी हे सर्व संसाधने फुकट वापरायला मिळतात. हवा, पाणी, धातु, जमिन या सर्व गोष्टी वापरण्याचे आपण निसर्गाला पैसे देत नाही. निसर्गाची परतफेड निसर्गाच्या भाषेतच आपण करतच नाही आणि ही परतफेड न करण आता मानवजातीला महाग पडत आहे. अर्थव्यवस्थेत भांडवल म्हणून फक्त पैसा किंवा मनुष्यबळ बघितले जाते पण आपण भांडवली खर्चामध्ये निसर्गाचे जे स्त्रोत वापरतो त्याची कोणतीच पर्यावरणीय किंमत लावत नाही. याउलट मानवनिर्मित वस्तुची किंमत चुकवतो.

पृथ्वीवरील सर्व ऊर्जाचा स्त्रोत हा सूर्य आहे. प्रत्येक मानवी कामासाठी ऊर्जेची आवश्यकता असते. फिजिक्समध्ये एंट्रापी नावाची संज्ञा आहे. त्याप्रमाणे एखादे काम करताना जी ऊर्जा लागते त्याच्या बरोबरीने काही ऊर्जा ही वाया जात असते. तिला एंट्रापी असे म्हणतात. ऊर्जेच्या स्त्रोताचे दोन प्रकार सांगता येतील. (1) ज्यांच्यात एंट्रापी जास्ती आहे आणि (2) ज्यांच्यात एंट्रापी कमी आहे. उदाहरण द्यायचे झाले तर सौरऊर्जा ही अधिक एंट्रापी कमी आहे. उदाहरणार्थ सौरऊर्जा ही अधिक एंट्रापी असलेली ऊर्जा आहे आणि पेट्रोल हे कमी एंट्रापी असलेले इंधन आहे. म्हणजेच जेव्हा आपण सौरऊर्जा वापरतो तेव्हा त्यातली बरीचशी ऊर्जा ही निरूपयोगी ठरते.

आपल्याला जी ऊर्जा लागते ती खनिजतेल, कोळसा वापरून आपण मिळवतो. प्रत्येक कृतीसाठी आपण या ना त्या प्रकारे कमी एंट्रापी असणारे स्त्रोत वापरत आहोत. वीजनिर्मिती ही औष्णिक कोळशापासून तयार होते. यातून हवेचे प्रदूषण होते पण आता जगात स्वच्छ ऊर्जा, हरित उर्जा (Clean and Green energy) हा शब्द प्रामुख्याने वापरला जातो. दुसरा शब्द म्हणजे (Renewable energy) सौर वायु, जलविद्युत उर्जा हे ऊर्जेचे अपारंपरिक स्त्रोत आहेत हे वापरले तर निसर्गाची हानी होत नाही. मानवाच्या वाढत्या गरजाची पुर्तता करण्यासाठी आपण ऊर्जेच्या अतिवापराकडे झुकलो आहोत. शाश्वत विकासाची पहिली पायरी ही मानवी संसाधनाची आणि ऊर्जेची एकूण गरज कमी करणे हीच आहे. भारत (2050) पर्यंत आपली परंपरागत ऊर्जाव्यवस्था बदलून हरीत ऊर्जेचा वापर सुरू करण्यास सक्षम आहे. हरित ऊर्जा विकेंद्रीत असून शेकडो लोकांचा रोजगार उत्पन्न होऊन आत्मनिर्भर भारताचा पाया सुदृढ होईल. पुढील काळात ऊर्जा संवर्धन करण्यासाठी हरित ऊर्जेचा विकास करावा लागणार आहे. वाढत्या ऊर्जेची गरज भागवण्यासाठी सौरऊर्जा प्रकल्पानी (2050) पर्यंत हरित ऊर्जेवर पुर्ण भारताची अर्थव्यवस्था चालू शकते. महत्वाचे मुद्दे चर्चिने आवश्यक आहे. भारतासाठी हरितऊर्जा केवळ पर्याय नसून ती देशाची गरज आहे व ती भारताचीच नाही तर जगाची गरज आहे. प्रत्येक आंतरराष्ट्रीय मंचावर (2020) पर्यंत भुमिजन्य इंधनाचा वापर बंद केला नाही तर आपत्कालीन परिस्थितीला तोंड द्यावे लागेल ही गोष्ट महाराष्ट्राच्या बाबतीत खरी ठरत आहे.

जगातील विकसित आणि बड्या राष्ट्रानी कार्बनमुक्त ऊर्जेची व्यवस्था केली नाही तर मानवी समाज सर्व बाजूंनी धोक्यात येईल असे समजावे. एवढे सगळे ढळढळीत सत्य असून सुद्धा अमेरिका, चीनसारखे देश सर्वात मोठे कार्बन उत्पादक देश आहेत. शेखचिल्लीप्रमाणे ज्या फांदीवर बसलो आहोत तिच फांदी तोडण्याचा प्रयत्न आपण करीत आहोत. चीन असंवेदनशील आहे कारण त्याला महाशक्ती बनायचे आहे. या उलट युरोपातील छोटे-छोटे देश खूप संवेदनशील आहेत. या देशात ग्रीन पक्ष आणि ग्रीन फंड सुद्धा सुरू आहेत. त्याचबरोबर आफ्रिकेतील घाना व मोंजाम्बिक हे देश सुद्धा सौर ऊर्जेद्वारे आर्थिक विकासाला चालना देत आहेत. चीनसारखा मोठ्या देशाने इतर ऊर्जेचा वापर केल्यास खूप मोठा फायदा जगाला होईल.

भारताविषयी बोलायचे झाल्यास भारतात हवामान बदलाचे परिणाम जाणवत आहेत. यामध्ये नैसर्गिक आपत्तीच्या घटना वाढत आहेत. मुंबई (2005), उत्तराखंड (2013), चेन्नई (2015), काश्मीर (2017), केरळ (2018), (2020) अम्फान चक्रीवादळ (बंगाल, ओरिसा) विजेमुळे मृत्युमुखी पडण्याची संख्या लक्षणीय वाढली आहे. जगभरातील शास्त्रज्ञानाच्या मतानुसार वातावरणातील उष्णता वाढल्यामुळे संपूर्ण जगाला त्याची किंमत चुकवावी लागत आहे. मात्र भारत आणि शेजारील देशासाठी हे संकट बहुपदरी आहे. कारण आपण 'ट्रापिकल झोन' मध्ये येतात. लोकसंख्येची घनता अधिक आहे. त्यामुळे विकासाची गती वाढवण्यासाठी सौर ऊर्जा अतिशय महत्वाची आहे. भारत सरकार हरित ऊर्जेचे उत्पादन आणि पुरवठा वाढविण्यासाठी प्रयत्न करीत आहे. भारतात तिन महत्त्वाच्या संरचना आहेत. पहिली विज संरचना त्या आधारावर दुसरी परिवाहनाची संरचना चालते. यामध्ये रेल्वे, रस्ते वाहतूक, कार्गो आणि विमानवाहतूक तिसरी संरचना उद्योगाची (कारखाने) यामध्ये मुख्यत: लोखंड, सिमेंट उद्योगाला विजेची गरज जास्त भासते. भारताने गेल्या सहा वर्षात सौर ऊर्जेचे उत्पादन 17 GW वाढवून 78 GW केले आहे. सौर ऊर्जेच्या एका स्मार्ट ग्रिडच्या साहायाने जगाला जोडण्याची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची कल्पना आहे. एक सूर्य एक ग्रिड आणि एक विश्व ही संकल्पना म्हणजे भारताची जगाला देणगी आहे. परिवाहन व्यवस्थासुद्धा पूर्णपणे सौरऊर्जेला जोडण्याचा प्रयत्न भारताने सुरु केला आहे.

पर्यावरणाची हानी टाळून आर्थिक विकासही करून घ्यावयाचा असेल तर पर्यावरणपुरक उर्जेचे पर्याय विकसित करून ते परवडतील अशा दरात उपलब्ध करणे हे सरकारचे काम आहे. यामुळे शाश्वत विकासासाठी सौरऊर्जा महत्वाची आहे. वातावरणात प्रदूषण वाढ आणि जागतिक हवामान बदलाच्या धोक्याची घंटा सतत वाढत असताना भारतासारख्या विकसनशील देशाच्या पंतप्रधानानी फ्रांन्ससारख्या विकसित देशाच्या पंतप्रधानांना सोबत घेऊन पॅरिस जागतिक सौरऊर्जा मैत्री करार (इंटरनॅशनल सोलर अलायन्स) हा हवामान बदलाच्या संदर्भातील आंतरराष्ट्रीय करारामधील महत्वाचा टप्पा मानला जातो तो करार केला आहे. कारण या करारामुळे सौरऊर्जेच्या दृष्टीने श्रीमंत असणारे सर्व देश जे भौगोलिकदृष्ट्या विषुववृत्त व कर्क आणि मकरवृत्ताच्या पट्ट्यात येतात, त्याला एक जागतिक सामायिक व्यासपीठ उपलब्ध झाले. हवामान बदलाच्या संदर्भात हे सर्व देश व त्यातही भारत हा जगाचे नेतृत्व करू शकतो. असा ठाम विश्वास या करारातील (121) देशाला आहे. त्यानुसार ऊर्जा सुरक्षा आणि शाश्वत विकास ही दोन्ही जागतिक उद्दिष्टे सहज गाठली जाऊ शकतात. (2015) पासून सुरू झालेल्या या कराराची प्रत्यक्ष अंमलबजावणी डिसेंबर (2017) ला झाली. (2018) मध्ये संयुक्त राष्ट्राच्या सनदेमध्ये नोंदणी झाली. या सौर गटाचे मुख्यालय भारतात गुरगाव येथे सुरू करण्यात आले आहे.

अलिकडे याच महिन्यात जागतिक सौर ऊर्जा मैत्री करार गटाचे पहिले अधिवेशन दिल्लीत पार पडले. या पर्यावरणीय दृष्टीकोनाचा सकारात्मक परिणाम म्हणजे संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम विभागाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना (चॅम्पियन ऑफ द अर्थ) या सर्वोच्च पर्यावरण पुरस्काराने सन्मानित केले. या संदर्भाने पुढील पिढ्यासाठी व त्यांच्या नैसर्गिक चांगल्या राहणीमानासाठी आपल्याला आज काम करणे शक्य आहे व किती वेगाने आपण यासाठी कृतीशील होऊ शकतो व याचा धोरणात्मक विचार सरकार कसा करत आहे हे पाहणे उचित ठरेल.

जागतिक हवामान बदलाचे संकट हे मुख्यत: जीवाश्य इंधनाचा वाढता वापर व त्यामुळे निर्माण होणारे हरितगृह वायुचे, प्रामुख्याने कार्बनचे वाढते उत्सर्जन यामुळे ओढावते. भारत व इतर विकसनशिल देशांचा आर्थिक विकास साधताना जिवाश्म इंधनाचा वापर अपरिहार्य ठरतो. कारण बऱ्याचदा अशी इंधने इतर इंधनाच्या तुलनेत स्वस्त व सहज उपलब्ध असतात. जीवाश्म इंधने ही सतत घटत जातात व त्यांचे पुनर्भरणही शक्य नसते. म्हणूनच पर्यावरणाची हानी टाळून आर्थिक विकासही अबाधित राहायचा असेल तर पर्यावरणपुरक व स्वच्छ ऊर्जेचे पर्याय विकसित करणे व ते सर्वसामान्यांना परवडतील अशा दरात सर्वत्र उपलब्ध करून देणे हे कल्याणकारी सरकारचे कर्तव्य ठरते. अक्षय आणि अपारंपरिक ऊर्जास्त्रोतात सौरऊर्जेचे महत्व अनन्यसाधारण आहे. जगभरात सर्वात जास्त सौरऊर्जेचे उत्पादन करणाऱ्या पहिल्या पाच देशामध्ये (जर्मनी, चीन, जपान, इटली आणि अमेरिका) आज भारत नसला तरीही जगातील सर्वात मोठा सौरऊर्जा प्रकल्प भारतात तामीळनाडूमध्ये कामुठी येथे आहे. या प्रकल्पाची सौरऊर्जा निर्मितीची क्षमता (648) मेगावॅट इतकी असून त्याची व्याप्ती दहा चौरस किलोमीटर इतकी आहे. भारतात उपलब्ध असणाऱ्या वर्षाकाठी स्वच्छ व सूर्यप्रकाश असणारे तिनशे दिवस आणि त्यासाठी आवश्यक ती जमीन ही सौरऊर्जाच्या बाबतीत अतिशय जमेची बाजू आहे आणि त्यानंतर महत्वाची बाब ही की भारताने धोरणात्मकरित्या त्यावर शिक्कामोर्तब केले आहे. (2035) पर्यंत भारताची ऊर्जेची गरज ही जगातील एकूण देशापैकी

दुसऱ्या क्रमांकावर असेल व आज उपलब्ध असणारे जीवाश्म इंधनाचे अत्यंत मर्यादित असणारे साठे विचारात घेता भारत त्यावेळी ऊर्जाच्या बाबतीत स्वयंपूर्ण असणार नाही.

भारताला ऊर्जा स्वयंपूर्णता साधायची असेल तर अक्षय व अपारंपरिक अशा ऊर्जा स्त्रोताचा विकास हे ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीने प्रमुख ध्येय असेल. भारताच्या नवीन आणि नविकरणीय ऊर्जा मंत्रालयाच्या मते, गेल्या काही वर्षातील ऊर्जा धोरण असे म्हणते की (2020) पर्यंत देशात एक लाख मेगावॅट इतकी सौरऊर्जा निर्माण केली जाईल आणि वर उल्लेख केल्याप्रमाणे उपलब्ध असणारे तिनशे सुर्यप्रकाशी दिवस वापरून निर्माण होणारी सौरऊर्जा ही उपलब्ध असणाऱ्या सर्व जिवाश्म इंधनाच्या उत्पादनापेक्षा नक्कीच जास्त असेल. जीवाश्म इंधनाकडून स्वच्छ ऊर्जा स्त्रोतापर्यंतच्या या प्रवासात सध्याच्या (60) मेगावॅटपासून (175) मेगावॅट ऊर्जेचे उद्दिष्ट भारताने ठेवले आहे. (2014-2015) मध्ये नविकरणीय ऊर्जा मंत्रालयाने (2021-2022) पर्यंत अक्षय व अपारंपारिक अशा ऊर्जा स्त्रोतासाठी निश्चित केलेली उद्दिष्टे पाहिल्यास त्यातील सौरऊर्जेचे महत्व लक्षात येईल.

उद्दिष्टे :

1) भारतातील जमिनीची उपलब्धता व त्यावर उभारली जाणारी सौर तावदाने आणि त्यातून निर्माण होणारी सौरऊर्जा यांचे गुणोत्तर आर्थिकदृष्ट्या फायदेशीर करणे. याच दृष्टीने आजकाल काही शहरात नवीन होणाऱ्या इमारतीना सौर तावदाने त्यांच्या छतावर लावणे बंधनकारक केले आहे.
2) सौर ऊर्जा स्त्रोतांच्या किंमती इतर उर्जा स्त्रोतापेक्षा कमी ठेवणे व त्यानुसार सौरऊर्जा स्त्रोतांची मागणी वाढविणे, ज्यामुळे आर्थिक विकासासाठी आवश्यक असणारी रोजगार निर्मितीही या मार्गाने वाढेल
3) सौरऊर्जा उत्पादने व त्यासाठी आवश्यक असणाऱ्या तंत्रज्ञानाचा विकास करून ते उद्योजकांना किफायतशीर किंमतीला उपलब्ध करून देणे यासाठी या क्षेत्राला सरकार भरपुर अनुदान देत आहे.
4) सौरऊर्जेसाठी सरकारने अर्थसहाय देणे. याबाबत राष्ट्रीय सौर उपक्रम (National Solar Mission) केंद्र सरकारने (2008) पासून सुरू केले असून राज्य सरकारनीही यात विशेष भूमिका निभावली आहे. यापैकी राजस्थान, तामीळनाडू, आंध्रप्रदेश, कर्नाटक, गुजरात, महाराष्ट्र, तेलगंणा व मध्यप्रदेश ही राज्य सौर ऊर्जा निर्मितीत आघाडीवर आहेत.
5) सौरऊर्जेचे कार्यक्षेत्र वाढवण्याची गरज आहे यात प्रामुख्याने ग्रामीण व शहरी भागातील रस्त्यावरील व घरातील दिवे, सौर ऊर्जेवरील पंप, पाणी गरम करण्याच्या यंत्रणा, छतावरील सौर तावदाने, सोलार ए.सी., सरकारी इमारती, हॉटेल, रेल्वे स्टेशन छताचा सौर ऊर्जेसाठी वापर इ. चा समावेश करणे अभिप्रेत आहे.

तिरूपती देवस्थानने राबविलेले सौरऊर्जावरील खाद्य प्रकल्प, कोची विमानतळ संपूर्णपणे सौर ऊर्जावर आहे. काही ही उदाहरणे सौर ऊर्जाच्या सोनेरी पर्वाची यशस्वी सुरूवात आहे.

संदर्भ ग्रंथ:

1) प्रा. सतीशकुमार (2020) हरित ऊर्जेतूनच शाश्वत विकास, दैनिक प्रभात, दि. 3 नोव्हें. 2020
2) डॉ. मानसी गोरे (2018) शाश्वत विकासासाठी सौर ऊर्जेचा मार्ग, सकाळ, (ॲग्रोवन) दि. 18 एप्रिल 2022
3) www.maayboli.com
4) www.vikaspedia.in
5) www.m.wikipedia.org

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2Issue-13May-Jun2022

ग्राम विकास व कृषि में महिलाओं की भूमिका

डॉ० पारूल शर्मा [१] डॉ० अवनीश शर्मा [२]
१,२ जिला शिक्षा एवं प्रशिक्षण संस्थान, लोहाघाट (चंम्पावत)

शोध सार

किसी भी राष्ट्र का निर्माण ग्रामीण महिला, कृषि व ग्रामीण विकास के बिना अकल्पनीय है। भारत मूलतः गाँवों का देश है तथा देश की ६८.८४ प्रतिशत जनसंख्या गाँवों में निवास करती है (जनगणना २०११)। महात्मा गाँधी ने कहा था कि भारत गाँवों में बसता है यह वाक्य कहीं भी अतिशयोक्ति प्रतीत नहीं होता। स्वतंत्रता प्राप्ति के बाद से वर्तमान समय तक ग्रामीण क्षेत्रों को विकास के बहुत कम अवसर प्राप्त हुए है चूँकि ग्राम विकास हेतु किये गये नियोजन व प्रबंधन वास्तविक क्रियान्वयन में काफी धीमे रहे है जिससे अंतिम व्यक्ति तक विकास की पहुँच आज की २१वीं सदी में भी पूर्ण रूप से संभव नहीं हो पायी है। यद्यपि इस हेतु समय-समय पर योजनाओं का क्रियान्वयन तो हुआ परंतु धरातलीकरण बहुत कम स्तर पर हो पाया है। प्रस्तुत शोध पत्र इसी क्रियान्वयन व ग्राम विकास में कृषि व महिलाओं की भूमिका को जानने का एक छोटा किंतु धरातलीय प्रयास है। इस हेतु उत्तराखण्ड राज्य का पर्वतीय जिला चंपावत(विकासखण्ड -चंपावत) को अध्ययन का केंद्र बनाया गया ।

प्रस्तावना

भारत एक लोकतांत्रिक देश है जिसमें रामराज्य व अंतिम व्यक्ति तक विकास को पहुँचाने की कल्पना की गयी है। इस क्रम में समाज के प्रत्येक व्यक्ति को विकास की मुख्य धारा में जोड़ने का प्रयास किया जाता है। इस हेतु भारतीय संविधान जाति, धर्म, सम्प्रदाय इत्यादि में समानता की भावना को प्रमुखता देता है। यही कारण है कि भारतीय संविधान महिलाओं को न सिर्फ समानता का दर्जा देता है बल्कि महिलाओं के पक्ष में सकारात्मक रूख अपनाने के उपायों के लिए सरकारों को भी सशक्त बनाता है। किसी भी समाज में उसके सदस्यों की परिस्थिति का महत्वपूर्ण सूचक उसकी आर्थिक और सामाजिक भागीदारी होती है। ग्रामीण समाज में जब से महिलाओं ने अपनी भागीदारी निभानी शुरू की है तब से समाज में उनकी प्रस्थिति सकारात्मक रूप से ऊँची उठी है। ग्रामीण क्षेत्रों में विभिन्न सामाजिक, कल्याणकारी, योजनाओं और जागरूकता ने महिलाओं को समाज का स्वीकृत कामकाजी हिस्सा तो बनाया है किन्तु यह प्रतिशत अभी बहुत कम है। ग्राम पंचायतों में महिला आरक्षण, मनरेगा में भागीदारी, आंगनबाड़ी, आशा कार्यकर्ता आदि जैसी नई भूमिकाएं ग्रामीण महिलाओं को आत्मनिर्भर बनाने में मुख्य भूमिका निभा रही हैं। महिला सशक्तीकरण ने ग्रामीण समुदायों की महिलाओं के साथ-साथ गाँव के कमजोर वर्गों को भी सशक्त किया है।

किसी भी सभ्य समाज की वास्तविक स्थिति जानने का एक तरीका यह भी है कि हम यह जाने कि उस समाज की महिलाओं की स्थिति कैसी है, उनके अधिकार क्या है? और उनकी शैक्षिक दशा कैसी है? यदि समाज में महिलाओं को सभी अधिकार प्राप्त हैं तथा शैक्षिक स्तर ऊँचा है तो वह समाज निश्चित रूप से अन्य समाजों की तुलना में ऊँचा होगा। उभरती आर्थिक शक्ति में देश की कुल आबादी की लगभग आधी जनसंख्या महिलाओं की है, अतः महिला विकास की अनदेखी राष्ट्र के विकास में बाधक बनेगी।

अध्ययन की आवश्यकता व महत्व

उत्तराखण्ड का चंपावत जिला मनुष्य के विकास क्रम में परिवर्तित होता रहा है। चूंकि उत्तराखण्ड का चंपावत जिला एक नवीन जिला है जिसका निर्माण उत्तराखण्ड निर्माण के कुछ समय पूर्व ही किया गया है। नवनिर्मित जिला होने के कारण यहाँ की अध्यसंरचना का बहुत अधिक विकास नहीं हो पाया है। इसके अतिरिक्त यहाँ पर उपलब्ध संसाधनों का संतुलित व उचित विकास न होने के कारण यहाँ की स्थानीय जनता को अन्य क्षेत्रों को प्रवास करना पड़ता है। चंपावत के अधिकांश गाँव अभी भी पूर्णरूप से जिला मुख्यालय से संबद्ध नहीं हो पाये हैं। सड़कों का समुचित विकास न होने के कारण आज भी कुछ गाँव बिल्कुल अलग-थलग पड़े हुए हैं। विकास जैसी संकल्पना भी इसके कुछ क्षेत्रों से सैकड़ों कदम दूर है। यहाँ के ग्रामीण क्षेत्रों में महिलाओं द्वारा अधिकांश कार्यों को सम्पन्न किया जाता है। इन कार्यों में घरेलू व आर्थिक दोनो कार्य सम्मिलित हैं। आर्थिक कार्यों को सम्पादित करने के बावजूद महिलाओं को प्राप्त आर्थिक लाभ शून्य है। ग्रामीण क्षेत्रों से पुरुषों के प्रवास की स्थिति में ग्रामीण महिलाओं को स्वयं के द्वारा सम्पादित कार्यों के साथ-साथ पुरूषों के द्वारा किये जाने वाले कार्यों को भी करना पड़ता है। यह स्थिति ग्रामीण विकास में महिलाओं की प्रत्यक्ष भूमिका को प्रस्तुत करती है इसके बावजूद ग्रामीण महिलाओं की स्थिति तुलनात्मक रूप में सोचनीय है। अतः आवश्यकता है कि इस ओर गहन अध्ययन को बढ़ावा दिया जाए ताकि गाँव के विकास के साथ-साथ कृषि व महिलाओं के विकास को एक नया स्वरूप प्रदान किया जा सके।

शोधपत्र के उद्देश्य

१. ग्राम विकास में ग्रामीण महिलाओं के वास्तविक भागीदारी व योगदान को जानना।

२. ग्रामीण महिलाओं की प्रस्थिति को जानना।
३. ग्रामीण महिलाओं की आर्थिक स्थिति को जानना।
४. ग्राम विकास में ग्रामीण महिलाओं के लिए नये विकल्पों को खोजना।
५. ग्राम विकास हेतु नये विकल्पों की खोज करना।
६. ग्रामीण महिलाओं को उनके अधिकारों के प्रयोग हेतु जागरूक करना।

शोध विधि

प्रस्तावित शोध कार्य उत्तराखण्ड के कुमाऊँ मण्डल के चंपावत ब्लॉक से प्रतिचयन विधि द्वारा चयनित गाँवों के सर्वेक्षण को आधार बनाकर किया गया है।प्रस्तुत शोधकार्य प्राथमिक व द्वितीयक आंकड़ों के आधार पर किया गया है।

१. प्राथमिक आंकड़ों के एकत्रण हेतु प्रश्नावली व साक्षात्कार को एक आधार के रूप में चुनकर लगभग सभी आवश्यक पक्षों को मुख्य रूप में रखा गया है।
२. द्वितीयक आंकड़े केन्द्र व राज्य सरकार, एन०जी०ओ०, ग्रामीण विकास संस्थान केन्द्रों में विभिन्न विभागों से प्रस्तावित एवं अप्रकाशित अभिलेखों, उत्तराखण्ड सांख्यिकीय अभिलेखों, वार्षिक प्रतिवेदनों से एकत्रित किया गया है।

संबंधित साहित्य का पुनरावलोकन:

किसी भी शोधकार्य को करने से पूर्व उससे संबंधित साहित्य का अध्ययन करना अनिवार्य होता है प्रस्तुत शोधपत्र हेतु भी विभिन्न माध्यमों जैसे पुस्तकें, मैगजीन, मीडिया, इंटरनेट इत्यादि से महिला एवं ग्रामीण विकास हेतु किये गये विभिन्न प्रयासों एवं उनके प्रतिफलों को जानने का प्रयास किया गया है। भारत में ग्राम अध्ययनों के लिए १९५५ का वर्ष विशेष महत्व रखता है। पहली बार इस वर्ष में भारतीय ग्रामों पर चार पुस्तकें और बहुत से शोध पत्रों को प्रकाशित किया गया। ये पुस्तकें **एस०सी०दूबे** की 'इंडिया विलेज', **डी०एन० मजूमदार** की 'रुरल प्रोफाइल', '**मैक्किम मैरिऑट** की 'विलेज इंडिया' और **एम०एन० श्रीनिवास** की 'इंडियास विलेजिस' थी। इसके अतिरिक्त १९५५ में **ईरावती कार्वे** की अध्यक्षता में मद्रास में भारतीय समाज की स्थिति पर एक सम्मेलन किया गया। इस सम्मेलन में ग्राम विकास और उनके विस्तार क्षेत्र पर चर्चा की गयी। इस सम्मेलन की परिचर्चा को '**सोसायटी इन् इंडिया**' नामक पुस्तक के रूप में प्रकाशित किया गया। इसके अतिरिक्त **एस०सी० दूबे** की 'इंडियास चेजिंग विलेजिस (१९५८), **डी०एन० मजूमदार** की 'कास्ट एण्ड कम्यूनिकेशन इन् एन इंडियन विलेज (१९५८), **ऑस्कर लुईस** की 'विलेज लाइफ इन नार्दन इडियां (१९५८),**ए०आर० देसाई** द्वारा संपादित 'वाल्यूम एन इंट्रोडक्शन टू रुरल सोशियोलॉजी इन इंडिया (१९५९) प्रकाशित किया गया। **रत्नाकुमारी** (१९९७) इन्होंने भारत के विभिन्न योजनाकालों में महिला विकास के कार्यक्रमों में निर्देशन/पैराडाइम परिवर्तन पर ध्यान केन्द्रित किया है। इन्होंने बताया कि यह पैराडाइम परिवर्तन कब? कहाँ और क्यों? परिवर्तित किया गया। रत्नाकुमारी द्वारा पूर्णरूप से महिला विकास व महिला सशक्तीकरण से संबंधित योजनाओं पर मुख्य रूप से प्रकाश डाला गया। **संजय खेतान** (१९९३) द्वारा 'कार्यशील महिला एवं आधुनिकीरण का अध्ययन' किया गया जिसका मूल आधार नगरीकरण, शिक्षा, रोजगार द्वारा महिला के दृष्टिकोण एवं व्यवहार में परिवर्तन था। इस प्रकार अन्य बहुत से लेखों आदि से ग्राम विकास को एक दिशा मिली है।

ग्राम विकास व कृषि में महिलाओं की भागीदारी:

गाँव हमारे देश की आत्मा व आधार हैं। भारत की आधे से अधिक आबादी आज भी ग्रामीण परिवेश से प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष रूप से जुड़ी हुई है। ग्रामीण क्षेत्र किसी भी देश के विकास का आईना होता है। गाँव में उपलब्ध सुविधाएं देश के विकास की गति को दर्शाती हैं। ग्रामीण परिवेश में होने वाली निरन्तर प्रगति मानव संसाधन को सशक्त करती है। ग्रामीण अर्थव्यवस्था में महिलाएं केन्द्रीय भूमिका में होती है। अतः ग्रामीण परिवेश में सम्पादित किये जाने वाले आधे से अधिक कार्य ग्रामीण महिलाओं द्वारा सम्पन्न किये जाते हे।

यह सर्वविदित तथ्य है कि कोई भी राष्ट्र तभी विकास कर सकता है जब उसकी आधी आबादी अर्थात महिलाओं को आर्थिक, सामाजिक, राजनीतिक, धार्मिक आदि समस्त क्षेत्रों में सशक्त व सुदृढ़ बनाया जाये। उनका स्वास्थ्य उत्तम हो तथा वे स्वंय के निर्णय लेने में पूर्णतः स्वतंत्र व सक्षम हो।

भारत ऐसा पहला देश है जिसमें कृषि में महिलाओं की भूमिका को स्वीकार करते हुए १९९६ में भुवनेश्वर में राष्ट्रीय महिला कृषि अनुसंधान केन्द्र की स्थापना की थी। यह केन्द्र कृषि प्रणालियों में महिलाओं के प्रभाव के पहचान के तौर-तरीकों और विभिन्न उत्पादन प्रणालियों के अन्तर्गत विशेष रूप से महिलाओं की भूमिका और उनके काम की तकनीक के विकास में लगा हुआ है। पशुपालन हमेशा से ही कृषि अर्थव्यवस्था की रीढ़ रहे हैं। समाज की प्रारम्भिक अवस्था में पशुपालन का उद्देश्य निजी जरूरतों के पूरा करने हेतु किया जाता था किन्तु आज इसने व्यावसायिक प्रतिस्पर्धा का रूप ले लिया है। नेशनल सैंपल सर्वे के अनुसार डेयरी सेक्टर देश में ८-९ मिलियन लोगों को प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रूप से रोजगार दे रहा है। उत्पादन की दृष्टि से आज भारत दुनिया का सबसे बड़ा दुग्ध उत्पादक देश है (वर्ष २०२१)। महिलाएं पशुपालन के विभिन्न कार्यों जैसे पशुओं की देखभाल एवं खानपान, पशु उत्पादों की ब्रिकी में महत्वपूर्ण योगदान देती है। पशुओं के स्वामित्व विशेषकर बकरी, भेड़, मुर्गों आदि पर महिलाओं का अधिकार होता है।

इसके अतिरिक्त सब्जियों, फलों के उत्पादों के क्षेत्र में कटाई उपरान्त होने वाली क्रियाओं जैसे प्रसंस्करण, पैकिंग, भंडारण आदि में महिलाओं की भूमिका बहुत महत्वपूर्ण है। विशेषकर ग्रामीण क्षेत्रों की महिलाएं तो काफी हद तक कृषि व कृषि से जुड़े व्यवसायों से ही अपना व अपने परिवार का भरण-पोषण कर रही है। चम्पावत ब्लॉक में किये गये सर्वेक्षण से यह स्पष्ट हुआ है कि महिलाओं का मुख्य कार्य पशुपालन व उससे जुड़े कार्यों का सम्पादित करना है। इनमें मुख्य कार्य घास काटना, सुखाकर रखना व पेड़ों से पत्तियों का एकत्रण करना है जिससे की पशुओं हेतु चारा उपलब्ध न होने पर एकत्रित किया गया चारा अर्थात घास पशुओं को खिलायी जा सके।

चम्पावत ब्लॉक में ग्रामीण महिलाओं की विभिन्न कार्यों में सहभागिता प्रतिशत

चम्पावत ब्लॉक के गाँवों के सर्वेक्षण द्वारा महिलाओं की सहभागिता को स्पष्ट रूप से देखा जा सकता है। शोध के दौरान प्राप्त आंकड़ों के विश्लेषण के आधार पर कहा जा सकता है कि चयनित गाँव (पुनावे, मटेला, ओखलढूंगा, गड़कोट, मंगतोला, जमतौला, कोयाटी) में १००: महिलाएं कृषि सम्बंधित कार्यों में लगी हुई है। ग्रामीण महिलाएँ कृषि में अहम भूमिका निभाती है। कृषि के अधिकतर कार्यों में महिलाएं पुरूषों का सहयोग करती है, परन्तु उनके द्वारा किये गये कार्यों को अधिक महत्व नही दिया जाता है। कृषि में समग्र फसल उत्पादन के लिए महिलाओं की भूमिका उनके घर एवं जानवरों की पूर्ण जिम्मेदारी को छोड़कर ४०: तक आँकी गयी है। फसल उत्पादन में कृषि का योगदान १५: तक है। फसल उत्पादन में महिलाओं की भूमिका अत्यधिक अस्पष्ट है। यदि महिला उन्मुखी तकनीकों को अपनाया जाये तो कृषि में महिलाओं की बराबर की भागीदारी को सुनिश्चित किया जा सकता है।

चम्पावत ब्लॉक की महिलाओं द्वारा सामाजिक कार्यों में अपनी सहभागिता सुनिश्चित की जाती है किन्तु राजनीतिक कार्यों (जैसे वोट देना, चुनाव में प्रतिभाग करना, ग्राम पंचायत की गोष्टी इत्यादि में प्रतिभाग करना इत्यादि) एवं विकास कार्यों (जैसे श्रम अनुदान, जागरूकता फैलाना, वृक्षारोपण, साफ-सफाई अन्य) में भागीदारी प्रतिशत अपेक्षाकृत कम है यहाँ तक कि चयनित ग्रामों में से पुनावे और ओखलढूंगा को छोड़कर अन्य ग्रामों में राजनीतिक कार्यों और विकास कार्यों में प्रतिभागिता न के बराबर है। इसका कारण महिलाओं के ऊपर घरेलू कार्य की अत्यधिक जिम्मेदारी व जागरूकता का न होना हो सकता है चूँकि महिलाओं का अधिकांश समय अपनी मूलभूत आवश्यकताओं को पूरा करने में ही व्यतीत हो जाता है जिसके परिणामस्वरूप महिलाओं को स्वयं के लिये समय नही मिल पाता। अत: यहाँ आवश्यकता है कि ग्रामीण महिलाओं के घरेलू कार्यों में लगने वाले समय को विभिन्न आधुनिक प्रविधियों, उपकरणों के प्रयोग से कम कर उन्हें विकास कार्यों की ओर उन्मुख किया जा सकता है।(संलग्नक-तालिका १)

चम्पावत ब्लॉक में महिलाओं की कृषि सहभागिता व विभिन्न स्रोतों से प्राप्त आय

चम्पावत ब्लॉक की महिलाओं की कृषि सहभागिता तथा कृषि कार्यों में प्रयुक्त पद्धति तथा उपकरणों, साथ ही विभिन्न स्रोतों से प्राप्त अनुमानित मासिक आय के संबंध में आंकड़े एकत्र किए गए। जिनका विश्लेषण करने पर स्पष्ट हुआ कि चम्पावत ब्लॉक के सर्वेक्षित ग्रामीण क्षेत्र की सभी महिलाएं कृषि कार्यों को सम्पादित कर रही है। इन कृषि कार्यों में पशुओं का चारा एकत्रण, मौसमी साग-सब्जियाँ का उत्पादन व कुछ मात्रा में मोटे अनाज, आलू, अदरक, हल्दी इत्यादि का उत्पादन करना है। यद्यपि यह कृषि कार्य कुछ सीमित क्षेत्र विशेष में ही केन्द्रित हैं जिसका कारण उत्पादक समतल भूमि की कमी, जंगली जानवरों का फसलों को नुकसान पहुँचाना इत्यादि सर्वेक्षण में बताया गया। किन्तु परम्परागत कृषि पद्धति व औजारों के प्रयोग के कारण उत्पादित कृषि उत्पाद उनके पूरे परिवार के लिए प्रर्याप्त नहीं हो पाते है। फलत: उनकी आर्थिक स्थिति को सुदृढ़ बनाने में कृषि उत्पाद कोई महत्वपूर्ण भूमिका नही निभाते है। कृषि उत्पादन में आधुनिक तकनीकों का प्रयोग, प्रशिक्षण, स्थानीय उपलब्ध वस्तुओं के लिए बाजार उपलब्ध करा कर इनके आर्थिक स्तर को सुदृढ़ किया जा सकता है।

विभिन्न स्रोतों से प्राप्त अनुमानित आय न्यूनतम मासिक आय रू० २२००.०० से अधिकतम रू० ६०००.०० के मध्य पाई गई है। औसत मासिक अनुमानित आय रू० ३२२८.०० पाई गई। इस कारण ग्रामीण महिलाएं गुणवत्ता पूर्ण मानव संसाधन बनने से पूर्व ही विभिन्न सामाजिक, आर्थिक परिस्थितियों के कारण पूर्ण रूप से समाज के विकास में पिछड़ जाती हैं। फलत: उनके स्वयँ के विकास के साथ-साथ उनके द्वारा समाज के लिए किये जाने वाले योगदान में कमी आती है। जिसका प्रभाव प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रूप से उनके परिवार, समाज व देश के विकास पर पड़ता है।(संलग्नक- तालिका २)

निष्कर्ष एवं सुझाव

कहा जा सकता है कि ग्रामीण महिलाएं ग्रामीण अर्थव्यवस्था की धुरी का कार्य करती हैं जिसमें समयानुसार परिवर्तन आता रहा है। इसके बावजूद महिलाएं विकास की मुख्य धारा से बाहर ही रही हैं। महिलाओं के कार्यों को उनके दायित्वों से जोड़कर मूल्यहीन माना जाता रहा है। परिणामत: वर्तमान अर्थ (धन) की दुनिया में उनके कार्यों की बहुत अधिक महत्ता प्राप्त नही होती। अत: आवश्यता इस बात की है कि ग्रामीण विकास तथा ग्रामीण महिलाओं को एक दूसरे के पूरक के रूप में देखा जाए व समग्र विकास की संकल्पना को साकार करने की ओर अग्रसर हुआ जाये जिससे भारतीय संविधान की मूल भावना का उद्देश्य प्राप्त किया जा सके।

संदर्भ ग्रंथ सूची

१- पाण्डे, पी०सी०, निर्मल जोशी, देव सिंह पोखरिया(२००६) ''कुमाऊँ हिमालय की परम्परागत प्रौद्योगिकी'' उत्तरायण कम्प्यूटर्स अल्मोड़ा।

२- उत्तराखण्ड इयर बुक २०१२

३- प्रभा, नीर, बी०डी०एस नेगी(२००८) ''कुमाऊँ (मध्य हिलालय) समाज एवं संस्कृति '' मल्लिका बुक्स।

४- बिष्ट शेर सिंह (२००६) ''कुमाऊँ हिलामयः समाज एवं संस्कृति'' अंकित प्रकाशन, हल्द्वानी।

५- भट्ट, शरद जया भट्ट(२००९) ''औपनिवेशिक उत्तराखण्ड में नारीवादी चेतना का विकास'' अंकित प्रकाशन, हल्द्वानी।

६- जोशी, एम०पी०, ललित प्रभा जोशी (१९९४) ''उत्तरांचल हिमालय समाज, संस्कृति, इतिहास एवं पुरातत्व'' श्री अल्मोड़ा बुक डिपों अल्मोड़ा।

७- आहूजा, राम (२००२) ''भारतीय समाज'' रावत पब्लिकेशन जयपुर।

८- बलूनी, दिनेश चन्द्र(२०१३) ''उत्तराखण्ड का सीमान्त जनपद चम्पावत'' विनसर पब्लिशिंग कम्पनी, देहरादून।

९- बिष्ट, शेरसिंह (२००३): 'मध्य हिमालयी समाज, संस्कृति एवं पर्यावरण इण्डियन पब्लिशर्स, दिल्ली ।

१०- बिष्टए शेर सिंह (२००३): ष्मध्य हिमालयी समाजए संस्कृति एवं पर्यावरण इण्डियन पब्लिशर्स डिस्ट्रब्यूटर कमला नगर दिल्ली।

११- मैठाणी, डी० डी०, गायत्री प्रसाद, राजेश नौटियाल (२०१०): 'उत्तराखण्ड का भूगोल' शारदा पुस्तक भवन,इलाहाबाद।

१२- शुक्ला, आराधना, सिंह शीला, प्रेमलता वर्मा, (२०१४):''आधुनिक पर्यावरणीय मनोविज्ञान'' कॉन्सेप्ट पब्लिशिंग कम्पनी प्रा०लि० नई दिल्ली।

१३- शर्मा, पारूल (२०१३) *'पारिस्थितिकी महिलावाद : उत्तराखण्ड़ का विशिष्ट संदर्भ'* राष्ट्रीय भौगोलिक पत्रिका।

संलग्नक:

तालिका १

चम्पावत ब्लॉक में ग्रामीण महिलाओं की विभिन्न कार्यों में सहभागिता प्रतिशत

क्र० सं०	ग्राम	राजनीतिक कार्यों में सहभागिता :	सामाजिक कार्यों में सहभागिता :	विकास कार्यों में सहभागिता :	कृषि कार्यों में सहभागिता:
१	पुनावे	७७.१४	१००	७१.४३	१००
२	मटेला	००	१००	१००	१००
३	ओखलढूंगा	१६.६७	१००	३३.३३	१००
४	गड़कोट	००	१००	००	१००
५	मंगतोला	००	१००	००	१००
६	जमतौला	१०.९०	१००	३३.३३	१००
७	कोयाटी	००	१००	००	१००

तालिका २

चम्पावत ब्लॉक में महिलाओं की कृषि सहभागिता व विभिन्न स्रोतों से प्राप्त आय

क्र०सं०	ग्राम	कृषि कार्यों में सहभागिता :	प्रयुक्त पद्धति	कृषि उपकरण	विभिन्न स्रोतों से प्राप्त अनुमानित मासिक आय
१	पुनावे	१००	परम्परागत	हल, कुदाल, फावड़ा, कसी	६०००
२	मटेला	१००	परम्परागत	हल, कुदाल, फावड़ा, कसी	३०००
३	ओखलढूंगा	१००	परम्परागत	हल, कुदाल, फावड़ा, कसी	३०००
४	गड़कोट	१००	परम्परागत	हल, कुदाल, फावड़ा, कसी	२२००
५	मंगतोला	१००	परम्परागत	हल, कुदाल, फावड़ा, कसी	३२००
६	जमतौला	१००	परम्परागत	हल, कुदाल, फावड़ा, कसी	३०००
७	कोयाटी	१००	परम्परागत	हल, कुदाल, फावड़ा, कसी	२२००

स्रोत-सर्वेक्षण

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2Issue-13May-Jun2022

पर्यावरणवादी इतिहास लेखन: एक अभ्यास

सहा,प्रा.सौ.नंदिनी देशमुख[1] डॉ.शशिकांत गोकुळ साबळे[2]

[1]आर.एन.सी.आर्ट्स,जे.डी.बी.कॉम. एन.एस.सी.सायन्स कॉलेज नाशिकरोड, नाशिक

[2]आर.एन.सी.आर्ट्स,जे.डी.बी.कॉम. एन.एस.सी.सायन्स कॉलेज नाशिकरोड, नाशिक

Email: nandinibdeshmukh.24@gmail.com

Email-sabale.uma@gmail.com

घोषवारा :

नैसर्गिक आपत्तीमुळे मानवी जीवन त्याचबरोबर जीवनमूल्ये स्थावर संपत्ती आणि सामाजिक नियमांचे देखील हानी होते. त्यामुळे पर्यावरण वादी इतिहासात एक नवीन दृष्टी ने आपण निसर्गाला, राज्याकडे व समाजाकडे वेगळया दृष्टिकोनातून पाहू शकतो. इतिहास ही जरी स्वतंत्र ज्ञानशाखा असली तरी इतिहास लेखन करताना अनेक सामाजिक व शास्त्रीय शाखेचा संबंध येतो. इतिहासाच्या अभ्यासात भूगोल या ज्ञान शाखेची महत्त्वाची भूमिका आहे.स्थळ व काळ ही इतिहासाची प्रमुख परिणामे आहेत. नैसर्गिक स्थिती पर्वत, नद्या, हवामान, जंगले, समुद्र इत्यादी घटक मानवी जीवनाचे स्वरूप बदलतात.इतिहास लेखनातील नवीन विचार प्रवाह म्हणजे पर्यावरणवादी इतिहास 'एन्व्हायरमेंटल हिस्ट्री' याचा अभ्यास केला जाणार आहे. सद्यस्थितीत नैसर्गिक हानी जी मानवाकडून होत आहे याची फार महत्त्वाची भूमिका मानवी जीवनात प्रवासात ठरते.

बीज शब्द : पर्यावरणवादी इतिहास

प्रस्तावना :

मानवी कल्याण व विकास हा पर्यावरणाशी संबंधित असतो. इतिहास म्हणजे मानवी जीवनाच्या भूतकालीन घटनांचा कालक्रम अभ्यासला जातो. इतिहास मानवी घटकांचा अभ्यास करणारी एक ज्ञान शाखा मानली जाते. गतकालीन मानवी जीवनाची माहिती इतिहासा द्वारे होते. प्रागैतिहासिक काळापासून मानवाने जी प्रगती केली त्या प्रगतीचा संबंध बदलत्या पर्यावरणाशी येतो.

'Envormental History and Disaster History' या इतिहासातील नव्याने उदयास आलेल्या ज्ञान शाखा आहेत. नैसर्गिक आपत्ती, भूकंप, दुष्काळ ,चक्रीवादळ, पूर या संकटांनी प्राचीन संस्कृतीचा ऱ्हास झाला याचे इतिहासात दाखले आहेत. उदाहरणार्थ द्वारका नगरीचे अवशेष, ग्रीक बॅबिलोनियन संस्कृती, सिंधू संस्कृती. कोट्यावधी वर्षापूर्वीच्या झालेल्या भौगोलिक बदलाच्या विपरीत परिणामाला तत्कालीन जीवसृष्टी पक्षी, प्राणी जीवजंतू इत्यादी सामोरे जावे लागले.

प्रत्येक काळ मग तो प्राचीन मध्ययुगीन आधुनिक काळात मानवी जीवन व प्राणी जीवनाला नैसर्गिक आपत्तीला सामोरे जावे लागले पण सृष्टीच्या नियमाप्रमाणे उत्पत्ती स्थिती व लय याप्रमाणे सृष्टी जीवन व समाज जीवन पुनर्निर्मित झालेले दिसते. प्राचीन संस्कृतीचा उदय आणि विकास हा नद्यांच्या काठीच झालेला आहे. उदाहरणार्थ इजिप्त संस्कृती नाईल नदीकाठी मेसोपोटेमियन टायग्रीस व युफ्रेटिस सिंधू संस्कृती सिंधू रावी नदी या संस्कृतीचा उदय विकास व ऱ्हाससाठी पर्यावरणाची भूमिका महत्त्वाची ठरते.

उद्दिष्टे :

'पर्यावरणवादी इतिहास लेखन एक अभ्यास' यासंदर्भात पुढील उद्दिष्टे ठेवली आहेत.

१) पर्यावरण इतिहास म्हणजे काय?
२) पर्यावरण वादी इतिहासाची उत्पत्ती
३) पर्यावरण आणि मानवी संस्कृतीचा परस्पर संबंध
४) बदलत्या पर्यावरणाचा सांस्कृतिक जीवनाचा होणारा परिणाम
५) भविष्यात नैसर्गिक आपत्तीतून इतिहास कालीन संस्कृतिक ठेव्याची जपणूक करण्यासाठी सामाजिक जीवनाची निर्मिती करणे सामाजिक मन तयार करणे

विषयाचे महत्व :

भूतकाळातही या घटना जशा घडल्या त्यांची कारणे महत्त्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न या पेपर मध्ये केला जाणार आहे. पर्यावरण वादी नवीन विचार प्रवाहातून इतिहास व भूगोल संबंध पर्यावरणाचा व सामाजिक व आर्थिक जीवनावर होणारा परिणाम अभ्यास करण्याचा प्रयत्न केला जाईल.

व्याप्ती व मर्यादा :

शोध निबंधाची व्याप्ती ही पर्यावरणवादी इतिहासलेखन या विचारपुरती मर्यादित आहे.

संशोधनपद्धती :

सादर शोध निबंध अभ्यासतांना दुय्यम साधनसामुग्रीवर आधारित आहे.पुस्तके. विविध मासिके,विविध लेख,शासकीय संकेतस्थळाच्या सहाय्याने मांडणी केली आहे.

गृहीतके :

पर्यावरणाच्या बदलाचा मानवाच्या सर्वांगीण जीवनावर परिणाम होतो.

विषय विस्तार :

विसाव्या शतकात युरोपमध्ये अनेक प्रभावशाली कल्पनांचा उगम झाला . इटलीमध्ये मायक्रो हिस्ट्री विकसित झाली तर ब्रिटनमध्ये मानववंश शास्त्रीय सामाजिक इतिहास प्रभावी होता . फ्रान्समध्ये अनल्स दृष्टिकोन विकसित झाला. पर्यावरण इतिहासाने प्रथम आकार घेतला तो संयुक्त राष्ट्रात इसवी सन 1970 ते 1980 च्या दशकात पर्यावरणीय इतिहास क्षेत्रात अमेरिकेने प्रभाव प्राप्त केला इसवी सन 1980 पासूनच पर्यावरणीय इतिहास जगाच्या कानाकोपऱ्यात भरभराटीला आला .

पर्यावरणीय इतिहास एक ज्ञान प्रवाह आहे. या विचार प्रवाहात मानवी आणि सामाजिक संबंधांवर होणाऱ्या परिणामाची चर्चा केली जाते .निसर्ग आणि पर्यावरणातील मानवी संबंधांवर परिणाम करणाऱ्या ऐतिहासिक घटना चा दीर्घकालीन प्रभाव समजून घेण्याचा प्रयत्न या विचारधारेत केला जातो . भूतकालातील पृथ्वीच्या पर्यावरणावर होणारे हे परिणाम आणि त्यामुळे निसर्गात होणारे बदल समजून घेण्याचा एक मार्ग म्हणजे पर्यावरण इतिहास पर्यावरणीय इतिहासकार मानव व त्यांनी निर्माण केलेल्या संस्थांच्या बदलाचे मूल्यमापन करतात .उदाहरणार्थ राज्य, राजेशाही. वसाहती चे साम्राज्य, पर्यावरणीय इतिहास केवळ समाज आणि अर्थव्यवस्थेतील बदल पहात नाही तर या बदलांचा नैसर्गिक वातावरण वरील परिणाम चा अभ्यास करते. या बदलत्या घटनाचा ऐतिहासिक घटनाक्रम दर्शवितो. डोनाल्ड कस्टर "द एँड्स ऑफ द अर्थ " या पुस्तकात लिहितात पर्यावरण इतिहास आपल्याला भूतकाळाकडे पाहण्याचा एक नवीन मार्ग देतो आणि या विचारात आपला दृष्टिकोन बदलण्याची क्षमता आहे. पर्यावरणीय इतिहासात मानवी स्थलांतराच्या प्रभावाचा अभ्यास केला जातो.

सामाजिक इतिहास लेखनात इतिहासलेखन क्षेत्रात क्रांती घडवून आणली. विशाल साम्राज्याचा महत्त्वाकांक्षा आणि साम्राज्य विस्ताराच्या योजनेमुळे पृथ्वीच्या वातावरणाची किती हानी झाली हे पर्यावरणी इतिहासावरून दिसून येते . भारतात रामचंद्र गुहा यांनी पर्यावरणाचा दृष्टिकोनातून समाजाचा अभ्यास केला . संस्कृतीच्या वाटचालीत होणारे बदल म्हणजे पर्यावरणाची परिणीती होय. पर्यावरणाचा बदलाने सारे सामाजिक व राजकीय तसेच जैविक संदर्भात बदल होतात.

हवामान बदलले सामाजिक स्थित्यंतरे, चालीरीती, खानपानाच्या सवयी ,यातील बदलांचा अभ्यास पर्यावरणी इतिहासात होतो. इतिहासात पूर्वी राजकीय संघर्ष लढाया यांना महत्त्व होते इतिहासात सामाजिक वर्तन हे देखील महत्त्वाचे आहे सामाजिक वर्तन त्याच्या जैविक व घटकांवर व पर्यावरणावर अवलंबून असते भोवतालच्या परिस्थितीवर व्यक्तीचे वर्तन आणि निर्णय प्रक्रिया अवलंबून असते एकाच वेळी माणसे परस्परविरोधी वर्तन करताना दिसतात शांतता निर्माण करण्याची प्रयत्न व दहशतवादी विचार जैविक व अजैविक घटकांमधील प्रक्रियेत सामाजिक इतिहास व सांस्कृतिक इतिहास समजून घेण्यासाठी पर्यावरणवादी दृष्टिकोन असणाऱ्या अभ्यास पद्धती रूढ झाल्या उदाहरणात ध्रुवीय प्रदेश, विषुववृत्तीय प्रदेश यांच्या हवामानाचा तेथील मानवी जीवनावर, संस्कृती, परंपराचा अभ्यास पद्धतीत मोडतो.

मानवी जीवन व भौतिक जग क्षणोक्षणी बदलत असते याचा अभ्यास इतिहासात केला जावा अशा विचार रामचंद्र गुहा यांनी मांडला इतिहासाचा अर्थशास्त्र, समाजशास्त्र ,मानसशास्त्र या विद्याशाखेशी असणारा अन्योन्य संबंध अभ्यासला जातो तसेच निसर्ग शास्त्राचा व इतिहासाचा अतूट संबंध इतिहासकार अभ्यासू लागले. गतकालीन मानवी जीवनाचा सामाजिक स्थित्यंतराचा व विकासाचा अभ्यास प्रकृति विज्ञानाच्या दृष्टिकोनातून इतिहासकार अभ्यासू लागेल. मानव हा निसर्गाचा अविभाज्य घटक आहे निसर्ग विज्ञान निसर्गातील भिन्न घटक परस्पर संबंधाच्या अध्ययनाचे शास्त्र आहे. जर्मन शास्त्रज्ञ हेकेल १८६६ मध्ये 'इकॉलॉजी' या शब्दाची व्याख्या करताना डार्विनचा 'ओरिजिन ऑफ स्पेसीज' या ग्रंथाच्या संदर्भात हे केलेले विधान म्हणजे डार्विनच्या सिद्धांतानुसार जीवन संघर्षाच्या प्रक्रियेतील सर्व संबंधित घटकांच्या परस्पर संबंधाचा अभ्यास म्हणजे परिस्थिती होय.

निसर्गाचा उपयोग मानवी प्रगतीसाठी मानव अनादी काळापासून करताना दिसून येतो. औद्योगीकरण आत्यंतिक नागरीकरण तांत्रिक व वैज्ञानिक विकल्पाने निसर्गाचा अतिरेकी वापरामुळे निसर्गातील संतुलन नष्ट होऊन पर्यावरण दूषित होते यामुळे वनस्पती पक्षी प्राण्यांच्या जाती नष्ट होताना दिसतात या दुष्परिणामामुळे मानवी जीवन ती संपुष्टात येण्याची धोके निर्माण झाले आहे.

१९६२मध्ये श्रीमती रॅचेल कार्सन या अमेरिकन विदुषी पर्यावरणाला धोका दर्शवणारे 'द सायलेंट स्प्रिंग' हे पुस्तक पर्यावरण चळवळीचा आधार ग्रंथ मानला जातो. निसर्गातील बदलाचा परिणाम मानवी जीवन पद्धतीत होतो उदाहरणार्थ मानवाने वस्तीसाठी डोंगर, झाडी नष्ट केली या मानवी कृतीमुळे निसर्ग बदलला . भारतीय अभ्यासकांनी ऐतिहासिक पुराव्याच्या आधारे पुरातन नैसर्गिक परिस्थितीचे आडाखे बांधले. पुण्याच्या डेक्कन कॉलेज, पुरातत्व विभाग नागपूर विद्यापीठ, पुरातत्त्वशास्त्र प्राचीन मानव जीवन व तत्कालीन नैसर्गिक परिस्थिती यांच्या परस्परावलंबी विषयांवर प्रकाश टाकण्यास उपयुक्त ठरते डॉ. म.के. ढवळीकर यांनी 'पुरातत्त्वविद्या' या ग्रंथात निसर्ग आणि इतिहास यांचा अन्य संबंधाचे स्पष्टीकरण केले प्राचीन इतिहास कालीन काही प्रश्न उत्तरे नैसर्गिक स्थित्यंतरे सापडतात.उदा. सिंधू संस्कृतीचा अंत आणि सरस्वती नदीचा ऱ्हास या प्रश्नांची उत्तरे नैसर्गिक स्थितीत शोधली जातात सिंधू संस्कृतीच्या ऱ्हासाची कारणे सांगताना नैसर्गिक कारणे शोधली तर आर. एल. रेक्स यांनी वॉटर वेदर अँड प्री हिस्टरी या ग्रंथात व्यक्त केली आहेत. सिंधू नदीच्या महापुरामुळे मोहनजोदडो शहर नष्ट झाले .पण हा पुर अतिवृष्टी मध्ये मुळे नव्हे तर भूकंपाने झाल्याचे मत . रेक्स मांडले आहे. सरस्वती नदीच्या ऱ्हासाचे कारण रेक्स देताना म्हणतात इ.सवी. पूर्व तिसऱ्या सहस्त्रकात यमुना नदीचे पाणी सरस्वती नदी पडायचे, पण ते इसवी सन पूर्व दुसऱ्या सहस्त्रकात ते गंगा नदीत पडू लागले, त्यामुळे ही नदी लुप्त झाली. बदलते नद्यांचे प्रवाह, जंगलतोड इत्यादीमुळे जल जीवनात बदल झाला.

ऐतिहासिक साहित्य, वैदिक ,साहित्य, पुराणग्रंथ, महाकाव्यात देखील प्राणी जीवन व मानवी जीवनात या बाबतचे उल्लेख आढळतात यावरून नैसर्गिक परिस्थितीचा अंदाज येतो.

एकंदरीत मानवी जीवनाच्या निसर्गाचा अति निकट संबंध येतो बदलत्या नैसर्गिक परिस्थिती चा मानवी जीवनावर होणारा परिणाम अभ्यासतांना निसर्गाची हानी मानवाचे जीवन विस्कळीत करताना दिसून येते. त्यामुळे निसर्ग संवर्धन व रक्षणाची महत्त्व मानवाला समजावे यासाठी अनेक संस्था प्रयत्न करताना दिसतात चिपको आंदोलनाचे प्रवर्तक सुंदरलाल बहुगुणा यांनी ही निसर्गाच्या रक्षणासाठी व संवर्धनाच्या विचाराचा प्रभावीपणे विचार मांडला आहे.

ज्या ऐतिहासिक साधनांच्या आधारे विशेषता उत्खलीत साधने ज्या वस्तू वास्तू यांचा समावेश होतो ती ऐतिहासिक साधने जपण्याची संवर्धनाची गरज आहे. कारण या वस्तू वास्तू नैसर्गिक आपत्तीमुळे नष्ट होतांना दिसून येतात. याबाबत सामाजिक मन व सामाजिकजाणीव निर्माण करणे महत्त्वाचे ठरते. नैसर्गिक बदलाला जसा मानव कारणीभूत आहे तसेच मानवी जीवन प्राणीजीवन निसर्गाचे रक्षण व संवर्धन करणे हा दृष्टिकोन महत्त्वाचा आहे, म्हणून इंग्लंडमध्ये एन्व्हायरमेंट अँड हिस्ट्री या नावाचे नियतकालिक जॉन क्लॉक व पीटर कोटस यांनी संपादन केले आहे. भारतातही रामचंद्र गुहा सारखे इतिहासकार या दृष्टिकोनातून लिखाण करतांना दिसून येतात.

पर्यावरणासंबंधीच्या बदलांचा विचार करताना स्थानिक बदल महत्त्वाचे असतात. पर्यावरणाच्या अभ्यासात भूशास्त्र, पुराजीवशास्त्र, हवामानशास्त्र, सागरविज्ञान, इतिहास व पुरातत्त्व शास्त्रचा उपयोग होतो. पर्यावरणीय इतिहास लेखनातून स्थानिक बदलाबरोबर जागतिक पातळीवर होणाऱ्या बदलांचा विचार केला जातो.

